अहवाल क्रमांक : १५९

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

नाशिक जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# पंधरावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक जुलै, २०१८ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, नागपूर
२०१८

# पंचायती राज समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

नाशिक जिल्हा परिषदेच्या सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील

# पंधरावा अहवाल

# पंचायती राज समिती

(सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.
३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.
६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
७. डॉ. देवराव होळी, वि.स.स.
८. डॉ. सुरेश खाडे, वि.स.स.
९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.
१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.
१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.
१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.
१६. श्री. भारत भालके, वि.स.स.
१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.
२२. प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.
२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.
२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.
२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित सदस्य :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी
(५) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती

(सन २०१५-२०१६)

**कार्यकारी समिती प्रमुख**

१. *श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
३. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
४. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
५. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.
६. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
७. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
८. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
९. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
१०. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१२. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१३. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१४. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१५. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१६. श्री. अमित झनक, वि.स.स.
१७. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१८. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
१९. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२०. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२१. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२२. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.
२४. **रिक्त
२५. **रिक्त

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

* सन २०१५-२०१६ या वर्षासाठी गठीत करण्यात आलेल्या महाराष्ट्र विधानमंडळाच्या पंचायती राज समितीवर मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १५ ऑक्टोबर, २०१६ रोजीपासून श्री.प्रकाश भारसाकळे, वि.स.स. यांची 'कार्यकारी समिती प्रमुख 'म्हणून नामनियुक्ती केली आहे.

** सन्माननीय समिती प्रमुख श्री.संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. व श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांचा दिनांक ८ जुलै, २०१६ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त.

# पंचायती राज समिती

(सन २०१५-२०१६)

**समिती प्रमुख**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. प्रकाश भारसाकळे, वि.स.स.
३. श्री. अनिल गोटे, वि.स.स.
४. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
५. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
६. श्री. आर. टी. देशमुख, वि.स.स.
७. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
८. श्री. समीर कुणावार, वि.स.स.
९. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
१०. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
११. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
१२. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
१३. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१४. श्री. राजाभाऊ वाजे वि.स.स.
१५. ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१६. श्री. बसवराज पाटील, वि.स.स.
१७. श्री. अमित झनक, वि.स.स.
१८. श्री. राहुल मोटे, वि.स.स.
१९. श्री. सुरेशभाऊ लाड, वि.स.स.
२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.
२१. श्री. पांडुरंग फुंडकर; वि.प.स.
२२. श्री. अनिल तटकरे, वि.प.स.
२३. श्री. संदीप बाजोरिया, वि.प.स.
२४. श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स.
२५. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. विलास आठवले, उप सचिव
(३) श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
(४) श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा 'समिती प्रमुख' या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा पंधरावा अहवाल सादर करीत आहे.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता समिती दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परिक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक २५ मे, २०१५ रोजी केले. समिती पध्दतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला "Mini Legislature' सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पाहरा ठेवण्याचे महत्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहित तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहित पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात, त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत निःपक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो, परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो. शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पध्दतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशीलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुध्दा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरितीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारुन संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालन सुध्दा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पध्दत जोपासली आहे. या पध्दतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करुन आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करुन विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणिवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्या दृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेऊन कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाई देखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्दयांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पध्दती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पध्दतीचे स्थान व महत्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृध्दिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याच प्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णय देखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचना देखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाई देखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरब देखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करुन ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारुन घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणी पुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करुन काही चांगल्या बाबींचे समर्थन करुन संबंधितांना प्रोत्साहित देखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २००८-२००९ व २०११-२०१२ या वर्षाच्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१५-२०१६ साठी गठीत झालेल्या समितीने नाशिक जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने नाशिक जिल्हा परिषदेस दिनांक ५, ६ व ७ मे, २०१६ रोजी भेट देऊन श्री. मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ करिता गठीत झालेल्या समितीने नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक १४ व १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी जिल्हा परिषद, नाशिक संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री.मुकेश खुल्लर, अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन (सेवा) विभाग,श्री.श्यामलाल गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग,श्री.विजय कुमार, अतिरिक्त मुख्य सचिव, कृषी विभाग, श्री.नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसुल विभाग, श्री.असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.एकनाथ डवले, सचिव, जलसंधारण विभाग, श्री.किरण कुरुंदकर, सचिव, पशुसंवर्धन विभाग, श्री.संजय देशमुख, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, सार्वजनिक आरोग्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), श्रीमती विनिता वेद सिंगल, सचिव, महिला व बालविकास विभाग, श्री. विवेक नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, (ग्रामविकास विभाग), श्री.दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.र.प्र.आटे, सह सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.डी.एल.सुळ, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, श्री.राजेश क्षीरसागर, सह सचिव, महसूल विभाग, श्री.र.अ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री.सुग्रिव धपाटे, उप सचिव, कृषी विभाग, श्री.संजीव कुमार, आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.शिवाजी दौंड, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, तसेच श्रीमती शुभांगी पाटोळे, सह संचालक, स्थानिक लेखा निधी संचालनालय, नवी मुंबई यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या नाशिक जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०१७-२०१८ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ११ जुलै, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
नागपूर,
दिनांक : ११ जुलै, २०१८.

**सुधीर पारवे**
समिती प्रमुख,
पंचायती राज समिती.

## अनुक्रमणिका


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| (१) | एक | जिल्हा परिषदांच्या शाळांमधील विद्यार्थी गुणवत्ता वाढीबाबत (पंचायत समिती, दिंडोरी) | १ |
| (२) | दोन | निफाड तालुक्यातील घरकुल योजनाबाबत (पंचायत समिती, निफाड) | ४ |
| (३) | तीन | नाशिक जिल्ह्यातील पंचायत समित्यांमधील अफरातफर व गैरव्यवहाराबाबत | ८ |
| (४) | चार | जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिका-यांनी करावयाचे दौरे याबाबतच्या परिपत्रकात सुधारणा करण्याबाबत | १४ |
| (५) | पाच | कोल्हापूर बंधा-यांच्या कामांबाबत (पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर) | १६ |
| (६) | सहा | मागासवर्गियांच्या कल्याणकारी योजनांसाठी स्वःउत्पन्नातून २० टक्के रक्कमेतून सौर कंदील खरेदी करण्याबाबत (पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर) | १९ |
| (७) | सात | ग्रामीण भागातील विविध योजनांच्या माहितीबाबत (पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर) | २१ |
| (८) | आठ | वार्षिक अंदाजपत्रकाबाबत (पंचायत समिती, नाशिक) | २४ |
| (९) | नऊ | इंदिरा आवास घरकुल योजनांबाबत (पंचायत समिती, दिंडोरी) | ३३ |
| (१०) | दहा | अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा अखर्चित निधी खर्च न करणेबाबत | ३६ |
| (११) | अकरा | समितीच्या नाशिक जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांशी झालेल्या अनौपचारिक चर्चेदरम्यान उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत | ३९ |
| | | परिशिष्ट<br>समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | ५३ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

## जिल्हा परिषदांच्या शाळांमधील विद्यार्थी गुणवत्ता वाढीबाबत

## (पंचायत समिती दिंडोरी)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, आपण शाळांची तपासणी केली आहे, त्यामध्ये आपल्याला त्रुटी आढळून आलेल्या आहेत. आपल्याला आढळलेल्या त्रुट्यांच्या संदर्भात कोणती प्रशासकीय कारवाई केली. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, कोणत्याही प्रकारची प्रशासकीय कारवाई केलेली नाही. वार्षिक तपासणी झाल्यानंतर शिक्षकांची बैठक घेतली जाते. त्यामध्ये संपूर्ण तपासणीत शाळांतील चांगल्या बाबी व दिसून आलेल्या त्रुटी सांगितल्या जातात. भविष्यात आढळलेल्या त्रुटी दूर करण्यासाठी मार्गदर्शन केले जाते. पुढील शैक्षणिक वर्षात त्रुटी कमी करण्याचे प्रयत्न केले जातात. यावर समितीने अशी विचारणा केली की, यासंबंधात प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक नाही का, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, प्रशासकीय कारवाई करणे आवश्यक आहे. मात्र गंभीर बाब नसेल तर ती केली जात नाही, जी बाब सुधारता येऊ शकते, त्यामध्ये प्रशासकीय कारवाई करण्याची गरज वाटत नाही. त्यामुळे प्रशासकीय कारवाई केलेली नाही.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, विद्यार्थ्यांकडे अपेक्षित शैक्षणिक गुणवत्ता नाही ही गंभीर बाब नाही काय तसेच शिक्षकांची वेतनवाढ रोखावी, त्यांना नोटीस द्यावी असे आपल्याला वाटत नाही का, मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छता गृह नसणे ही गंभीर बाब आहे, सर्व शाळांमध्ये स्वच्छता गृह आहे काय, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, सर्व शिक्षा अभियानांतर्गत शंभर टक्के स्वच्छता गृह आहेत. तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, विद्यार्थ्यांची गुणवत्ता ही देखील महत्त्वाची बाब आहे. आपल्याकडे असणारी यंत्रणा ही दुय्यम बाब आहे. विद्यार्थ्यांकडे अपेक्षित गुणवत्ता नसेल तर ही खरोखर गंभीर बाब आहे. मी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सांगू इच्छितो की, आपण या संदर्भात जर १-२ ठिकाणी कारवाई केली तर आपल्याला निश्चितच त्याचा फरक दिसून येईल. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे गरजेचे आहे. ज्या शाळांतील गुणवत्ता खाली आली आहे, त्या भागातील शिक्षकांवर त्या संदर्भातील जबाबदारी निश्चित करून, त्यांच्यावर कोणती कारवाई प्रस्तावित केली त्याबाबत समितीला कळवावे. आपण काही ना काही कारवाई प्रस्तावित करावी. ज्या शिक्षकांनी ३ वर्षांत शाळांची गुणवत्ता खाली आणली आहे, त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करून समितीला अहवाल सादर करावा असे निदेश मुख्य कार्यकारी अधिकारी यांना समितीने दिले.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, तालुक्यातील सर्व शिक्षक मुख्यालयी राहतात काय, यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, शिक्षक मुख्यालयी राहत असल्याबाबतचे दाखले प्राप्त आहेत. स्थानिक स्तरावर गावचे सरपंच, सहकारी संस्थांचे चेअरमन यांचे प्रमाणपत्र असते. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे सन २००६ चे परिपत्रक आहे की, मुख्यालयी राहत असल्याबाबतचे ३ प्रतिष्ठित लोकांचे दाखले द्यावेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, शिक्षक मुख्यालयी राहतच नाहीत. मुख्यालयी राहण्याच्या संदर्भात त्यांना घरभाडे भत्ता मिळतो. शिक्षक खरोखर मुख्यालयी राहतात या संदर्भात आपण स्वतः जाऊन तपासणी केली आहे का, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, याबाबतीत केंद्र प्रमुख पडताळणी करतात. केंद्र प्रमुखांकडून मिळालेल्या दाखल्यावरून तेथे जाऊन शिक्षक राहत असल्याबाबत विचारणा केली असता ते तेथे राहत असल्याची माहिती देण्यात आली.

समितीने पुढे असे मत व्यक्त केले की,समिती मधील सदस्य देखील ग्रामीण भागातील आहेत, त्यामुळे त्यांना माहित आहे की, शिक्षक मुख्यालयी राहत नाहीत. ते तालुक्याच्या ठिकाणी राहतात किंवा आपल्या गावात किंवा शहरात राहतात आणि गाडीवरून ये-जा करतात. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती घ्यावी आणि शिक्षक मुख्यालयी राहत नसतील तर त्यांचा घरभाडे भत्ता बंद करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, उच्च न्यायालयात या संदर्भात प्रकरण होते, त्यामध्ये प्रशासकीय कारवाई करावी अशी सुचना करण्यात आली आहे.

यावर समितीने पुढे असे मत व्यक्त केले की, प्रशासकीय कारवाई केली तर शिक्षकांना मुख्यालयी राहून विद्यार्थ्यांना शिकवावे लागेल. परिणामी विद्यार्थ्यांची प्रगती होईल. खाजगी शाळांचे प्रमाण वाढत चालले आहे. अनुदानित शाळांपेक्षा विनाअनुदानित शाळांचे, खाजगी शाळांचे प्रस्थ वाढत चालले आहे. शिक्षक मुख्यालयी राहत नसल्यामुळे पालक मुलांना खाजगी शाळांमध्ये प्रवेश घेतात. तसेच केंद्र प्रमुख किंवा गट विकास अधिकारी यांनी तालुक्यातील शिक्षक मुख्यालयी राहतात की नाही ते पहावे, त्यांचे दाखले तपासावे आणि ते दाखले जर चुकीचे असतील तर गट विकास अधिका-यांनी त्या संदर्भातील सविस्तर अहवाल समितीला एक महिन्यात सादर करावा. सदर विषयाच्या संदर्भातील अहवाल प्राप्त झाल्यानंतर समितीला या संदर्भात शासनाला शिफारस करता येईल आणि यातून काही तरी मधला मार्ग काढता येईल. तसेच या संदर्भात बायोमेट्रिक पध्दत सुरू करता येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढी करिता शिक्षकांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे असे समितीचे मत असून त्याकरीता शिक्षकांच्या उपस्थितीकरीता शाळांमध्ये संगणक संचलित उपस्थिती दर्शक (बायोमॅट्रीक) यंत्रणा स्थापन करण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

शासन परिपत्रक क्र.अराप/१०९३/प्र.क्र.२०२/२०१५, दिनांक १६.६.१९९३ नुसार जिल्हा परिषद कर्मचारी यांना मुख्यालयी राहणे बंधनकारक करण्यात आले असून जे कर्मचारी मुख्यालयी राहत नाहीत, त्यांना घरभाडेभत्ता देण्यात येत नाही. तसेच त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येते. जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये विद्यार्थी व शिक्षकांच्या हजेरी करीता शासन निर्णय क्र.संगणक-२०१०/प्र.क्र.४ (भाग-३)/संगणक कक्ष (माहिती तंत्रज्ञान कक्ष) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई दिनांक १८.१२.२०१७ अन्वये सदर योजना बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याने शिक्षकांच्या उपस्थिती करीता बायोमॅट्रीक यंत्रणा बसविण्यात आलेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचे अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-**

(१) शासकीय कार्यालयामध्ये बायोमॅट्रीक उपस्थिती प्रणाली लावण्याबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या परिपत्रक क्रमांक मातंसं-२००९/९२८/३९ दिनांक २७ जुलै, २००९ मध्ये सुस्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

(२) शासनामार्फत प्रायोगिक स्तरावर राबविण्यात आलेली जिल्हा परिषद शाळांमधील बायोमॅट्रीक प्रणाली योजना बंद करण्यात आली आहे. (क्र. संगणक-२०१०/प्र.क्र.४/संगणक कक्ष दि.१६-५-२०१५) व चालू स्थितीतील मशिन्स इतरत्र हलविण्याबाबत सुचना देण्यात आल्या आहेत.

(३) मा.राज्यमंत्री यांचे दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ रोजीचे बायोमॅट्रीक मशिन लावण्याबाबतचे आदेश सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले आहेत.

(४) तसेच जिल्हा परिषद, नाशिक मध्ये बायोमॅट्रीक मशिन बसविण्याबाबत या विभागाचे पत्र क्र.आयटी २०१५/प्र.क्र.५७/मातंक अन्वये अभिप्राय कळविण्यात आले आहेत.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीकरीता शिक्षकांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे असे समितीचे मत असून त्याकरीता शिक्षकांच्या उपस्थितीकरीता शाळांमध्ये संगणक संचलित उपस्थिती दर्शक यंत्रणा स्थापन करण्याबाबत शासनाची भुमिका काय आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, सदरहू मुद्दा घरभाडे भत्त्याशी निगडीत आहे. शिक्षक मुख्यालयी राहत असेल तर घरभाडे देत नाही. परंतु मुख्यालयी राहत असल्याचे प्रमाणपत्र शिक्षक सादर करतात.

यावर समितीने असे निदेश दिले की, जे शिक्षक सरपंच व इतर व्यक्तींचे प्रमाणपत्र मुख्यालयी राहण्याबाबत सादर करतात अशा सर्वांना त्या प्रमाणपत्रासोबत त्यांचा घराचा पत्ताही त्यांनी सादर करावा अशी सूचना समिती करते किंवा शासनाने डीबीटी प्रमाणे घरभाडे भत्ता घरमालकाच्या खात्यात आरटीजीएसने प्रदान करावा तरच या सर्व बाबींना आळा बसेल. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस असे विदित केले की, जे जे शिक्षक, अधिकारी व इतर कर्मचारी घरभाडे घेतात, त्यांच्याकडून त्यांच्या राहत्या पत्त्याविषयी स्वतःची संपूर्ण माहिती उपलब्ध करुन घेण्यात येईल. तसेच त्यातील खोटी माहिती आढळून आल्यास कायद्यान्वये योग्य ती कारवाई करणे आवश्यक आहे. या स्वतःच्या माहितीच्या प्रपत्रामध्ये मालकाचे नाव, पत्ता व इतर सविस्तर माहिती यांचे रकाना समाविष्ट करण्यात येईल.

यावर समितीने असे निदेश दिले की, स्व-निवासाचा पत्ता व इतर माहिती असे बंधपत्र अधिकारी-कर्मचारी शिक्षक यांच्याकडून करुन घेण्यात यावे व त्याप्रमाणे घरभाडे देण्यात यावे तसेच पत्ता योग्य नसेल तर कारवाई करण्यात यावी. जर घरमालकाच्या खात्यामध्ये घरभाडे वर्ग करण्याकरीता घरमालकाचे नाव, पत्ता, खाते क्रमांक, आधार कार्ड नंबर वगैरे सर्व माहिती कर्मचा-यांकडून संकलित करण्यात यावी, त्याप्रमाणे त्यांचा घरभाडे भत्ता देण्यात यावा, अशी शिफारस करण्यात येत आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस याबाबत समितीच्या शिफारशीप्रमाणे कारवाई करण्यात येईल असे सुचित केले.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नाशिक जिल्हा परिषदेला भेट दिली असता सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या चर्चेदरम्यान जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे विचारणा केली असता जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये अनेक प्रकारच्या त्रुटी आढळून आलेल्या आहेत. तेथे शाळांमध्ये शौचालयांची कमतरता असून, शौचालयांची स्वच्छता होत नसणे, त्यांचा विद्यार्थ्यांकडून वापर होत नसणे, इत्यादी गंभीर बाबी आढळून आल्या आहेत. या बरोबरच मुख्यालयी शिक्षक देखील रहात नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या संदर्भात समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता, उक्त साक्षीच्यावेळी जिल्हा परिषदेमधील शाळांमध्ये विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीकरिता शिक्षकांनी मुख्यालयी राहणे आवश्यक आहे. तद्वतच शिक्षकांच्या उपस्थितीकरिता शाळांमध्ये संगणकाद्वारे उपस्थिती दर्शविण्याकरिता (बायोमॅट्रीक) स्थापन करण्याबाबत शासनाची भूमिका काय आहे. **त्याचप्रमाणे बहुतेक शिक्षक सरपंच, पोलीस पाटील यांनी दिलेले मुख्यालयी राहण्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करुन मुख्यालयी राहतात अशा शासकीय अभिलेख्यात नोंदी करतात व त्या आधारे घरभाडे भत्ता मिळवतात इत्यादी बाबी समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणल्या असता विभागीय सचिवांनी शिक्षक मुख्यालयी रहात असले तरी आपण संबंधित शिक्षकाला घरभाडे भत्ता देतो अशा वेळी शिक्षक मुख्यालयी राहण्याबाबत प्रमाणपत्र सादर करतात व त्या आधारे त्यांना सदर शिक्षक मुख्यालयी राहात असल्याचे गृहित धरण्यात येते. सदरची बाब अत्यंत गंभीर असून नियमात कोणतीही तरतूद नसताना गावच्या पोलीस पाटील अथवा सरपंचाचे शिक्षक मुख्यालयी राहात असल्याबाबतचे खोटे प्रमाणपत्र सादर करीत असून त्या आधारे घरभाडे भत्ता घेणे व त्या आधारे मुख्यालयी राहात असल्याचे खोटे प्रमाणपत्र सादर करुन या प्रकरणी पोलीस पाटील, सरपंच आणि शिक्षक हे तिन्ही दोषी आहेत असे समितीला प्रकर्षाने नमूद करावेसे वाटते. सदरची बाब कायदा करुनही शक्य होणार नाही. अनेक शिक्षकांच्या अडचणी जरी असल्या तरी विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे या दृष्टीने शिक्षक मुख्यालयी राहणे अत्यंत आवश्यक आहे असे समितीचे मत आहे.**

**जिल्हा परिषदेच्या शाळांतील विद्यार्थ्यांची गुणवत्ता विचारात घेता शिक्षकांना मुख्यालयी राहणे आवश्यक आहे. परंतु घरभाडे भत्ता हा शिक्षकांच्या वेतनातून जमा होत आहे. हे टाळण्यासाठी शिक्षक खरोखरच मुख्यालयी राहतात किंवा कसे यासाठी बायोमॅट्रीक यंत्रणा याबरोबरच शिक्षकांचा घर भाडे भत्ता त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा झाल्यास शिक्षकांनी सादर केलेल्या खोट्या प्रमाणपत्रावर आळा बसेल असे समितीला प्रकर्षाने वाटते. त्याचप्रमाणे शिक्षकांकरवी ग्रामपंचायतीचे सरपंच, पोलीस पाटील अथवा अन्य कोणत्याही व्यक्तीद्वारे शिक्षक मुख्यालयी राहतात असा दाखला या पुढील काळात गृहीत धरुन संबंधित शिक्षकांना घरभाडे भत्ता देण्यात येऊ नये. वस्तुतः संबंधित शिक्षक मुख्यालयी राहत असेल तरच त्याला घरभाडे भत्ता देण्यात यावा, यासंदर्भात विभागाने योग्य ती कारवाई करावी. त्याचप्रमाणे शाळांमध्ये शौचालयांचा दर्जा विचारात घेता त्याबाबत जिल्हा परिषदेने एक सर्वंकष आढावा घेऊन प्रत्येक शौचालयाची स्वच्छता व त्याचा वापर योग्य कसा राहील व विद्यार्थी संबंधित शाळांतील शौचालयांचा वापर नियमितपणे कसा करतील या बाबतची दक्षता घेऊन त्या बाबतची ठोस कार्यवाही जिल्हा परिषदेने करण्याबाबत शासनाने सर्वंकष शासन निर्णय निर्गमित करावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबतची कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

## निफाड तालुक्यातील घरकुल योजनाबाबत

## (पंचायत समिती निफाड)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-२०१३ मध्ये इंदिरा आवास घरकुल योजनेंतर्गत एकूण किती घरकुले बांधण्यात आली, या योजनेंतर्गत किती घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आला, उर्वरित लाभार्थ्यांना ताबा न देण्याची कारणे काय आहेत, उप अभियंता यांनी प्रमाणित न केल्यामुळे किती लाभार्थ्यांना घरकुलांचा ताबा मिळाला नाही, याबाबत सन २०१२-२०१३ मध्ये इंदिरा आवास घरकुल योजनेंतर्गत एकूण १०९० घरकुले मंजूर होती. यापैकी १०३९ घरकुले पूर्ण केली. ५१ घरकुले प्रगतीपथावर आहेत. माजलगांव आणि बामळगांव येथे जागेची खूप अडचण आहे. तेथे १७४ घरकुले मंजूर झाली होती, परंतु जिल्हाधिका-यांच्या परवानगीसाठी पाठपुरावा सुरु आहे. त्यांचे पैसे अबाधित ठेवून ते शासनास परत केलेले आहेत.

जागेअभावी घरकुलाची योजना राबविता आली नाही काय अशी समितीने विचारणा केली असता जागेअभावी घरे बांधता आली नाहीत अशी माहिती समितीला देण्यात आली.

एखाद्या गावाच्या ठिकाणी गायरान जमीन उपलब्ध असेल तर इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुलांना परवानगी देण्याबाबत समितीमार्फत शासनाकडे शिफारस करण्यात येईल. तसेच निफाड तालुक्यातील कोठुरे येथे १७४ घरकुलांना शासनाकडून तातडीने जमीन देण्यासंदर्भातील हा विषय आहे. या विषयासंदर्भात महसूल विभाग आणि ग्रामविकास विभागाच्या सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे समितीने सूचित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) निफाड तालुक्यातील मौजे मांजलगाव,नांदगाव व कोठूरे येथे १७४ घरकुलांना शासनाकडून तातडीने जमीन देण्यासंदर्भात जिल्हाधिकारी स्तरावर पाठपुरावा सुरू असून त्याबाबत पुढे कोणती कार्यवाही करण्यात आली?

(२) एखाद्या गावाच्या ठिकाणी गायरान जमीन उपलब्ध असेल तर इंदिरा आवास योजनेंतर्गत घरकुलांना परवानगी देण्याबाबत शासनाची नेमकी भूमिका काय आहे ?

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

निफाड तालुक्यातील मौजे मांजरगाव (मांजलगाव) व कोठूरे नांदगाव येथे १७४ घरकुले जागे अभावी अपूर्ण होती. त्यापैकी ५९ घरकुलांना गावठाण व स्वतःची जागा उपलब्ध झाल्याने ती घरकुले पुर्ण करण्यात आलेली आहेत. तसेच मौजे कोठूरे येथील गट क्र.४६० हा ग्रामपंचायत गावठाणाकडे वर्ग झाला असून त्याबाबतचा तहसिलदार,निफाड यांचे दि.१६.११.२०१७ चे आदेश प्राप्त झाले असून गट क्र.४६० सरपंच,ग्रामपंचायत,कोठूरे या नावाने आहे. ग्रामपंचायतीने मंजूर ११५ घरकुलांचे बांधकाम सुरू केले असून सदर काम प्रगतीपथावर आहे.

**उपरोक्त मुद्यासंदर्भात ग्रामविकास विभागाकडून खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय (योजना-१०)**

(१) जिल्हा परिषद, नाशिक यांच्या उत्तराशी सहमत. तसेच सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनी वरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

(२) सर्वांसाठी घरे-२०२२ या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील निवासी प्रयोजनासाठी केलेली अतिक्रमणे नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये गायरान जमिनीचा देखील समावेश आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीला मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दिनांक १६.११.२०१७ च्या तहसिलदार यांच्या आदेशानुसार सदर जागा मिळालेली आहे. ११५ घरकुलांपैकी १०३ घरकुलांचे बांधकाम सुरु झालेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, महसूल विभागाकडून जागा मिळालेली आहे का, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदर जागेचा प्रश्न मिटलेला आहे. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, संपूर्ण राज्यातील सर्व जिल्हा परिषदेचा हाच प्रश्न आहे. पंतप्रधान आवास योजना, शबरी आवास योजना, रमाई आवास योजना या सर्व योजनेंतर्गत तयार होणा-या घरकुलांच्या जागेचा प्रश्न उद्‌भवत आहे. या सर्व योजनांची घरे ही अतिक्रमण केलेल्या जागेवरच होत आहेत. राज्यातील कुटुंबाची संख्या मोठया प्रमाणावर वाढलेली आहे. ग्रामविकास विभागाच्या नियमानुसार सदर घरकुलाचे बांधकाम करण्यासाठी २७० फुटांच्या जागेची आवश्यकता आहे, असे असताना अतिक्रमणे नियमानुकूल करणे हा एक भाग आहे. दुसरा भाग म्हणजे संबंधित लाभार्थ्यांना जागा उपलब्ध करुन देणे. "एफ" क्लास मधील जागा देण्याचे अधिकार माननीय जिल्हाधिकारी यांना आहेत. पण " ई " क्लास मधील जागा देण्याचे अधिकार माननीय जिल्हाधिकारी यांचे नाहीत. त्यामुळे " ई " क्लासमधील जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासंदर्भात शासनाचे काय धोरण आहे. या संदर्भातील धोरण करण्याचे प्रस्तावित आहे का, समिती सदस्यांच्या जिल्हयामध्ये अशा प्रकारची ५ हजार प्रकरणे प्रलंबित आहेत. त्याचे कारण असे की, संबंधित लाभार्थ्यांना घरकुल बांधण्यासाठी जागाच उपलब्ध नाही. राज्यातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांच्या घरी घरकुलांच्या जागेच्या मागणीसाठी लोक येतात. सदर लाभार्थी हे तालुका व जिल्हा स्तरावर पाठपुरावा करुन शेवटी लोकप्रतिनिधींकडे येतात अशा सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाकडे अधिकारी देखील लक्ष देत नाहीत ही गंभीर बाब आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अतिक्रमणे नियमानुकूल करण्यासंदर्भातील धोरण शासनाने निश्चित केले आहे. सदरहू धोरणास मंत्रिमंडळांनी मान्यता दिलेली आहे. सदर मान्यतेचा कच्चा मसुदा तयार करण्यात आलेला आहे. सदर शासन निर्णयामध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, जर एखाद्या गावातील गायरान जागेवर अतिक्रमण केले असेल तर अशा ठिकाणच्या जागेवरील अतिक्रमणे नियमानुकूल करणे किंवा त्या जागेतील लोकांसाठी नवीन जागा शोधून त्या जागेचे ले-आऊट करुन त्या जागेवर संबंधित लोकांना स्थलांतरित करावे. ज्या लाभार्थ्यांना नवीन जागेवर स्थलांतरित करावयाचे आहे अशा लाभार्थ्यांकडून पुर्वीच्या नियमानुसारच पैसे आकारले जातील. अशा प्रकारचा निर्णय घेण्याचे अधिकार ग्रामपंचायतीस दिलेले आहेत. जर एखाद्या ग्रामपंचायतीने असा निर्णय घेतला की, आम्ही या सर्व लोकांना नवीन जागा विकत घेऊन त्या जागेवर या लोकांना स्थलांतरित करावयाचे आहे. अशा वेळी सदर जागा विकत घेण्यासाठी लागणारा निधी हा काही प्रमाणात संबंधित लाभार्थ्यांकडून घेतला जाईल व उर्वरित निधी हा पंडीत दीनदयाल उपाध्याय योजनेतून दिला जाईल. राज्यातील ९० टक्के लोक हे जुनीच जागा नियमित करण्याची मागणी करीत आहेत. या संदर्भात ग्राम विकास विभागानी ग्राम पंचायतींना असे सांगितले आहे की, संबंधित ग्रामपंचायतींच्या कार्यकक्षातील जुन्या जागेपेक्षा दुप्पट जागा शोधावी व ती जागा गायरान जमीन म्हणून घोषित करावी अशा मागणीचा प्रस्ताव माननीय जिल्हाधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावा. संबंधित लाभार्थ्यास पर्यायी जागा उपलब्ध करुन देण्याचे धोरण शासनाने निश्चित केले आहे. गायरान मधील जागा बदलण्याचे प्रस्ताव शासनाकडे येत होते, त्यात बदल करुन सदर अधिकार हे माननीय जिल्हाधिकारी यांना देण्यात आले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, सदर जागेवर नियंत्रण व या सर्व योजनेची अंमलबजावणी करण्याचे अंतिम अधिकार कोणाचे आहेत, यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या संदर्भात तालुका स्तरावर एसडीओ यांच्या अध्यक्षतेखाली एक कमिटी स्थापन केलेली आहे. तहसिलदार व गट विकास अधिकारी या समितीचे सदस्य असून त्यांना सर्व अधिकार दिलेले आहेत. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, अतिक्रमणे नियमित करण्याचे अधिकार या कमिटीस देण्यात यावेत. यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अतिक्रमणे नियमित करण्याचे सर्व अधिकार या कमिटीस दिलेले आहेत, परंतु गायरान जमीन नियमानुकूल करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी आणि राज्य शासनाकडेच आहेत.

यावर प्रधान सचिव, महसूल विभाग यांनी समितीस विदित केले की, सद्यःस्थितीमध्ये गायरान जमिनीच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारे विनियोग करावयाचे असेल तर त्याचे सर्व अधिकार शासन स्तरावरच राखून आहेत. मात्र आता मागील हिवाळी अधिवेशनामध्ये या संदर्भातील कायद्यामध्ये एक बदल केलेला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, जर सार्वजनिक

प्रकल्प किंवा प्रयोजन असेल तर त्याकरिता गायरान जमीन आवश्यक असल्यास त्या संदर्भातील निर्णय घेण्याचे अधिकार शासनाकडे आहेत. अशा प्रकारचे निर्णय घेण्याचा अधिकार माननीय जिल्हाधिकारी यांना देण्यात यावेत. या बाबतीतील निर्णय लवकरच अपेक्षित आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, मागील १० ते २० वर्षापूर्वी ग्राम पंचायतीने ठराव करुन गायरान जागा देऊन त्या जागेवर शासकीय घरकूल बांधले आहेत. अशा प्रकारची गायरान जमिनीवरील घरकुले मोठया प्रमाणावर आहेत यावर शासन निर्णय काय घेणार आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीस विदित केले की, अशा सर्व घरकुलांना सार्वजनिक प्रयोजन घोषित करावे लागेल किंवा या संदर्भातील निर्णय घेण्याचे सर्व अधिकार राज्य शासनाचे आहेत. त्यामुळे राज्य सरकार अशा प्रकारचे घरकुले स्वतः मंजूर करुन देतील. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, ग्रामपंचायतीने ठराव घेऊन आणि शासकीय अनुदानातून पण गायरान जागेत बांधलेल्या घरकुलासंदर्भात शासन काय निर्णय घेणार आहे. अशा लोकांना नवीन जागेवर स्थलांतरित करणार किंवा नवीन वसाहत तयार करणार अथवा तीच जागा नियमानुकुल करणार आहात, यावर सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस विदित केले की, या संदर्भातील निर्णय घेण्याचे अधिकार ग्राम पंचायतीला देण्यात आलेले आहेत. ग्राम पंचायतीच्या निर्णयानुसार तेथील लोकांना नवीन ठिकाणी स्थलांतरित करावयाचे की, त्याच ठिकाणी ठेवायचे या संदर्भातील योग्य तो निर्णय ग्राम पंचायत घेईल व तो प्रस्ताव राज्य शासनाकडे किंवा जिल्हाधिकारी यांच्याकडे जाणार यावर सर्व अवलंबून असून या संदर्भातील निश्चित निर्णय झालेला नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, प्रधान मंत्री आवास योजनेअंतर्गत घर बांधावयाचे आहे. संबधित व्यक्तीकडे घर बांधण्यास जागा उपलब्ध नाही अशा लोकांना गायरान किंवा "ई" क्लास मध्ये घरे बांधण्यासंदर्भात मंत्रिमंडळाने जे धोरण निश्चित केले आहे. सदर धोरणास सन २०११ चा सुप्रिम कोर्टाचा निर्णय अडचणीत आणू शकतो का, प्रधानमंत्री आवास योजनेच्या माध्यमातून बांधण्यात येणारी घरकुले ही सार्वजनिक प्रयोजन म्हणून घोषित करता येऊ शकतात का, यावर प्रधान सचिव, महसूल विभाग यांनी समितीस विदित केले की, गायरान जमिनीवर जी अतिक्रमणे आहेत, त्याबद्दल सचिव, ग्राम विकास विभाग यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. समितीचा प्रश्न असा आहे की, शासकीय योजनेतून बांधल्या जाणा-या घरांना गायरान जागा उपलब्ध होऊ शकते की नाही या संदर्भात महसूल विभागाने विधी व न्याय विभागाकडून सल्ला घेतलेला आहे. त्यावर विधी व न्याय विभागाने असे सांगितले की, जर अन्य शासकीय जागा अशा प्रकल्पांकरिता उपलब्ध नसेल आणि सदर योजना शासनाने विवक्षित वर्गाकरिता गृह निर्माण योजना म्हणून जाहीर केली असेल अशा दोन्ही बाजूची पूर्तता होत असेल तर अशा प्रकारची घरकुल योजना सार्वजनिक प्रयोजनामध्ये मोडेल. ज्याअर्थी, ही जागा सार्वजनिक प्रयोजनामध्ये मोडेल त्याअर्थी, अशा घरकुलांसाठी गायरान जमिनीचा वापर करु शकतो. सदर माहिती विधी व न्याय विभागाने दिली आहे. या दोन्ही गोष्टीची पूर्तता होत असेल तरच या जागेचा वापर करु शकता असे सांगण्यात आले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ मध्ये इंदिरा आवास घरकुल योजनेअंतर्गत पंचायत समिती निफाड मध्ये एकूण १९९० घरकुले मंजूर होती. यापैकी १०३९ घरकुले पूर्ण केली आणि ५१ घरकुले प्रगतीपथावर असून मालेगाव आणि नांदगाव येथे जागेची अडचण असल्यामुळे येथे १७४ घरकुल मंजूर असूनही त्याची बांधणी झाली नाही. सदरील घरकुलासाठी जागेचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे पाठविला असून तो मंजूर होण्याबाबत पाठपुरावा सुरु आहे. या संदर्भात जिल्हापरिषदेकडून असे सांगण्यात आले की, जागेअभावी एकूण १७४ घरकुल अपूर्ण होती त्यापैकी ५९ घरकुले गावठाण व स्वतःची जागा उपलब्ध झाल्याने सदर घरकुले पूर्ण करण्यात आली आहेत आणि कोठूरे ग्रामपंचायतीने मंजूर ११५ घरकुलांचे बांधकाम सुरु केले असून ते प्रगतीपथावर असल्याचे समितीला सांगण्यात आले.

समितीने विभागीय साक्षीच्या वेळी पंतप्रधान आवास योजना, शबरी आवास योजना, रमाबाई आवास योजना इत्यादी सर्व योजनांकरिता शासनाच्या विविध योजना कार्यरत आहेत. सर्वांसाठी घरे २०२२ च्या या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी ग्रामीण भागातील शासकीय जमिनीवरील नवीन प्रयोजनासाठी केलेले अतिक्रमण नियमानुकूल करण्याच्या धोरणात सुधारणा करण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. यामध्ये गायरान जमिनींचा सुध्दा समावेश आहे. सदर धोरणाच्या अनुषंगाने शासन निर्णय निर्गमित करण्याची कार्यवाही सुरु आहे असे समितीला सांगण्यात आले. हा प्रश्न संपूर्ण राज्यातील असल्यामुळे आणि बेघरांना घरे मिळावीत असे शासनाचे धोरण असल्यामुळे राज्यातील कुटुंबाची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढलेली असल्यामुळे व अनेक ठिकाणी जागेची अडचण असल्यामुळे शासनाने पंडित दिनदयाळ उपाध्याय योजनेद्वारे ५०,००० रुपयांची तरतूद करुन जागा विकत घेण्याबाबत उक्त शासन निर्णयात नमूद केलेले आहे. गावात किंवा ग्राम पंचायतीच्या हद्दीत

ई-क्लासमधील जागा देण्याचे अधिकार जिल्हाधिका-यांना असून ई-क्लासमधील जागेबाबतचे धोरण शासनाने ठरवावयाचे आहे. जागेअभावी अनेकांना घरे दिली जात नाहीत, ही देखील वस्तु:स्थिती समितीसमोर आलेली आहे. काही ठिकाणी काही ग्रामपंचायतीमध्ये जागेचा भाव एका गुंठ्याला ५०,०००/- रुपयांपेक्षा महाग आहे ही देखील वस्तुस्थिती समोर आली आहे.

**अपूर्ण घरकुलांची स्थिती विचारात घेता तसेच अनेक गावांमध्ये जागेची अडचण विचारात घेता काही व्यक्तींनी संबंधित गावाच्या गावठाणांवर, गायरान जमिनीवर, " ई " क्लास जमिनीवर, " एफ " क्लास जमिनीवर जागा उपलब्ध असल्यास तशी मागणी केली असल्यास अथवा त्या जागेवर पूर्वीपासूनच संबंधित लाभार्थ्यांचे कच्चे अथवा मातीचे घर असल्यास संबंधित लाभार्थ्यास त्यावर तातडीने घर देण्यासंदर्भात शासनाने निर्णय घ्यावा. शासकीय जमिनीवर बांधकाम असल्यास बेघर व्यक्तीस शासनाच्या वेगवेगळ्या निर्णयाचा आधार घेऊन त्याच घरकुलाचे बांधकाम मंजूर करुन पूर्ण करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात यावा व या जागेवर संबंधित बेघरांचे कच्चे अथवा मातीचे घर असल्यास व त्याचे शासकीय योजनेतून घरकुल मंजूर झाले असल्यास त्याने मागणी केलेल्या त्याच जागेवर घरकुल कसे पूर्ण होईल याबाबत ग्रामविकास व महसूल विभागाने समन्वयाने निर्णय घेऊन त्या दृष्टीने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

## प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

### नाशिक जिल्ह्यातील पंचायत समित्यांमधील अफरातफर व गैरव्यवहाराबाबत

समितीने दिनांक ६ मे, २०१६ रोजी नाशिक जिल्ह्यातील सिन्नर, निफाड, मालेगांव, नांदगाव, इगतपुरी व येवला या पंचायत समित्यांना भेटी देऊन सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ मधील प्रश्न क्रमांक १५ वर गटविकास अधिकारी यांना पंचायत समितीमध्ये सन २०१२-२०१३ मध्ये गैरव्यवहाराची किती प्रकरणे उघडकीस आली, प्रकरणनिहाय गैरव्यवहाराचे स्वरुप काय आहे व त्यात गुंतलेली रक्कम तसेच अधिकारी/कर्मचारी किती आहेत व यापैकी किती प्रकरणे निकालात काढण्यात आली, ब) प्रलंबित प्रकरणांपैकी किती प्रकरणांची चौकशी झाली आहे व किती प्रकरणे जिल्हा परिषदेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली, क) सन २०१२-२०१३ पूर्वी उघडकीस आलेली, परंतु अद्याप निकालात न निघालेली प्रकरणे किती व ती प्रलंबित राहण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता यावर गटविकास अधिकारी यांनी खालील प्रमाणे समितीस माहिती दिली.

**(१) पंचायत समिती, सिन्नर :-**

समितीने विचारलेल्या उपरोक्त प्रश्नाबाबत गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सिन्नर यांनी असे विदित केले की, सन २०१२-२०१३ पूर्वी उघडकीस आलेली ग्रामनिधीची प्रकरणे ५१ असून त्यापैकी ३५ प्रकरणे निकाली लागलेली आहेत. निकाली न निघालेली १६ प्रकरणे असून त्यांचेवर नोटिसा तसेच त्यांच्या मालमत्तेवर बोजा चढविणेची प्रक्रिया चालू आहे.

यावर समितीने अशी विचारणा केली की, सन २०१२-२०१३ ची ही प्रकरणे आहेत, यामध्ये अंदाजे किती रकमेचा अपहार झालेला आहे आणि या प्रकरणी खूप दिरंगाई झालेली दिसते. शासनाचे नुकसान झालेले आहे म्हणून संबंधितांवर कारवाई झाली पाहिजे. कायद्यातील तरतुदीनुसार जी कारवाई करणे शक्य असेल ती करावी व संबंधितांकडून रक्कम वसूल करावी. त्या रकमेवर व्याज आकारुन त्यासोबतच दंड लावून सदरची रक्कम वसूल करावी. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, सिन्नर यांनी असे विदित केले की, २२ लाख ४६ हजार रुपये अपहाराची रक्कम आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, २० प्रकरणी ज्या नोटिसा दिलेल्या आहेत, त्यांचा सविस्तर अहवाल समितीकडे सादर करावा. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

**(२) पंचायत समिती, निफाड :-**

समितीने उपरोक्त विचारलेल्या प्रश्नास गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड यांनी असे विदित केले की, सन २०१२-२०१३ मध्ये ७९१५ रुपयांचा अपहार झालेला असल्यामुळे या प्रकरणी ग्रामसेवक व एक कर्मचारी दोषी आढळून आले. संबंधितांकडून ७९१५ रुपये वसूल करुन प्रकरण निकाली काढलेले आहे. एकूण प्रलंबित प्रकरणे १०८ असून यापैकी ८ प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. ४१ प्रकरणांमध्ये वेतनातून व संबंधित पदाधिकारी व कर्मचारी यांच्या मालमत्तेवर बोजा चढविण्याची कार्यवाही केली आहे. ही कार्यवाही जानेवारी २०१६ पासून केलेली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, ४१ प्रकरणांमध्ये किती रक्कम अडकली आहे. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड यांनी असे विदित केले की, ३७ लाख ९५ हजार रुपये अडकले आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, ४१ प्रकरणे जानेवारी २०१२ ते २०१६ पर्यंत पाच वर्षे प्रलंबित होती. विहीत वेळेत ही कार्यवाही होणे आवश्यक होते. यामध्ये संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई केली पाहिजे. ही सर्व रक्कम वसूल करताना त्या रक्कमेवर व्याज लावून त्यासोबतच दंडही लावण्यात यावा. संबंधित अधिका-याची एक वेतनवाढ रोखता येईल. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, निफाड यांनी समितीस विदित केले की, सन १९६६ ते १९६७ या कालावधीतील ही प्रकरणे आहेत. या प्रकरणामध्ये ग्रामसेवक मयत आहे. बोजा चढविण्यासाठी कार्यवाही सुरु झालेली आहे. ४९ प्रकरणांमध्ये वेतनातून रक्कम वसूल केलेली आहे.

**(३) पंचायत समिती, मालेगांव :-**

समितीने उपरोक्त विचारलेल्या प्रश्नास गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनी असे विदित केले की, पंचायत समितीमध्ये २०१२-१३ मध्ये गैरव्यवहाराचे एकही प्रकरण उघडकीस आले नाही. मात्र ग्रामनिधीची ३५ व जवाहर

रोजगार योजनेची १० अशी एकूण ४५ प्रकरणे प्रलंबित आहेत. अगदी जूने १९६२ चे एक प्रकरण न्यायप्रविष्ट असल्यामुळे प्रलंबित आहे. या प्रकरणांमध्ये ५.८६ लाख रुपये गुंतले होते, त्यापैकी ४.९७ लाख रुपये वसूल केले असून उर्वरित रक्कम तीन महिन्यात वसूल करण्यात येईल.

यावर समितीने अशी विचारणा केली की, १३ प्रकरणे जिल्हा परिषदेकडे वर्ग केली त्याची सद्यःस्थिती काय आहे, तसेच प्रकरण निकाली निघाल्यास स्थानिक निधी लेखा विभागाला महिन्याभरात कळविता का, यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, मालेगांव यांनी असे विदित केले की, सर्व १३ प्रकरणे निकाली काढलेली आहेत. तसेच ग्रामपंचायतीमध्ये जो अपहार केलेला असतो त्याची रक्कम वसूल केल्यानंतर ५ नंबरची पावती दिली जाते. बँक खात्याच्या स्टेटमेंटची झेरॉक्स प्रत घेतली जाते व स्थानिक निधी लेखा विभागाला प्रक्रिया पूर्ण केली आहे असे कळविण्यात येते.

**(४) पंचायत समिती, इगतपुरी :-**

समितीने उपरोक्त विचारलेल्या प्रश्नास यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी यांनी असे विदित केले की, सन २०१२-१३ मध्ये गैरव्यवहाराची उघडकीस आलेली प्रकरणे निरंक आहेत. सन २०१२-१३ पूर्वीची ग्रामनिधीची ७ प्रकरणे अद्याप निकाली न निघालेली आहेत, त्यापैकी ६ प्रकरणांच्या संदर्भात न्यायालयात दावे दाखल आहेत. १ प्रकरण पंचायत समिती स्तरावर आहे. ६ प्रकरणे न्यायालयात दाखल झाली असल्यामुळे ती आम्ही निकाली काढू शकलेलो नाही. यावर समितीने अशी विचारणा केली की, संबंधितांच्या मालमत्तेच्या संदर्भात बोजा चढवावा, वेतनवाढ रोखावी, कोणतीही कडक कारवाई करावी मात्र पैसे वसूल करावेत आणि वसुलपात्र रक्कम किती आहे. यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, इगतपुरी यांनी समितीस असे विदीत केले की, सन २००८-०९ मध्ये ग्रामनिधीची एकूण २० प्रकरणे होती आणि त्यामध्ये रू.६०,४१० इतकी रक्कम गुंतली होती, त्यापैकी वसूल केलेली रक्कम रू.५१,५०६ होती, बोजा चढविलेली रक्कम रू८,९०४ आहे. एकूण रक्कम रू.६०,४१० इतकी आहे. जवाहर रोजगार योजनेच्या १६ प्रकरणांमध्ये रू.२,६४,४१४ इतकी रक्कम गुंतली होती, त्यापैकी रू.५९,५७८ इतकी रक्कम वसूल केली आहे. रू.२,०४,८३६ इतक्या रकमेच्या संदर्भात स्थावर मालमत्तेवर बोजा चढविला आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, ग्रामनिधीच्या ७ प्रकरणांत रक्कम कमी असेल तर वसुली करणे गरजेचे होते, ती वसुली किती झाली तसेच ही सर्व प्रकरणे किती सालची आहेत. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, रू १,४५१ वसूल केले आहेत. सदर प्रकरणे न्यायप्रविष्ट आहेत. सन १९९१, सन १९७५, सन १९८३ व सन १९८६ ची प्रकरणे आहेत. सेवानिवृत्त झालेले कर्मचारी आहेत. यावर समितीने असे निदेश दिले की, आपण ती प्रकरणे लवकर निकाली काढावीत. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदीत केले की, तत्संदर्भात कार्यवाही करतो.

**(५) पंचायत समिती, नांदगाव :-**

समितीने उपरोक्त विचारलेल्या प्रश्नास यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, नांदगाव यांनी असे विदित केले की, गैरव्यवहाराच्या प्रकरणामध्ये दोन सरपंच आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, ग्रामसेवक ७ आणि २ सरपंच गैरव्यवहाराच्या प्रकरणामध्ये अडकले आहेत. गैरव्यवहाराची पूर्ण रक्कम किती आहे. ही प्रकरणे केव्हापासून प्रलंबित आहेत. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तालुक्यातील पूर्ण गैरव्यवहाराची रक्कम ७ लाख ४९ हजार ७६५ रुपये आहे. सन १९९३-१९९४ ची ही प्रकरणे आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, संबंधितांच्या मालमत्तेच्या संदर्भात बोजा चढवावा, वेतनवाढ रोखावी, कोणतीही कडक कारवाई करावी मात्र पैसे वसूल करावेत.

**(६) पंचायत समिती, येवला :-**

समितीने उपरोक्त विचारलेल्या प्रश्नास यावर गटविकास अधिकारी, पंचायत समिती, येवला यांनी असे विदित केले की, अपहाराची एकूण १९ प्रकरणे होती, त्यापैकी ७ प्रकरणांमध्ये पूर्ण वसुली झालेली आहे. ५ प्रकरणांमध्ये अंशतः वसुली करण्यात आलेली आहे. ३ प्रकरणांमध्ये थकबाकी असून सदरची प्रकरणे निकाली काढण्यासाठी जिल्हा परिषदेकडे सादर केलेली आहे. एकूण रक्कम १४ लाख ३ हजार १९५ असून त्यापैकी ३ लाख ८४ हजार १३१ रुपयांची वसुली झालेली आहे. १० हजार रुपये वसुली करायचे बाकी आहेत.सदरची रक्कम लवकरात लवकर वसुल करावी असे समितीने निदेश दिले असता गटविकास अधिकारी यांनी समितीस होकारार्थी उत्तर दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) पंचायत समिती सिन्नर ग्रामनिधीच्या गैरव्यवहारात गुंतलेले व वसूल होणे बाकी असलेल्या रूपये १७,८३,९४० व जरोयोच्या रुपये ८,३३,६७१/- रुपयेची वसूल करणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे, तसेच मयत कर्मचा-याकडे गैरव्यवहारातील वसूली असलेल्या रक्कमांच्या वसूली बाबत शासनाच्या सूचना काय आहेत, असल्यास, त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

(२) निफाड पंचायत समिती अंतर्गत गैरव्यवहारात गुंतलेली परंतू वसुल होणे बाकी असलेली रक्कम किती आहे.सदरहू रक्कम वसूल करण्याकरिता कोणती कार्यवाही केली आहे.तसेच न्यायप्रविष्ट प्रकरणात वसुली करण्यात येऊ नये याबाबत न्यायालयाचे निर्णय आहेत काय तसेच न्यायप्रविट प्रकरणातील वसुलीबाबत शासनाच्या सुचना काय ?

(३) मालेगाव पंचायत समिती अंतर्गत ग्राम पंचायत सायने बु. व ग्रामपंचायत द्याने यांना महानगरपालीकेमध्ये समाविष्ट केल्यामुळे त्यामध्ये झालेल्या अफरातफर प्रकरणात गुंतलेली रक्कम रूपये ९०,११८/-वसूल करण्यात अडचणी येत असल्याची समितीची दिलेल्या माहिती वरून दिसून येत आहे.अशा प्रकरणांत कारवाई करण्याबाबत शासनाचे नियम मार्गदर्शन सुचना काय आहे,त्यानुसार शासनाचे नाशिक जिल्हा परिषदेची अडचण सोडविली आहे काय नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

(४) सन २०१२-१३ पुर्वीची ग्रामनिधीची प्रकरणे अद्याप निकाली निघाली नसल्याने सदर प्रकरणे निकाली काढणेबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

(५) पंचायत समिती, नांदगाव सन २०१२-१३ पूर्वीची ग्रामनिधीची प्रकरणे अद्याप निकाली निघालेले नसल्याने सदर प्रकरणे लवकर निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे. ?

(६) सन २०१२-१३ पुर्वीची ग्रामनिधीची प्रकरणे अद्याप निकाली निघालेली नसल्याने,सदर प्रकरणे लवकर निकाली काढण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात येत आहे ?

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१)पंचायत समिती सन २०१२-१३ या वर्षात एकही गैरव्यवहाराचे प्रकरण उघडकीस आलेले नाही. तथापी सन २०१२-१३ पूर्वीचे ग्रामनिधीचे ५१ प्रकरणे व जरोयो ३५ प्रकरणे :-

**ग्रामनिधी**

| तपशिल | एकूण ५१ प्रकरणाबाबत | | वसूल रक्कम | | | बाकी असलेली रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रकरण | एकूण रक्कम | कायम | संशयीत | एकूण | कायम | संशयीत | एकूण |
| १०० टक्के वसूल झालेले | ७ | ४६२२६७ | १०३७१ | ३५९१९६ | ४६२२६७ | - | - | - |
| वसूल बाकी | ८ | १४९८१५७ | ११५५२१ | ० | ११५५२१ | ५५५६९५ | ८२६९४१ | १३८२६३६ |
| मयत असल्याने वसूली बाकी | ८ | ३९१३०४ | - | - | - | ३५९२१४ | ३२०९० | ३९१३०४ |
| स्थानिक निधीकडे सादर केलेले | १४ | १८८०१२ | ९९२९५ | ८८७१७ | १८८०१२ | - | - | - |
| निकाली निघालेले प्रकरण | १४ | ७५६२६ | ७५६२६ | ० | ७५६२६ | ० | ० | ० |
| एकूण | ५१ | २६१५३६६ | ४३३५१३ | ४४७९१३ | ८४१४२६ | ९१४९०९ | ८५९०३१ | १७७३९४० |

**जरोयो**

| तपशिल | एकूण ३५ प्रकरणाबाबत | | वसूल रक्कम | | | बाकी असलेली रक्कम | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रकरण | एकूण रक्कम | कायम | संशयीत | एकूण | कायम | संशयीत | एकूण |
| १०० टक्के वसूल झालेले | ६ | ३२७९२६ | ५४१६१ | २७३७६५ | ३२७९२६ | ० | ० | ० |
| वसूल बाकी | १६ | ७६५२९६ | १७४३८५ | ० | १७४३८५ | ५१७९०६ | ७३००५ | ५९०९११ |
| मयत असल्याने वसूली बाकी | ४ | ४६०५६८ | १९७५ | ० | १९७५ | ४५८५९३ | ० | ४५८५९३ |
| स्थानिक निधीकडे सादर केलेले | ९ | ९६१३९ | ९६१३९ | ० | ९६१३९ | ० | ० | ० |
| एकूण | ३५ | १६४९९२९ | ३२६६६० | २७३७६५ | ६००४२५ | ९७६४९९ | ७३००५ | १४९५०४ |

तसेच मयत कर्मचा-याकडे गैरव्यवहारातील वसूल होणे बाकी असलेल्या रक्कमेबाबत ग्रामविकास विभाग शासन परिपत्रक क्र.पंरास/प्रक्र.२६/वित्त-९/मंत्रालय मुंबई दिनांक ८/६/२०१७ प्रमाणे मयत वगळता उर्वरित कर्मचारी बाबत वर नमुद प्रमाणे सद्यस्थितीत कारवाई केली आहे.

(२) निफाड पंचायत समिती अंतर्गत गैरव्यवहारात सन २०१५-१६ अखेर गुंतलेली रकम खालील प्रमाणे :—

| योजनेचे नाव | अपहारित रक्कम | | | पैकी वसूल | | | वसूल बाकी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रामनिधी | ११२९६४७१ | २३५८८०८८ | ३४८८४५५९ | ६९८७०२७ | ७२३४९२३ | १४२२१९५० | २०६६२६०९ |
| जरोयो | २९५१५६३ | २१६५०४७ | ५११६६१० | ८४४५५५ | ६६७४७१ | १५१२०२६ | ३५६८७७० |
| एकूण | १४२४८०३४ | २५७५३१३५ | ४०००११६९ | ७८३१५८२ | ७९०२३९४ | १५७३३९७६ | २४२३१३७९ |

वरील प्रमाणे वसूलपात्र एकूण रक्कम ग्रामनिधी व जरोयो सह एकूण ४,००,०१,१६९ असून त्यापैकी वसूल रक्कम १,५७,३३,९७६ झालेली आहे. वसूल बाकी रक्कम पैकी रक्कम रूपये १९,९९,२५१ रक्कम न्यायप्रविष्ट आहे. रक्कम रूपये २,२२,३२,१२८ वसूल बाकी आहे.वसूल करण्याकरिता कार्यरत ग्रामसेवक/ग्रामविकास अधिकारी यांच्या वेतनातून वसूलीबाबत कार्यवाही सुरू आहे.संशयीत रक्कमेचे प्रकरण समायोजन व निकाली काढणेस्तव प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरू आहे.

न्यायप्रविष्ट प्रकरणात वसुली करण्यात येऊ नये.याबाबत न्यायालयाचे कोणतेही आदेश अथवा निर्णय नाहीत. न्यायप्रविष्ट प्रकरणातील वसुली बाबत शासनाच्या कोणत्याही प्रकारच्या सुचना नाहीत.

(३) महानगरपालिकेमध्ये समावेश झालेल्या ग्रामपंचायतीमध्ये गुंतलेली अफरातफर रक्कम वसूलीसाठी शासनाचे स्वतंत्र नियम, शासन निर्णय, परिपत्रके, मार्गदर्शन सुचना नाहीत. ग्रामपंचायतीना अफरातफर रक्कम वसूलीसाठी जे शासनाचे नियम, शासन निर्णय, परिपत्रके लागू आहेत. त्यानुसार ग्रामपंचायत **सायने बु. व द्याने** यांचेकडील अफरातफर कायमस्वरूपी रक्कम रू.२८,३८२/- मात्र आता वसूल झालेली असून लेखा परिक्षणातील अप्राप्त प्रमाणके व कागदपत्राची संशयीत अपहार रक्कम

रु. ६१,७३६ मात्रची प्रमाणके व कागदपत्रे समायोजनासाठी आता प्राप्त झालेली आहेत. सदर एकूण गुंतलेली अफरातफर रक्कम रू.९०,११८ मात्र वसूल व समायोजनासाठी प्राप्त प्रमाणके कागदपत्रांमुळे ग्रामपंचायत **सायने बु. व द्यानेचे अपहार प्रकरणे** समायोजन व निकालीत काढण्यास्तव प्रस्ताव सादर करण्याची कार्यवाही पंचायत समितीस्तरावरून सुरू आहे.

(४) पंचायत समिती, इगतपूरी सन २०१२-१३ पुर्वीची ग्रामनिधीची एकूण २० प्रकरणे असून पैकी १४ प्रकरणात पुर्ण वसूली करण्यात आली आहे. दोन प्रकरणी ग्रामपंचायत घोटी येथील रू.१७३८१/- इतक्या रक्कमेचा बोजा व वाढीव हे येथील रू.४०१७९७/-बोजा पी.एस.पाटील तत्का ग्रामसेवक यांचे मालमत्ता वरचा समायोजन प्रस्ताव स्थानिक निधीकडे सादर करण्यात आलेला आहे. ग्रामपंचायत नांदगाव बु. येथील रु.२५२४३/- फांगुळगव्हाण येथील रू. २१४९७४/- व टाकेद बु. येथील रु. ९५८६७/- अशी एकूण रू.३९५१४४/-रकमेच्या समायोजन प्रस्तावांची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरू आहे.

(५) पंचायत समिती, नांदगाव सन २०१२-१३ पूर्वीची ग्रामनिधीची प्रकरणे असून जरोयोचे ३० प्रकरणे असे एकूण ४८ प्रकरणे आहेत. त्यात ग्रामनिधीचे १८ प्रकरणात रक्कम रू. ७६,५२,८३८ एवढी रक्कम गुंतलेली आहे. त्यापैकी रक्कम रू.१९२९७५ एवढी वसूल करण्यात आली असून शिल्लक रक्कम रू.७४५९८५२ इतकी वसूल होणे बाकी आहे. या प्रकरणामध्ये २३ ग्रामसेवक ६ सरपंच यांनी गैरव्यवहार केलेला आहे.

एकूण १८ पैकी ०४ प्रकरणाची वसूली झालेली असून १४ प्रकरणाची वसूली प्रलंबित आहे. प्रलंबित पैकी १ (नागपूर) येथील सरपंच व ग्रामसेवक यांचे विरूध्द मनमाड पोलीस ठाणे येथे दिनांक ०२.०८.२०१३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे उर्वरित प्रकरणाची वसूलीची व फौजदारी गुन्हे तसेच मालमत्तेवर बोजा चढविणे बाबतची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरू आहे.

जरोयो एकूण प्रकरणात २०४४२५७ इतकी रक्कम गुंतलेली आहे त्यापैकी रक्कम रू.८७०८५७ वसूल करण्यात आली आहे. शिल्लक रक्कम रू.११७३४०० वसूली होणे बाकी आहे. ३४ ग्रामसेवक व २० सरपंच यांनी गैरव्यवहार केलेला आहे, त्यापैकी २१ प्रकरणाची वसूली झालेली असून ०९ प्रकरणाची वसूली प्रलंबित आहे.उर्वरित प्रकरणाची वसूलीची व फौजदारी गुन्हे तसेच मालमत्तेवर बोजा चढविणेबाबतची कार्यवाही पंचायत समिती स्तरावर सुरू आहे.

(६) (१) पंचायत समिती येवला सन २०१२-१३ मध्ये १९ प्रकरणे उघडकीस आलेली आहेत.

(२) १९ प्रकरणामध्ये एकूण गुंतलेली रक्कम रूपये १३,७५,८०५/- एवढी आहे.

(३) एकूण अपहार प्रकरणात २४ अधिकारी व ७ पदाधिकारी असे एकूण ३१ आहेत.

(४) १९ प्रकरणापैकी एकूण वसूल रक्कम रूपये ५,१७,९६२/-आहे.

(५) एकूण वसूली बाकी रक्कम रूपये ८,५७,८४४/- आहे.

(६) त्यापैकी ७ प्रकरणे निकाली काढण्यात आलेली आहेत.

(७) स्थानिक निधी लेखा यांचेकडे ८ प्रकरणे पाठविण्यात आलेली आहेत.

(८) बोजा दाखल १ प्रकरण रक्कम रूपये १,५४,४८७/-

(९) उर्वरित ३ प्रकरणाची वसूलीची कार्यवाही वेतनातून सुरू आहे.

**ग्रामविकास विभागाचा अभिप्राय :-**

**(१) ते (६) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय** :- जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यावाहीशी शासन सहमत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

नाशिक जिल्ह्यातील पंचायत समितीमध्ये अपहार व गैरव्यवहाराबाबत मोठ्या प्रमाणावर रक्कम अपहारित झाली असून ती वसूल करण्याबाबत समितीने निदेश दिले होते. सदरची रक्कम पंचायत समिती सिन्नर मध्ये २२,४६,००० रुपये होती. पंचायत

समिती निफाडमध्ये ३७,९५,०००, पंचायत समिती मालेगांव मध्ये ५.८६ लाख रुपये, पंचायत समिती इगतपुरीमध्ये २,०४,८३६ रुपये, पंचायत समिती नांदगांव मध्ये ७,४९,७६५, पंचायत समिती येवला मध्ये १४,०३,००० इत्यादी रक्कम गैरव्यवहार अथवा अपहारामध्ये गुंतलेली आहे. सदरची रक्कम वसूल करण्याबाबत समितीने निदेश दिले असता त्यापैकी वसूल केलेली एकूण रक्कम ८,४१,४२६ असून वसुलीची बाकी असलेली रक्कम १७,७३,९४० इतकी आहे. एकूण अपहारित प्रकरणे ५१ असून त्यात गुंतलेली रक्कम २६,१५,३३६ इतकी आहे. त्यापैकी वसुली ८,४१,४२६ इतकीच केली असून वसुलीचे प्रमाण अत्यंत कमी आहे. याबाबत विचारणा केली असता काही प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असून काही प्रकरणांमध्ये अपहारीत व्यक्तींचा मृत्यू झाल्याचे समितीस विदित केलेले आहे. सदरचा अपहारित निधी हा शासनाचा असून तो कोणत्याही परिस्थितीत वसूल करण्याचे समितीचे मत आहे. तद्वतच अपहार करणा-यांना शास्तीदेखील होणे आवश्यक आहे. अपहाराची प्रकरणे वर्षानुवर्षे न्यायालयात प्रलंबित राहत असल्यामुळे शासनाचा निधी तसाच अडकून राहातो व अपहार करणारे कर्मचारीदेखील शासकीय सेवेत कायम असतात. त्यामुळे या कर्मचा-यांवर वेळीच कारवाई होत नाही. शासकीय योजनांच्या निधीमध्ये दिवसेंदिवस अपहाराच्या प्रकरणांची वाढ होत आहे. अपहार होऊ नये म्हणून शासनाने वेळोवेळी निर्णय घेतलेले आहेत व त्याद्वारे अनेक उपाययोजनादेखील केलेल्या आहेत. तरी देखील अपहारांच्या प्रकरणांची संख्या वाढतच आहे. समिती याबाबत तीव्र चिंता व्यक्त करते.

समितीने नाशिक जिल्हा परिषदेला भेट दिली असता गैरव्यवहारात गुंतलेल्या अथवा अपहारित रक्कम त्वरेने वसूल करण्यासंदर्भात निदेश दिले होते. तथापि, नाशिक जिल्हा परिषदेच्या अधिका-यांची दिरंगाई व वसुली करण्यासंदर्भात असलेली उदासिनता विचारात घेता समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करते. अपहारित रक्कम वसूल होत नसली तरी संबंधित कर्मचा-यांवर वेळीच गुन्हा दाखल करणे आवश्यक आहे. त्यासाठी रक्कम मोठी असणे आवश्यक आहे. जर रक्कम छोटी असेल तर संबंधित कर्मचा-यांची विभागीय चौकशी करुन त्याला त्वरेने शास्ती करुन त्याच्या रकमेच्या तुलनेत वेतनवाढी रोखून त्याच्यावर शास्ती करणे आवश्यक आहे, असे केल्याने शासनाची रक्कम देखील वसूल होईल व अपहार करणा-यांवर जरब देखील बसेल. तथापि, संबंधित कर्मचा-यांवर सुरु असलेली विभागीय चौकशीदेखील विहित मुदतीत पूर्ण होत नसल्यामुळे त्यातूनही ते सहीसलामत सुटतात असेही समितीच्या निदर्शनास आले आहे. **या सर्व बाबी विचारात घेता एखाद्या कर्मचा-याकडून रक्कम अपहारित झाल्यास ती त्वरेने वसूल होण्यासंदर्भात शासनाने त्याची विभागीय चौकशी सुरु करतानाच त्या रकमेच्या तुलनेत त्याच्या सेवेच्या वेतनवाढी रोखणे शक्य आहे काय किंवा कसे तसेच त्याची चौकशी त्वरेने करुन त्यावर आवश्यक ती शास्ती करुन रकमेची वसुली करण्यासंदर्भात तातडीने पावले उचलावीत व त्यादृष्टीने सुध्दा अस्तित्वात असलेल्या शासन निर्णयात काही कडक स्वरुपाच्या सूचना किंवा सुधारणा करणे आवश्यक असल्यास त्या करुन तसा शासन निर्णय निर्गमित करावा. राज्यात सर्वच जिल्हा परिषदांमध्ये अशा गैरव्यवहाराची व अपहाराची रक्कम मोठ्या प्रमाणावर आहे. परिणामतः शासन राबवित असलेल्या योजनांवर त्याचा विपरित परिणाम होत असून ज्या उद्देशाने शासन योजनांची अंमलबजावणी करते अशा अपहार अथवा गैरव्यवहारामुळे योजना राबविण्यात खीळ बसत असल्यामुळे अपहार अथवा गैरव्यवहार करीत असलेल्या व्यक्तीस जरब बसत नसल्याने वसुलीची कामे प्रशासकीय विभागाने तातडीने करण्यासंदर्भात तसेच योग्य तो शासन निर्णय निर्गमित करुन वसुलीची कारवाई विहित वेळेत करण्यासंदर्भात शासनाने तातडीने निर्णय घ्यावा अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावी.**

## प्रकरण चार

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

### जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिका-यांनी करावयाचे दौरे या बाबतच्या परिपत्रकात सुधारणा करण्याबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी अशी माहिती दिली की, दिनांक ३१ जुलै, १९८६ चे जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिका-यांनी करावयाच्या दौ-यांबाबत शासन परिपत्रक आहे. परंतु ते अन्यायकारक असल्यामुळे त्यात बदल होणे अत्यावश्यक आहे. गटविकास अधिकारी तसेच इतर अधिकारी असो त्यांनी किमान १८० दिवस दौरा करायचा तसेच दौ-याच्या वेळी किमान १२० दिवस दौ-याच्या ठिकाणी मुक्काम करायचा असे परिपत्रकात नमूद केलेले आहे. परंतु या संदर्भात अनेक अडचणी येत असतात. यामुळे त्या परिपत्रकात सुधारणा करणे गरजेचे आहे. यावर समितीने असे निदेश दिले की, सदर परिपत्रकात नेमका कसा बदल असायला पाहिजे याबाबत प्रत्येक विभागातील जिल्हा परिषद निहाय सविस्तर टिप्पणी तयार करुन समितीकडे सादर करावी.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिका-यांनी करावयाचे दौरे व रात्रीचे मुक्काम या संदर्भात दि.२१ जुलै, १९८६ मध्ये सूचना असून त्यात अडचणी असल्याबाबतची माहिती समितीस देण्यात आली होती. त्यानुसार उक्त परिपत्रकात यथायोग्य बदल/सुधारणा करण्यासंदर्भात शासनाची भूमिका काय आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास-१०८५/प्र.क्र.१७२९/५७ दिनांक २१ जुलै, १९८६ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिका-यांनी करावयाचे दौरे व रात्रीचे मुक्काम निश्चित करण्यात आलेले आहेत.

सदर परिपत्रक १९८६ साली निर्गमित केले गेले त्यावेळी दळणवळण व संपर्क साधनांच्या अडचणी होत्या त्या अनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिका-यांनी करावयाचे दौरे व रात्रीचे मुक्काम निश्चित करण्यात आलेले होते. परंतु सद्यःस्थितीला दळणवळण व संपर्क साधने यात मोठ्या प्रमाणात सुधारणा झालेली आहे. यास्तव दौरे व रात्रीचे मुक्काम यांची संख्या कमी करण्यास हरकत नाही.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-**

ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग शासन परिपत्रक क्रमांक पंरास-१०८५/प्र.क्र.१७२९/५७ दिनांक २१ जुलै, १९८६ नुसार जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिका-यांनी करावयाचे दौरे व रात्रीचे मुक्काम निश्चित करण्यात आलेले आहेत. सदर परिपत्रक १९८६ साली निर्गमित केले गेले त्यावेळी दळणवळण व संपर्क साधनांच्या अडचणी होत्या त्या अनुषंगाने जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिका-यांनी करावयाचे दौरे व रात्रीचे मुक्काम निश्चित करण्यात आलेले होते. परंतु सद्यःस्थितीला ई-मेल, फॅक्स, टेलिफोन, व्हॉट्सऍप व अद्ययावत दळणवळण व संपर्क साधने यात मोठ्या प्रमाणात सुधारणा झालेली आहे. त्यामुळे जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिका-यांना प्रशासकीय कामासाठी मोठ्या प्रमाणात दौरे करण्याची आवश्यकता नाही. यास्तव दौरे व रात्रीचे मुक्काम यांची संख्या कमी करण्यास हरकत नसावी.

### विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी

समितीने अधिका-यांनी करावयाचे दौरे व रात्रीचे मुक्काम हा विषय चर्चेला घेण्यात आला. सन १९८६ मधील संभाषणाच्या आणि सध्याची वस्तुस्थिती यामध्ये फरक झालेला आहे. परिपत्रकात सुधारणा करणे आवश्यक आहे असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला सांगितले. ग्रामीण रुग्णालयामध्ये डॉक्टर तसेच शिक्षक, तलाठी, ग्रामसेवक हे कार्यालयात उपस्थित नसतात. याबाबत मुख्यालयी राहत नसलेल्या कर्मचा-यांना घरभाडे भत्ता देय नाही असे परिपत्रक निघाले आहे असे समितीने सांगितले. आपण सर्व्हे करुन जे कर्मचारी/अधिकारी कार्यालयात उपस्थित राहत नाहीत, त्यांच्या बचत खात्यातून रक्कम वसूल केल्यास सर्वजण नियमितपणे काम करतील असे समितीचे म्हणणे आहे. भरारी पथकाच्या माध्यमातून भेटी देण्यात याव्यात अशी सूचना समितीने केली असता अशाप्रकारची भेट दिली होती असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीस सूचित केले.

शासनाने नेमून दिलेल्या भेटी खाते प्रमुखांकडून पूर्ण करण्यात येत नाहीत, याबाबत संबंधितांवर कारवाई करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला माहिती दिली. मुख्यालयी राहणे आणि भेटी देण्यासंबंधातील दोन वेगवेगळे विषय आहेत. मुख्यालयी राहण्यासंबंधात कोणत्याही प्रकारची शिथिलता आणता येणार नाही. पूर्वी दळणवळणाची साधने नव्हती, आता साधने चांगल्या प्रकारे उपलब्ध झाली असल्याने बाब पुन्हा तपासणे आवश्यक आहे असे वाटते. अशा प्रकारची परिपत्रके महसूल विभागासह अन्य विभागांची देखील आहेत. भेटी आणि रात्रीचा मुक्काम कमी करावा याबाबत विभागांशी अनौपचारिक चर्चा करुन परिपत्रक निर्गमित करण्यात येईल. तसेच शासनाच्या निर्णयाची अंमलबजावणी होत नसेल तर संबंधितांवर कारवाई करणे आवश्यक आहे असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला माहिती दिली.

पंचायत समिती स्तरावर बैठका होत असतांना उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. या संबंधात नियमामध्ये तरतूद करावी असा समितीने प्रश्न उपस्थित केला असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खाते प्रमुखाला स्वतःचा प्रतिनिधी म्हणून नामनियुक्त करण्यात येतात असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला विदित केले असता या संबंधात एक परिपत्रक लवकरच निर्गमित करावे असे निदेश समितीने दिले.

## अभिप्राय व शिफारशी

समिती राज्यातील जिल्हा परिषदांना भेट देत असताना पंचायत समिती येथेही भेट देत असते. पंचायत समित्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या विभाग प्रमुखांनी पंचायत समितीच्या मासिक बैठकांच्या वेळी उपस्थित राहून सर्व संबंधितांना मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. तथापि, अनेक विभाग प्रमुख त्यांना नेमून दिलेल्या भेटी अथवा दौ-याच्या नियमांची पूर्तता करीत नाहीत, त्यामुळे पंचायत समिती राबवित असलेल्या अनेक योजनांमध्ये त्रुटी राहात असून गैरव्यवहाराचे प्रकार वाढीस लागलेले आहेत असे समितीचे मत आहे. समितीने जे अधिकारी पंचायत समितीच्या मासिक बैठकांना उपस्थित राहात नाहीत अशा अधिका-यांवर कारवाई करण्यासंदर्भात यापूर्वी जवळपास सर्वच जिल्हा परिषदांना निदेश दिलेले आहेत. परंतु तरी देखील संबंधित अधिका-यांकडून पंचायत समितीच्या मासिक सभेत उपस्थित राहण्याबाबतची दखल घेतली जात नाही. गेल्या ४ वर्षात समितीने अनेक जिल्हा परिषदांना भेटी दिल्या आणि त्यामध्ये प्रामुख्याने हा मुद्दा सर्वच पंचायत समितीमध्ये चर्चिला गेला. समितीत तशा विभाग प्रमुखांवर कारवाई करण्यासंदर्भात जसे की त्यांची एक तात्पुरती वेतनवाढ रोखून त्यांची सेवा पुस्तकात नोंद घेणे इत्यादी बाबीसंदर्भात उक्त निर्णय देऊनही संबंधित खाते प्रमुखांवर त्याचा काहीही परिणाम झालेला दिसून येत नाही, याबाबत समितीने कठोर निर्णय घेऊनही अधिकारी त्याची दखल घेत नसल्यामुळे समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करते. अधिका-यांना नेमून दिलेली जबाबदारी त्यांनी पार पाडणे आवश्यक आहे, असे समितीचे मत आहे. विभाग प्रमुखांनी पंचायत समितीच्या मासिक जिल्हा परिषदेच्या बैठकांना उपस्थित राहावे हा त्या त्या पंचायत समितीमधील विविध योजनांची अंमलबजावणी व्यवस्थितपणे पार पाडावी व गैरव्यवहारांच्या बाबींना आळा बसावा असा त्या मागचा उद्देश आहे. यासाठी **विभाग प्रमुखांनी महिन्यातून किमान एक भेट जिल्ह्यातील प्रत्येक पंचायत समितीला देणे आवश्यक आहे, असेही समितीचे ठाम मत आहे. तद्वतच प्रत्येक पंचायत समितीच्या मासिक सभेला देखील उपस्थित राहणे अनिवार्य आहे, असेही समितीला वाटते. याचे पालन करण्यासंदर्भात शासनाने कठोर उपाययोजना व संबंधित अधिका-यांवर शिस्तभंगाची कारवाई करण्यासंदर्भात तातडीने परिपत्रक निर्गमित करावे अशी समितीची शिफारस आहे. या बाबत केलेल्या कारवाईची माहिती समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

## कोल्हापूर बंधा-यांच्या कामांबाबत (पंचायत समिती त्र्यंबकेश्वर)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीने त्यांच्या उत्तरामध्ये गावतळे येथील ९ कामे मंजूर होती आणि त्यापैकी ७ कामे पूर्ण झाली व २ कामे जमीन हरकतीमुळे रद्द करण्यात आली असे सांगितले आहे. यावर गट विकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, शेतक-यांनी हरकत घेतल्यामुळे कामे रद्द केली आहेत. यानंतर समितीने अशी विचारणा केली की, कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याची २३ कामे मंजूर होती, ३ कामे पूर्ण झाली असून ९ कामांची अंतिम देयके विभागीय कार्यालयास सादर केली आहेत असे आपण सांगितले आहे. अंतिम देयके काम पूर्ण न करता कशी सादर केली व ११ कामांमध्ये किती रक्कम आहे, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, अंतिम देयके कामे पूर्ण झाल्यानंतर सादर केली आहेत. ११ कामांची चौकशी सुरू आहे. ११ कामे ३.९० लक्ष रुपयांची होती, त्यांना ४.१४ लक्ष रुपये दिले आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण जास्त पैसे का दिले ? त्याने काम देखील पूर्ण केलेले नाही.

यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, काम पूर्ण न केल्यामुळे त्यांचा मक्ता रद्द करण्याची कार्यवाही केली. तसेच संबंधितांना काळ्या यादीत टाकण्याचे काम सुरू आहे. ते न्यायालयात जाऊ नयेत म्हणून कार्यवाही सुरू आहे. मक्तेदार न्यायालयात जाऊ नयेत म्हणून २ उप अभियंत्यांमार्फत चौकशी सुरू आहे. त्यांनी दिलेले काम केलेले आहे की नाही हे २ उप अभियंत्यांकडून तपासून वसुली अंतिम करुन संबंधितांना काळ्या यादीत टाकल्यानंतर ११ टक्क्यांनी वसुली करण्याची कारवाई करणार आहोत. यावर समितीने अशी विचारणा केली की, काम केले नाही तर देयक कसे अदा केले. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, जेवढे काम केले आहे तेवढेच देयक अदा केले आहे.

यावर समितीने असे निदेश दिले की, या प्रकरणातील सर्व अधिका-यांची चौकशी केली पाहिजे. गट विकास अधिका-यांनी सर्व कामांची तपासणी करून जेथे अनियमितता आढळेल तेथे संबंधितांविरुध्द तात्काळ कारवाई करुन तत्संदर्भातील अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे द्यावा आणि तद्नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भातील सविस्तर अहवाल समितीला सादर करावा. तद्नंतर समिती सदर विषयाच्या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) कोल्हापूर बंधा-याची २३ कामे मंजूर होती. त्यापैकी ३ कामे पूर्ण झाली असून ९ कामांची अंतिम देयके विभागीय कार्यालयास सादर केली असल्याची माहिती समितीच्या निदर्शनास आणण्यात आली, सदर कामाची अंतिम देयके काम पूर्ण न करता कशी सादर केली.

(२) ११ कामांची सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय? गट विकास अधिका-यांनी सर्व कामांची तपासणी करुन या संदर्भातील सविस्तर अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केला आहे काय? तसेच सदर प्रकरणी अनियमितता आढळून आल्यास संबंधितांवर कारवाई करुन केलेल्या कारवाईचा अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्याबाबत सूचना दिलेल्या असून सदरहू अहवाल समितीला सादर करण्याबाबत समितीने दिलेल्या निदेशानुसार कोणत्या प्रकारची कारवाई करण्यात आली.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदरची ९ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली होती. तथापि अंतिम देयाकांसमवेत गेटची ताबा पावती नसणे, सिमेंट चाचणी अहवाल नसणे इ. तांत्रिक बाबी मुळे प्रचलित कार्यपध्दती नुसार प्रत्यक्ष झालेल्या कामाचीच रक्कम मक्तेदारास अदा करण्यात आलेली आहे. कामांची अंतिम देयके काम पूर्ण न करता सादर करण्यात आलेली नाहीत.

सदर ११ कामांची चौकशी पूर्ण झालेली आहे. गट विकास अधिकारी पंचायत समिती त्र्यंबकेश्वर यांनी सदर ११ कामांची तपासणी करून त्यासंदर्भातील सविस्तर अहवाल हा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांना सादर करण्यात आलेला आहे. याबाबतचा सविस्तर अहवाल ग्रामविकास विभागाकडे मार्च, २०१७ मध्ये सादर करण्यात आलेला आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्रायः-**

जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाशी शासन सहमत आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केलेल्या प्रश्नास सचिव, जलसंधारण विभाग यांनी समितीस असे विदित केले की, काम भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेले होते त्याचा सिमेंट चाचणी अहवाल नव्हता त्यामुळे प्रत्यक्ष जेवढे काम झाले तेवढेच कंत्राटदाराला देयक दिलेले आहे. चालू देयक दिलेले आहे. नंतरचे देयक काम झाल्यानंतर दिलेले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, चाचणी अहवाल असल्याशिवाय अंतिम देयक कसे काय दिले. तसेच अंतिम देयके कधी दिली, ती जेव्हा दिली त्यावेळी आर्थिक वर्ष संपले होते काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, सदरहू कामे २०-२५ वर्षापूर्वीची सन १९९३ ते १९९५ मधील असून त्यांची अंतिम देयके दिलेली नाहीत. अद्याप प्रलंबित आहेत. ११ कामांची चौकशी करण्याबाबत संबंधितांना सुचना दिल्या आहेत. ८ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झालेली आहेत.

यावर समितीने अशी हरकत घेतली की, या विषयाबाबत विभागाने विस्तृत माहिती दिलेली नाही. मोघम लेखी उत्तर दिलेले आहे. ९ कामे भौतिकदृष्ट्या पूर्ण झाली आहेत. गेटची ताबा पावती नाही, सिमेंट चाचणी अहवाल नाही. तसेच याबाबतचा निधी कोणत्या माध्यमातून प्राप्त झालेला होता व जलसंधारण विभागाने सन २०१६ पर्यंत काय कार्यवाही केली, यावर सचिव, जलसंधारण विभाग यांनी समितीस विदित केले की, २७०२ टीएसपी मधील हा निधी होता. यामध्ये ३ विषय गंभीर स्वरुपाचे असून त्याबाबत जिल्हा परिषदेला सुचना दिलेल्या आहेत. यावर समितीने अशी विचारणा केली की, उर्वरित तिघांवर काय कारवाई प्रस्तावित केली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, ६ जण मयत आहेत. उर्वरितांना नोटीस दिल्या होत्या, त्यानुसार त्यांचे उत्तर आले की, त्यांची कामे केल्यानंतर तेथून बदली झाली आहे. तसेच बंधा-याचे काम केले होते मात्र ते पावसामुळे वाहून गेले. यावर समितीने असे निदेश दिले की, याबाबत अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. अशा वेळी संबंधितांविरुध्द तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, एवढ्या वर्षांपासून ही कामे पूर्ण झाली नाहीत. आज समितीची साक्ष लावल्यानंतर आपण सांगत आहात, यापूर्वी कामे का केलेली नाही याबाबत समितीस खुलासा करावा. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदरहू कामांची मोजणी केली आहे तसेच त्याबाबतची सिमेंट वसुली देखील ३.२५ लाख रुपये झाली आहे. वाढीव कामे पूर्ण करण्यासाठी १४ लाख २६ हजार रुपयांची आवश्यकता लागणार आहे, याबाबत प्रत्येकाची जबाबदारी निश्चित केली आहे, परंतु कामे पूर्ण करण्यासाठी मुदतवाढ देण्यात यावी. यावर समितीने पावसाळ्यापूर्वी कामे पूर्ण करुन समितीला अहवाल सादर करावा असे निदेश दिले.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालाच्या चर्चेदरम्यान पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली असता असे निदर्शनास आले की, कोल्हापूर पध्दतीच्या बंधा-याच्या २३ मंजूर कामांपैकी ९ कामांची अंतिम देयके विभागीय कार्यालयास सादर केली आहेत. यासंदर्भात ९ गावतळ्यांच्या कामांपैकी ७ कामे पूर्ण असून शेतक-यांच्या हरकतीमुळे काही कामे रद्द केली. सदरहू जमीन लाभार्थ्यांसाठी असून प्रत्येक गावतळ्याला ७ ते ८ लाख रुपये देण्यात येतात. गेट बसवून न दिल्यामुळे काम अपूर्ण राहिली आहेत. भौतिकदृष्ट्या काम पूर्ण झाले आहे. सिमेंट चाचणी अहवाल उपलब्ध नसला तरी झालेल्या कामाचे देयक कंत्राटदारास अदा करण्यात आले आहे. ही २०-२५ वर्षापूर्वीची कामे आहेत.

सन १९९६ मध्ये काम सुरु झाले. लेखाशीर्ष २७०२ टीएसपी मधील निधी होता. ३ कोल्हापूर पध्दतीचे बंधा-यामध्ये १ मीटर ऊंचीचे साठवलेले पाणी वाहून गेले. यावरुन अनियमितता झाल्याचे सकृतदर्शनी दिसून येत आहे. त्यामुळे सदर ठेकेदारास काळ्या यादीत टाकण्यात आले आहे व ठेकेदाराकडून ११ टक्के प्रमाणे वसुली करण्यात येणार असल्याचे समितीस विदित करण्यात आले आहे, त्याप्रमाणे ठेकेदारांविरुध्द कारवाई करण्यात यावी. सदरहू वाढीव काम पूर्ण करण्यासाठी १४ लाख २६ हजार रुपये रक्कम अपेक्षित आहेत. निलंबन निधी २ लाख ७३ हजार रुपयांचा आहे. **याबाबत गटविकास अधिकारी यांचा चौकशी अहवाल मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पाठविला आहे असे लेखी माहितीत नमुद केले आहे व त्यास शासन सहमत आहे असे शासनाच्या अभिप्रायात नमुद आहे. यात अनियमितता झाली असून चौकशी प्रलंबित आहे. सदर चौकशी त्वरेने पूर्ण करुन संबंधित दोषींवर कठोर कारवाई करावी अशी समितीची शिफारस आहे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला तीन महिन्यांत पाठविण्यात यावा.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

## मागासवर्गियांच्या कल्याणकारी योजनांसाठी स्वःउत्पन्नातून २० टक्के रक्कमेतून सौरकंदील खरेदी करण्याबाबत (पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीने मागासवर्गियांच्या कल्याणकारी योजनांसाठी आपल्या उत्पन्नातून २० टक्के खर्च केला आहे आणि २७ नग सौरकंदील खरेदी केले आहेत असे सांगितले आहे. सदर खरेदीसाठी कोणती पध्दत वापरली आहे.यावर गटविकास अधिकारी, त्र्यंबकेश्वर यांनी समितीस विदित केले की, शासनाचा दर करार आहे, त्यानुसार खरेदी केली आहे.

समितीने असे निदेश दिले की, मागील काळात सन २०१२-१३ मध्ये खरेदी झाल्या, सदर खरेदी दर कराराप्रमाणे करण्यात आली आहे का, किती रकमेची खरेदी करण्यात आली, प्रक्रिया कशी राबविली या संदर्भातील सविस्तर अहवाल समितीला सादर करण्यात यावा. तसेच सदर विषय विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१२-१३ मध्ये पंचायत समितीने मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी स्वःउत्पन्नातून २० टक्के रक्कम खर्च करुन २७ नग सौर कंदिल खरेदी केले असून, सदरहू सौर कंदिलाची केलेली खरेदी दर कराराप्रमाणे करण्यात आली आहे काय, खरेदी किती रकमेची करण्यात आली, तसेच खरेदी प्रक्रिया कोणत्या प्रकारे राबविण्यात आली, या संदर्भातील सविस्तर माहिती सादर करण्याचे समितीने निर्देशित केले होते, त्यानुसार कोणती माहिती प्राप्त झाली आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०१२-१३ मध्ये पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर यांनी मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी स्वःउत्पन्नातून २० टक्के रक्कम खर्च करुन २७ नग ताडपत्री खरेदी केलेली आहे. प्रश्नावलीमध्ये सौर कंदिलाचा उल्लेख केलेला असून तेथे सौर कंदिल नसून ताडपत्री खरेदी करण्यात आलेली आहे. तसेच २७ नग ताडपत्री पुरवठा आदेश रद्द करुन १२ नग ताडपत्रीची खरेदी करण्यात आलेली आहे. सदरहू ताडपत्रीची खरेदी दर कराराप्रमाणे करण्यात आली आहे. खरेदी रु.५०११२ ची करण्यात आली आहे. खरेदी प्रक्रिया दर कराराप्रमाणे राबविण्यात आली आहे.

पंचायत समिती त्र्यंबकेश्वरच्या मासिक सभा दिनांकित १-२-२०१३ नुसार ठराव क्रमांक ११ नुसार पंचायत समिती उत्पन्नाच्या २० टक्के सेससाठी रु.५४९१८ रकमेची तरतूद करणेत येऊन दि.१८-३-२०१३ रोजी तांत्रिक मान्यता व प्रशासकीय मान्यता आदेश देण्यात आला. पंचायत समितीने शासन प्रचलित दरानुसार रु.१९८० प्रमाणे एकूण २७ ताडपत्री खरेदी करण्याकरीता पुरवठा आदेश मे.एम.एस.आय.डि.सी.प्रा.लि.नाशिक (सातपूर) यांना दि.२१/३/२०१३ रोजी देण्यात आलेला होता. सदर एजन्सीने मुदतीत साहित्य पुरवठा केला नसल्याने पुरवठा आदेश रद्द करण्यात आलेला आहे.

शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०.०२/प्र.क्र.१२८/अर्थोपाय, दि.६ जून २००८ नुसार सदर अखर्चित निधी लगतच्या पुढील आर्थिक वर्षअखेर खर्च करणेची मंजुरी देण्यात आली आहे. अखर्चित निधी सन २०१३-२०१४ मध्ये खर्च करण्याबाबत शासन निर्णय दि.६ जून २००८ मधील तरतूदीनुसार पंचायत समितीने दिनांक ३/१०/२०१३ रोजी ठराव क्रमांक ३१ नुसार मान्यता दिलेली आहे. त्यानुसार सन २०१३-१४ ह्या वित्त वर्षात दर करारानुसार ताडपत्री नग रु.४१७६/- प्रमाणे १२ ताडपत्री खरेदी करता मे.अल्टेक्स प्लास्टिक कोट्स प्रा.लि.नाशिक यांना पुरवठा आदेश देण्यात आला. त्यानुसार पुरवठादाराने पुरवठा केला असून सदर खरेदी शासन दरानुसारच करण्यात आलेली होती. सदर ताडपत्रीचे १२ नग प्राप्त झाले असून लाभार्थ्यांना वाटप करणेत आले आहे.

## मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-**

जिल्हा परिषदेच्या अभिप्रायांशी ग्रामविकास विभाग सहमत आहे.

## अभिप्राय व शिफारशी

सन २०१२-१३ मध्ये दिनांक १ फेब्रुवारी, २०१३ रोजीच्या ठराव क्रमांक ११ नुसार त्र्यंबकेश्वर पंचायत समितीने मागासवर्गीयांच्या कल्याणकारी योजनांसाठी स्वःउत्पन्नातून २० टक्के रक्कम खर्च करून शासन प्रचलित दरानुसार रूपये १९८० प्रमाणे एकूण २७ ताडपत्री खरेदी करण्याकरीता पुरवठा आदेश, मे.एम.एस.आय.डी.सी.प्रा.लि.नाशिक (सातपूर) यांना २१ मार्च, २०१३ रोजी देण्यात आलेला होता. सदर एजन्सीने विहित मुदतीत साहित्य पुरवठा केला नसल्याने पुरवठा आदेश रद्द करण्यात आलेला आहे. त्यामुळे सदर अखर्चित निधी सन २०१३-१४ मध्ये खर्च करण्याबाबत शासन निर्णय दिनांक ६ जून, २००८ मधील तरतुदीनुसार दिनांक ३ ऑक्टोबर, २०१३ रोजीच्या पंचायत समितीच्या ठराव क्रमांक ३१ नुसार रूपये ४१७६- प्रतिनग ताडपत्री या दराने केवळ १२ नग मे. अल्टेक्स प्लास्टिक कोट्स प्रा.लि.नाशिक यांना पुरवठा आदेश देण्यात येऊन लाभार्थ्यांना वाटप करण्यात आल्याचे साक्षी दरम्यान नमूद करण्यात आले आहे. वास्तविक पाहता केवळ १ वर्ष ६ महिन्यानंतर ताडपत्रीच्या दरमध्ये रूपये २१९६ प्रतिनग या दराने म्हणजे दुप्पटीपेक्षा अधिक तफावत आढळून येत असल्याने खरेदी प्रक्रिया जरी शासनदरानुसार केलेली असली तरी याठिकाणी साशंकता निर्माण होते, तसेच सदर कल्याणकारी योजनेमधून सौरकंदील खरेदी न करता ताडपत्री खरेदी करणे व अपुरा पुरवठा झाल्याप्रकरणी पुरवठा आदेश रद्द करून नवीन पुरवठादाराकडून दुप्पटी पेक्षा अधिक दराने केवळ १२ ताडपत्री खरेदी करून २७ लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्याऐवजी केवळ १२ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळवून देण्यामुळे या योजनेचा हेतू सफल होत नाही.

**सबब, मागासवर्गियांच्या कल्याणकारी योजनेंतर्गत पंचायत समितीने खरेदीची प्रक्रिया सुरूवातीलाच म्हणजे सन २०१२-१३ मध्ये सुयोग्य पुरवठादाराकडून अंमलात आणणे आवश्यक होते. या योजनेच्या नियोजनानुसार २७ लाभार्थ्यांना सदर योजनेचा लाभ होण्याऐवजी केवळ १२ लाभार्थ्यांनाच त्याचा लाभ झाल्याने उर्वरित लाभार्थी या योजनेचा फायदा मिळण्यापासून वंचित राहिल्यामुळे याप्रकरणी संबंधितांविरूध्द चौकशी करुन दोषी आढळल्यास त्यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांत पाठविण्यात यावा.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

## ग्रामीण भागातील विविध योजनांच्या माहितीबाबत

## (पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, ९८ घरकुले अपूर्ण आहेत. घरकुले अपूर्ण राहण्याची कारणे काय आहेत. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, तालुक्यात आदिवासी आणि अतिदुर्गम भाग असल्यामुळे अजुनही शौचालयाच्या संदर्भातील जागरुकता कमी आहे. ९० घरे शौचालयांअभावी अपूर्ण आहेत. दुस-या टप्प्यात घरकुल पूर्ण करण्यासाठी शौचालय आवश्यक आहे.

यानंतर समितीने अशी विचारणा केली की, आरोग्याच्या संदर्भात शासनाच्या काही नवीन योजना आहेत काय, यावर तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर यांनी समितीस विदित केले की, त्र्यंबकेश्वर तालुक्यांतर्गत शिबिरांचा कार्यक्रम सुरू आहे. सदर शिबिरांमध्ये स्त्री रोग व बाल रोग तज्ञ प्राथमिक आरोग्य केंद्र स्तरावर बालके व गरोदर मातांची आरोग्य तपासणी करतात. आपल्याकडे जननी सुरक्षा योजना देखील सुरू आहे, त्या योजनेंतर्गत संस्थेच्या ठिकाणी प्रसुती झाली तर ७०० रूपये अनुदान दिले जाते आणि खाजगी रूग्णालयाच्या ठिकाणी प्रसुती झाली तर ६०० रूपये अनुदान दिले जाते. यावर समितीने अशी विचारणा केली की, अनेक ऑपरेशनसाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणात खर्च करण्यात येतो अशा शासनाच्या कोणत्या योजना आहेत. यावर तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर यांनी समितीस असे विदित केले की, राजीव गांधी जीवनदायी योजना आहे. ज्यांचे उत्पन्न १ लाख रूपयांपेक्षा कमी आहे, पिवळे कार्डधारकांना, अंत्योदय योजनेमधील दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना या योजनेमध्ये शस्त्रक्रियेच्या उपचाराच्या खर्चाचा लाभ दिला जातो. सदर योजनेखाली दीड लाख रूपयांपर्यंत ऑपरेशन व उपचार यासाठी खर्च करू शकतो.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, शासनाच्या अजून कोणत्या योजना आहेत. यावर तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर यांनी समितीस असे विदित केले की, संस्थेंतर्गत प्रसुती होण्यासाठी जननी सुरक्षा योजना आहे, त्या माध्यमातून आपण गरोदर माता व बालकांसाठी खर्च करतो. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, मुख्यमंत्री अर्थ सहाय्यता निधी योजनेच्या माध्यमातून खर्च करता येतो हे आपल्याला माहीत आहे काय, यावर तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर यांनी समितीस असे विदित केले की, सदर योजनेला ३ महिने झाले आहेत. ही योजना ब-याच महिन्यांपासून सुरू झाली आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी ही योजना तयार केली आहे.

यावर समितीने अशी माहिती दिली की, दुर्धर आजारांच्या संदर्भात ३ लाख रूपयांपर्यंतची मदत या योजनेतून केली जाते. ब-याच दिवसांपासून ही योजना सुरू केली आहे. सदरहू योजनेमधून ३ लाख रूपयांपर्यंतची मदत रुग्णास उपचारासाठी मिळते. सदर योजनेखाली निधी उपलब्ध होतो. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संदर्भात एक बैठक घेऊन शासनाच्या ज्या काही नवीन योजना आल्या आहेत त्या सर्वांना अवगत करून द्याव्यात. तसेच शेतकरी व सामान्य माणसांकडे या योजनांची माहितीच नसते, त्यामुळे केंद्र व राज्य शासनाच्या सर्व योजनांचा फलक ग्रामपंचायती व पंचायत समिती कार्यालयांत लावला पाहिजे. तसेच उपकेंद्र स्तरावर व अंगणवाडी स्तरावर आरोग्य शिबिरे योजना देखील घेतली गेली पाहिजेत. समितीच्या सूचनेप्रमाणे बैठक घेऊन योजनांच्या संदर्भातील माहिती पुस्तिका तयार करून सर्व ग्रामपंचायतींना निर्गमित करण्यात येतील असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आश्वासित केले.

यावर समितीने असे सूचित केले की, आरोग्याच्याच नव्हे तर सर्वच विभागांच्या योजनांची माहिती गावक-यांना मिळाली पाहिजे. कृषी, महसूल विभागाच्याही चांगल्या योजना आहेत. शेतक-यांना सर्पदंश झाला किंवा वीज पडून मृत्यू झाला तर दुप्पट मदत करण्यात येत आहे. सदर योजनांची माहिती ब-याच वेळा ग्रामस्थांना माहीत नसते. त्यामुळे योजनांची माहिती ग्रामसभेत वाचून दाखविलीच पाहिजे.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती त्र्यंबकेश्वर ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती नसल्यामुळे ते शासनाच्या विविध योजनांच्या लाभापासून वंचित राहतात या करीता ग्रामसभेच्या व इतर माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनाची माहिती ग्रामस्थापर्यंत पोचविण्याबाबत कोणती कारवाई करण्यात आली.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

ग्रामीण भागातील नागरिकांना शासनाच्या विविध योजनांची माहिती नसल्यामुळे ते शासनाच्या विविध लाभापासून वंचित राहतात याकरिता पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर कार्यालयामार्फत वारंवार होणा-या बैठकीमध्ये मासिक/पाक्षिक आढावा सभा यांमधून विस्तार अधिकारी व ग्रामसेवक, कृषी विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, बांधकाम विभाग, लघुपाटबंधारे विभाग, पशुसंवर्धन विभाग, समाजकल्याण विभाग इ.सर्व विभागांच्या संबंधित अधिकारी व विस्तार अधिकारी/कर्मचारी यांना शासनामार्फत राबविण्यात येणा-या सर्व योजनांचे फलक लावणे व माहिती पुस्तिका ठेवणेबाबत व योजनांची माहिती संबंधित लाभार्थी यांना देण्याबाबत कळविण्यात आले आहे. या कार्यालयामार्फत पत्र क्र.जा.क्र.पसत्र/ग्रापं.१६९/१७, त्र्यंबकेश्वर दिनांक ०७/०८/२०१७ अन्वये सर्व संबंधित विभागांना सूचना देण्यात आलेल्या आहेत.

त्यानुसार ग्रामपंचायत कार्यालयात योजनाविषयक माहिती फलक लावण्यात आलेले आहेत, याबरोबर ग्रामसभेद्वारे माहिती देण्यासाठी व योजनेविषयक चर्चा व निवड करणेसाठी वेळोवेळी योजनाविषयक माहितीचे पत्रे व आदेश जिल्हास्तरावरून व पंचायत समिती स्तरावरून निर्गमित करण्यात आलेले आहेत.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-**

जिल्हा परिषदेने केलेल्या कार्यवाहीशी शासन सहमत आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषेदला भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान पंचायत समिती, त्र्यंबकेश्वर येथील आदिवासी आणि दुर्गम भागातील ९० घरे शौचालयाअभावी अपूर्ण असल्याचा मुद्दा चर्चेत आला. त्र्यंबकेश्वर तालुका हा अतिदुर्गम आणि आदिवासी बहुल भाग असल्यामुळे शौचालयाच्या संदर्भातील जागरुकता कमी आहे, त्यामुळे ९० घरे शौचालयाअभावी अपूर्ण आहेत. पंचायत समितीने आदिवासी व दुर्गम भागामध्ये शौचालय स्वच्छेतेबाबत जागरुकता निर्माण करणे आवश्यक आहे व याकरिता पंचायत समिती व ग्रामपंचायतीच्या स्तरावर शिबीर अथवा मोहिम राबवावी असे समितीने स्पष्ट मत व्यक्त केले.

बालके व गरोदर माता यांची तपासणी करण्यात येते किंवा कसे हे तपासण्यासाठी भरारी पथके निर्माण करावीत, या पथकामार्फत केलेल्या कार्याची पडताळणी जिल्हा परिषदेच्या जिल्हा आरोग्य अधिका-यांनी करावी. आरोग्याच्या संदर्भात आरोग्य तपासणी शिबिरामध्ये विविध आजारांवरील उपचारांचा खर्च केला जातो. सदर विविध आरोग्य योजनांची माहिती राज्यामध्ये सर्वच संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कार्यालयांमध्ये दर्शनी भागावर सूचना फलकावर लावणे बंधनकारक करावे. तसेच गरोदर माता आरोग्य तपासणीअंतर्गत संस्थेच्या ठिकाणी गरोदर मातांची प्रसुती झाल्यास संस्थेच्या ठिकाणी ७०० रुपये व खाजगी रुग्णालयाच्या ठिकाणी ६०० रुपये अनुदान दिले जाते. सदर अनुदान अनुक्रमे ३००० रुपये व २५०० रुपये प्रमाणे करावे. शेतक-यांना सर्पदंश अथवा आकस्मिकपणे वीज पडून मृत्यू होणे या घटनेसाठी शासनाकडून दुप्पट आर्थिकसहाय्य करण्यात येते, याबाबतची माहिती ग्रामस्थांना ग्रामसभेत वाचून दाखवावी असे समितीने निदेश दिले.

**केंद्र व राज्य शासनातर्फे राबविण्यात येणा-या विविध योजनांची माहिती ग्रामपंचायतीच्या व पंचायत समितीच्या सूचना फलकांवर लावणे बंधनकारक आहे,जेणेकरुन सदर योजनांची माहिती तळागाळातील जनतेपर्यंत पोहचून त्याचा लाभ त्यांना घेता येऊ शकेल. कृषी, आरोग्य, शिक्षण, पशुसंवर्धन, समाजकल्याण, बांधकाम, लघुपाटबंधारे या विभागांनी सर्व सामान्य**

व्यक्तीस लाभापासून वंचित न राहू देण्यासाठी त्या योजनांची विविध माध्यमातून प्रचार व प्रसिध्दी करणे आवश्यक आहे. कनिष्ठ स्तरावर विविध योजनांचा प्रचार व प्रसार होत नसल्यामुळे जिल्हा परिषद अथवा पंचायत समित्या राबवित असलेल्या योजनांचा प्रसार व प्रचार होणे आवश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये योजनांच्या माहितीबाबत चावडी वाचनाबरोबरच ग्रामपंचायतीच्या दर्शनी भागात सर्व संबंधित योजनेचे माहितीफलक लावणे अनिवार्य करावे व त्यादृष्टीने प्रचार व प्रसार करण्यासंदर्भात कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.

प्रकरण आठ

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

## वार्षिक अंदाजपत्रकाबाबत (पंचायत समिती, नाशिक)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीकडे सन २०१४-१५ अखेरपर्यंत वाढीव उपकराची रक्कम येणे बाकी होती, वाढीव उपकराची रक्कम रु. २,४७,५४,१९८ कधी प्राप्त झाली आणि या रकमेपैकी गत वर्षात त्या-त्या लेखाशीर्षकाखाली अर्थसंकल्पामध्ये किती तरतूद केली आहे.

यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, सन २०११ पासून ही रक्कम प्रलंबित होती. सन २०११-१२ मध्ये रु.११,८२,२७० इतकी रक्कम येणे बाकी होती, ती दिनांक २४.०३.२०१२ ला मिळाली. सन २०१२-१३ मध्ये रू.५७,४४,४३१ इतकी रक्कम येणे बाकी होती, ती दिनांक ३१.०३.२०१३ ला मिळाली. सन २०१३-१४ मध्ये रू.२३,२३,४८८ इतकी रक्कम येणे बाकी होती, ती दिनांक २७.११.२०१३ ला मिळाली. सन २०१३-१४ मध्येच मागील प्रलंबित रू.७६,४४,९५९ रक्कम येणे होती, ती दिनांक २९.०३.२०१४ ला मिळाली. सन २०१४-१५ मध्ये रू.३०,७८,८४३ इतकी रक्कम येणे होती, ती दिनांक ३१.०३.२०१५ ला मिळाली, सन २०१४-१५ मध्ये रू.३,२०,०९४/- रक्कम येणे होती, ती दिनांक ३१.०३.२०१५ ला मिळाली आणि सन २०१४-१५ मध्ये ४४,६०,११३/- रक्कम येणे होती, ती दिनांक ३१.०३.२०१५ ला मिळाली. प्रत्येक अंदाजपत्रकामध्ये टक्केवारीप्रमाणे तरतूद करण्यात आली आहे.

तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, सन २०१४-१५ मधील रू.४४,६०,११३/- ही वाढीव उपकराची रक्कम कमी आहे असे वाटत नाही का, स्टॅम्प ड्युटी, खरेदी विक्री व्यवहार यांच्या माध्यमातून वाढीव उपकर मिळणे अपेक्षित आहे. मात्र वाढीव उपकर कमी मिळाल्याची कारणे काय आहेत, तसेच सन २०१५-१६ चे बजेट किती आहे. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, वाढीव उपकर म्हणून मुद्रांक शुल्काच्या अनुषंगाने रक्कम अनुक्रमांक ४ मध्ये असून सन २०१३-१४ मध्ये रू.७६,४४,९५९ इतकी रक्कम प्राप्त करून घेतली आहे. आम्ही दुय्यम निबंधकांच्या कार्यालयाशी संपर्क साधून आमची रक्कम प्राप्त करून घेतली आहे. सन २०१५-१६ चे बजेट १ कोटी २० लाख रूपये होते.

त्यानंतर समितीने अशी विचारणा केली की, २० टक्के समाज कल्याणसाठी, १० टक्के महिला व बाल कल्याणासाठी व ३ टक्के अपंगांसाठी तरतूद केली आहे काय असल्यास, १ कोटी २० लाख रूपयांचे विभाजन दाखवावे व खरेदी पध्दत विशद करावी. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, झेरॉक्स मशिनसाठी २७ लाख ५० हजार रूपयांची तरतूद केली आहे. झेरॉक्स मशिन खरेदी करण्याची पध्दत समाज कल्याण विभागाचा सन १९९९ चा शासन निर्णय आहे. संचालक, समाज कल्याण यांच्या आदेशानुसार निधी प्राप्त झाला. ही योजना ऑक्टोबरमध्ये घेतली.

यावर समितीने अशी विचारणा केली की, आपण झेरॉक्स मशिन कोणाकडून कधी खरेदी केल्या, लाभार्थ्यांना कधी वाटप करण्यात आल्या आणि खरेदीची पध्दत काय आहे. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, झेरॉक्स मशिन देण्याच्या योजनेच्या संदर्भात पंचायत समिती सभागृहाने ठराव केला, त्यानंतर योजना निवडली, लाभार्थ्यांना मान्यता दिली, त्यानंतर दिनांक १५ फेब्रुवारी, २०१६ रोजी त्याचा पुरवठा आदेश दिला. सर्वसाधारणपणे हा पुरवठा दिनांक १५ मार्चला प्राप्त झाला. दिनांक १२ मार्च, २०१६ ला नाशिक तालुक्यात आदर्श ग्रामपंचायतीची आचारसंहिता सुरु झाली, ती दिनांक १९ एप्रिल पर्यंत सुरू होती. त्यामुळे या साहित्याचे वाटप होऊ शकले नाही.

त्यावर समितीने विचारणा केली की, खरेदी दर करारानुसार केली की निविदा काढून केली तसेच त्या झेरॉक्स मशिन वाटप केल्या आहेत का, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असा खुलासा केला की, दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ च्या नवीन आलेल्या शासन निर्णयानुसार १ लाख रूपयांच्या आतील रकमेची खरेदी असेल आणि त्याचे दर करार असेल तर ती खरेदी दर करारानुसार करावी असे सांगण्यात आले आहे. ही आकडेवारी १ कोटी रूपयांच्या आतील आहे. १ कोटी रूपयांच्या आतील खरेदी दर करारानुसार करता येते. तसेच ग्रामपंचायत निवडणुकीच्या संदर्भातील आचारसंहिता असल्यामुळे झेरॉक्स

मशिनचे वाटप केलेले नाही. पंचायत समितीचे एकूण वार्षिक अंदाजपत्रक १ कोटी ३६ लाख रूपये आहे. सन २०१५-१६ चे वार्षिक अंदाजपत्रक रू.१,४१,११,९८८ रूपयांचे आहे. २० टक्के रक्कम समाज कल्याणासाठी २७ लाख १० हजार रूपये होतात.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, मागासवर्गीयांना फक्त झेरॉक्स मशिन दिली, इतर कोणतीही योजना त्यांच्यासाठी राबविण्यात आली नाही काय, फक्त एकच योजना राबविली, दुसरी कोणतीही योजना राबविली नाही. आपण या योजनेत किती लाभार्थ्यांना लाभ दिला, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, नाही. एकच योजना घेतली होती. कारण पंचायत समितीच्या सभागृहाने निर्णय घेतला होता की, लोकांना कायमस्वरूपी उदरनिर्वाहाचे साधन मिळावे. या योजनेत ७३ लाभार्थ्यांना लाभ दिला आहे आणि एका मशिनची किंमत ४२ हजार रूपये आहे. यावर समितीने ही वैयक्तीक लाभाची योजना आहे. आपण लाभार्थी कसे निवडले अशी विचारणा केली असता समितीच्या प्रश्नास गटविकास अधिकारी यांनी असे उत्तर दिले की, पंचायती समितीने प्रस्ताव मागावून घेतले व ते सर्व प्रस्ताव पंचायत समितीच्या मासिक सभेत ठेवले आणि त्या संदर्भात निर्णय घेऊन मान्यता दिली. यावर समितीने अशी विचारणा केली की, यासंदर्भात शासनाचे निकष काय आहेत.

यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, समाज कल्याणासाठी लाभार्थी हा अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील असावा. लाभार्थी कोणत्याही नोकरीला नसावा. सर्व निकषांची पूर्तता करून प्रस्ताव सभागृहासमोर ठेवले. सभापती, उप सभापती व सभागृहाने निर्णय घेऊन या योजनेला मान्यता दिली. यावर समितीने विचारणा केली की, शासन निर्णय आणि सभागृह यामध्ये फरक आहे, सभागृह देखील शासन निर्णयाच्या विरोधात काम करू शकत नाही. एकाच प्रकारची योजना राबविली, त्यामुळे काही योजनांपासून लोक वंचित राहिले या गोष्टीला गट विकास अधिकारी म्हणून विरोध केला नाही काय, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, गटविकास अधिकारी म्हणून या योजनेसंदर्भात उपरोक्त बाब निदर्शनास आणून दिली होती, परंतु चर्चेदरम्यान माननीय उपसभापतींनी असा निर्णय घेतला होता की, झेरॉक्स मशिन घेतली तर कायमस्वरूपी उदरनिर्वाहाचे साधन होईल, त्यानंतर सभापतींनी चर्चा केली, त्यानंतर निर्णय घेतला आहे. झेरॉक्स मशिनचे साहित्य प्राप्त झाल्यानंतर आदर्श ग्रामपंचायतींच्या निवडणुकीची आचारसंहिता होती. त्यामुळे साहित्य वाटप झालेले नाही.

यावर समितीने विचारणा केली की, झेरॉक्स मशिनच्या लाभार्थ्यांकडे दुकाने आहेत का आणि तो दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती आहे काय, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, जे लाभार्थी निवडले आहेत ते संपूर्ण नाशिक मधील ग्रामीण भागातील आहेत किंवा आदिवासी भागातील आहेत, ज्यांच्याकडे झेरॉक्स मशिन नाही अशा ठिकाणचे लाभार्थी निवडलेले आहेत. त्यांच्याकडे यापूर्वी दुकाने नव्हती. आता त्यांच्याकडे दुकाने नाहीत. आम्ही ज्यांच्याकडे जागा उपलब्ध आहे, अशांचे दाखले घेतले आहेत आणि त्यांना झेरॉक्स मशिन देणार आहोत. यानंतर समितीने अशी विचारणा केली की, मागासवर्गीयांचा २० टक्क्यांचा निधी कसा खर्च करावा हे माहीत आहे का, कोणत्या योजना राबविल्या पाहिजेत याबद्दल खुलासा करावा. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस खुलासा केला की, सन १९९९ चा शासन निर्णय आहे. मागासवर्गीय शेतक-यांना ताडपत्री देणे, शेतीसाठी अवजारे पुरविणे, सौर कंदील देणे, टपरी देणे अशा योजना आहेत. झेरॉक्स मशिन देण्याची योजना राबविली, कारण विविध प्रकारच्या योजना यापूर्वी राबविल्या गेलेल्या आहेत म्हणून अशी योजना घेण्यात आली.

यावर समितीने अशी सूचना केली की, शासन निर्णयाचे उल्लंघन झाले असे आपल्याला वाटत नाही का, शासन निर्णयानुसार १५ ते १६ योजना आहेत, तरी तुम्ही एकच योजना राबविली हे योग्य नाही, शासन निर्णय लोकांच्या कल्याणासाठी काढला आहे. सर्वांची मागणी असताना एक विशिष्ट योजनाच घ्यावी हे योग्य नाही. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस असे विदित केले की, या योजनेअंतर्गत नाशिकमध्ये आम्ही अपंगांचे मेळावे घेतले, त्यामध्ये काही अपंग लाभार्थी मिळाले. परंतु अपंगांसाठी ३ टक्के वेगळा निधी असतो. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी या संपूर्ण विषयाच्या संदर्भात शासन निर्णयानुसार निर्णय घेतला नसेल, अंमलबजावणी झाली नसेल तर संबंधितांवर जबाबदारी निश्चित करून समितीला अहवाल सादर करण्यात यावा.

तद्नंतर समितीने महिलांसाठी १० टक्क्यांचे आरक्षण आहे. आपले सन २०१५-१६ चे एकूण वार्षिक अंदाजपत्रक रू.१,४१,११,९८८ आहे. अंदाजपत्रकाच्या १० टक्के किती होतात. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, १० टक्क्यांप्रमाणे साडे तेरा लाख होतात. दिनांक २४ जानेवारी, २०१४ चा शासन निर्णय आहे. ५० टक्के रक्कम प्रशिक्षणासाठी

खर्च करणे आवश्यक आहे आणि ५० टक्के रक्कम खरेदीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. ५० टक्के रकमेमध्ये महिलांना प्रशिक्षण मिळावे यासाठी एमएस-सीआयटी योजना राबविली आहे. तसेच ब्युटी पार्लर योजना राबविली आहे. तसेच शिलाई मशिनची योजनाही राबविली आहे. कुपोषणाचे प्रमाण कमी व्हावे म्हणून त्यासाठी बिस्किटे दिली आहेत.

यावर समितीने विचारणा केली की, सर्व योजना शासन निर्णयात नमूद आहेत. अगोदरच्या योजना शासन निर्णयात नमूद नाहीत. याचा अर्थ, पंचायत समितीने शासन निर्णयाचे उल्लंघन केले आहे.

महिला व बाल कल्याण समितीने राबविण्याच्या १५ योजना आहेत. आपण त्या योजना राबविल्या आहेत व या योजनेत दिव्यांगांसाठी किती तरतूद केली आहे. यावर गटविकास अधिकारी यांनी खुलासा केला की, दिव्यांगासाठी झेरॉक्स मशिन घेतल्या आहेत. दिव्यांगांना वर्गवारीचा निकष नाही. सामान्य लाभार्थी आहेत, त्यांना लाभ मिळावा म्हणून झेरॉक्स मशिन घेतल्या आहेत. दिव्यांगांच्या संदर्भातील शासन निर्णय सन २०१२ ला आला, त्यापूर्वी या योजना राबविल्या होत्या. दिव्यांगांच्या शासन निर्णयामध्ये दिव्यांगांच्या कल्याणासाठी असे म्हटले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, झेरॉक्स मशिनची किंमत काय होती व लाभार्थ्यांना किती मशिन वाटप केल्या, यावर गटविकास अधिकारी यांनी खुलासा केला की, ४२ हजार रूपये एका मशिनची किंमत होती. एकूण ११ मशिन दिल्या. ४ लाख ६२ हजार रूपये खर्च आला. तद्नंतर समितीने अशी विचारणा केली की, उर्वरित वार्षिक अंदाजपत्रकातून कशासाठी खर्च केला आहे. यावर गटविकास अधिकारी यांनी खुलासा केला की, पशु संवर्धनासाठी दुधाळ जनावरांना औषधे पुरविण्यासाठी खर्च केला आणि त्यासाठी जवळपास १ लाख रूपये खर्च केले आहेत. तसेच आरोग्य शिबिरासाठी १ लाख रूपये खर्च केले आहेत. ८ ठिकाणी आरोग्य शिबिरे घेतली आहेत. ५६ लाख रूपये ही उर्वरित रक्कम बांधकामासाठी खर्च केली आहे. पंचायत समितीने उर्वरित रक्कमेतून कोणती बांधकामे केली, यावर गटविकास अधिकारी यांनी खुलासा केला की, पंचायत समिती सदस्यांच्या शिफारशीनुसार आणि प्रत्यक्ष पडताळणीनुसार ग्रामीण रस्ते, नवीन रस्ते, सीडी वर्कची कामे केली आहेत. नवीन रस्ते केले आहेत. सर्वसाधारणपणे १९ रस्ते केले आहेत.

तद्नंतर सन २०१५-१६ या वार्षिक अंदाजपत्रकाची समितीला माहिती सांगावी. यावर गटविकास अधिकारी यांनी असे विदित केले की, आरोग्य शिबिरासाठी १ लाख रूपये खर्च केले आहेत. झेरॉक्स मशिनसाठी २७ लाख ७५ हजार रूपये खर्च केले आहेत. अपंगांसाठी झेरॉक्स मशिन घेण्यासाठी ४ लाख ५० हजार रुपये खर्च केले आहेत. एमएस-सीआयटीसाठी ९,१२,५००/- रूपये आहेत. ब्युटी पार्लरसाठी २ लाख ७५ हजार रूपये आहे, शिलाई मशिनसाठी २ लाख रूपये आहेत, दरीपंजा खरेदी करणे यासाठी ३ लाख रूपये आहेत, हार पुरविणे यासाठी १ लाख ८० हजार रूपये आहेत, पशुसंवर्धन विभागात दुधाळ गायी व म्हैशींना १ लाख रूपये आहेत, पुरस्काराची रक्कम ५ लाख रूपये आहे, ग्रामीण रस्त्यांची व मो-यांची दुरूस्ती रु. ७१,१७,७४७/- इतक्या रकमेची आहे.

यानंतर समितीने असे निदेश दिले की, अंदाजपत्रकाची प्रोव्हिजन देण्यात आली आहे. मात्र काही ठिकाणी शासन निर्णय लक्षात न घेता परस्पर निर्णय घेतले असतील तर त्यांना स्थगिती देण्यात यावी. शासन निर्णय काही ठिकाणी डावलण्यात आला आहे तर ते थांबवावे. पूर्ण चौकशी करून या संदर्भातील अहवाल समितीकडे सादर करावा. पंचायत समितीच्या अंदाजपत्रकाच्या विषयाबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्द्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती नाशिक यांचे वार्षिक अंदाजपत्रकाच्या संदर्भात समितीस असे आढळून आले की, पंचायत समिती स्तरावर शासन निर्णय लक्षात न घेता परस्पर निर्णय घेतल्याने अशा कामांना स्थगिती देण्यात यावी त्या संदर्भातील पूर्ण चौकशी करुन अहवाल समितीकडे सादर करावा असे समितीने निदेश दिलेले असून याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली आहे.

**उपरोक्त मुद्द्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, नाशिक येथील सन २०१५-१६ चा सुधारित अर्थसंकल्पास शासन निर्णयानुसार पंचायत समिती, नाशिकची सर्वसाधारण सभा दि.२५-०१-२०१६ रोजीचा पारित ठराव क्र.२८४ नुसार सन २०१५-१६ चे सुधारित व सन २०१६-

१७ चा मुळ अर्थसंकल्पातील बाबवार तरतुदी छाननी करण्यात येऊन महाराष्ट्र जि.प. व पं.स. अधिनियम १९६१ चे अधिनियम १३८ अन्वये पुरवणी अर्थसंकल्प तयार करुन पंचायत समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे. याबाबत मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी पंचायत समिती स्तरावर चौकशी करुन याबाबतचा चौकशी अहवाल सोबत जोडलेला आहे.

सन २०१५-१६ चा सुधारित अर्थसंकल्प खालील प्रमाणे :

| **विभागाचे नाव** | **योजनेचे नाव** | **२०१५-१६ सुधारित तरतुद** | **२०१५-१६ मध्ये झालेला खर्च** | **शेरा** |
|---|---|---|---|---|
| २०१०-सार्व.आरोग्य | आरोग्य शिबीराचे आयोजन | १००००० | १००००० | १००% खर्च |
| २२१०-सार्व.आरोग्य, पाणी पुरवठा व स्वच्छता | भूमिगत गटार योजना राबविणे | १६३९५४१ | १६३९५४१ | १००% खर्च |
| २२३५-समाजकल्याण २०% सेस | झेरॉक्स मशीन योजना राबविणे | २७५०००० | २७५०००० | १००% खर्च |
| २२३५-अपंग कल्याण (३%) | झेरॉक्स मशीन योजना राबविणे | ४५०००० | ४५०००० | १००% खर्च |
| २२३७ महिला व बालकल्याण (१०%) | कुपोषित मुलांसाठी आहार वाटप करणे | १८७५०० | १८७५०० | १००% खर्च |
| | ग्रामीण भागातील मुलींना शिलाई मशिन वाटप करणे | २००००० | २००००० | १००% खर्च |
| | दरी, पंजा खरेदी करणे | ३००००० | ३००००० | १००% खर्च |
| | प्रशिक्षण शुल्क परतावा देणे | ४१२५०० | ४१२५०० | १००% खर्च |
| | ब्युटी पार्लर प्रशिक्षण | २७५००० | २७५००० | १००% खर्च |
| २७०३ पशुसंवर्धन | दुधाळ गाई म्हशींना क्षारमिश्रणे जीवनसत्वे वाटप करणे | १००००० | ९९९६२ | ३८ शिल्लक |
| २५११- पंचायत राज कार्यक्रम | यशवंत पंचायत अभियान व ग्राम अभियान बक्षिस अनुदान योजना राबविणे | ५८०००० | ० . | सन २०१६-१७ मध्ये ५,४६,८८० खर्च व ३३,१२० शिल्लक |
| ३०५४- परिवहन (इवद) | १०१/१०२ (२७) रस्त्यांची मो-यांची देखभाल व दुरुस्ती | ७११७४४७ | २०५४९४२ | सन २०१६-१७ मध्ये १००% खर्च |
| | पं.स.सेस मध्ये जि.प. सेसची रक्कम जमा झाल्याने सदर रक्कम जि.प.सेसकडे वर्ग करण्यात आली आहे | ० | २६६३८३ | (-) |
| | एकुणः | १४१११९८८ | ८७३५८२८ | ३३१२० |

नाशिक पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक २५.०१.२०१६ रोजीचा पारित ठराव क्र.२८४ नुसार, एकुण प्राप्त निधी नुसार व शासन निर्णयानुसार समाज कल्याण विभागासाठी २०%, अपंग कल्याणासाठी ३% महिला व बालकल्याण विभागासाठी १०% तसेच आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग यांच्या योजनेनुसार आवश्यक ती तरतुद करण्यात आलेली असून संबंधित विभागाच्या शासन निर्णयानुसार योजना राबविण्यात आलेल्या आहेत व उर्वरित रक्कमेमधून इमारत व दळणवळण विभागांतर्गत रस्त्यांची व मो-यांची देखभाल व दुरुस्तीकरीता तरतुद करण्यात आली असून त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय लक्षात घेवून कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच सन २०१५ मध्ये नाशिक पंचायत समितीला सन २०१३-१४ या वर्षाचा यशवंत पंचायत राज अभियानामध्ये नाशिक महसुल विभागात तृतीय क्रमांक प्राप्त झाला असून बक्षीसाची रक्कम जून, २०१५ मध्ये प्राप्त झाली असून रु.५,८०,०००/- पैकी सन २०१६-१७ मध्ये ५,४६,८८०/-खर्च झाली असून उर्वरित रक्कम रु.३३,१२०/- मार्च, २०१८ अखेर खर्च करण्याचे नियोजन आहे.

तरी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ व सर्व संबंधित विभागांच्या शासन निर्णयानुसार योजना राबविणेबाबत अर्थसंकल्पात नियमानुसार तरतुद करण्यात आली आहे. तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ व संबंधित विभागांच्या शासन निर्णयानुसार अर्थसंकल्पातील योजना राबविणेबाबत नियमानुसार कार्यवाही करण्यात आलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-

जिल्हा परिषदेच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**चौकशी अहवाल**

**सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात पंचायत समितीचे नाशिकचे प्रश्नावली क्र.२ प्रश्न क्रमांक ५ बाबत मा.पंचायती राज समिती यांचेकडील कार्यवृत्तातील पृष्ठ क्र.१५० व १५४ बाबत पंचायत समिती, नाशिक येथे दिनांक ०५/०१/२०१७ रोजी समक्ष भेट देवून केलेल्या चौकशीचा अहवाल :-**

सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात दिनांक ६ मे, २०१६ रोजी समितीने पंचायत समिती, नाशिक येथे भेट देवून पंचायत समिती कामकाजाचा आढावा घेतला व त्यातील प्रश्नावली क्र.२ प्रश्न क्रमांक ५ बाबत मा पंचायती राज समिती यांचेकडील कार्यवृत्तातील पृष्ठ क्र.१५० व १५४ बाबत कार्यालयीन आदेश क्र जिपना/अर्थ/तपासणी/९/२०१७ नाशिक दिनांक ०४/०१/२०१७ अन्वये दिनांक ०५/०१/२०१७ रोजी पंचायत समिती नाशिक येथे समक्ष जावून चौकशी करण्यात आली. चौकशी अहवाल खालील प्रमाणे आहे.

**योजनेचे नांव - नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर झेरॉक्स मशिन पुरविणे पंचायत समिती (समाजकल्याण) २० टक्के सेस योजना**

| अ.क्र. | तपशिल | पत्राच्या/ठरावाचा क्रमांक | शेरा |
|---|---|---|---|
| १. | समाजकल्याण विभागाच्या योजना मंजुर करणे | नाशिक पंचायत समितीची सर्वसाधारण सभा दि.२९.१२.२०१५ विषय क्र ३०-१ ठराव क्र.२७३ | सोबत सत्यप्रत जोडली आहे. सचिव यांनी शासन निर्णय ग्राम विकास विभाग महाराष्ट्र शासन मंत्रालय मुंबई क्र मागास/१०९८/प्र.क्र. ७३/३४ दि.२०.१०.१९९९ व मा संचालक समाजकल्याण महाराष्ट्र राज्य पुणे यांचे आदेश.क्र.संकवि/तांमा/२०टक्के/९९/२०००का१२/११०५ दि.२४.११.२००० नुसार समाजकल्याण विभागाच्या योजना |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | घेता येतील व योजना निश्चित करणेबाबत विनंती केली व ठराव क्र.२७३अन्वये समाजकल्याण विभागाकरीता सन २०१५-१६ या वर्षात स्वंयरोजगारासाठी नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातील मागासवर्गीय लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर झेरॉक्स मशिन पुरविणे ही योजना घेण्यास यावी यावर चर्चा होवून रु.२७५००००/- इतक्या रक्कमेच्या योजनेस मान्यता देण्यात आली. |
| २. | प्रशासकीय मान्यता आदेश नाशिक तालुक्यातील ग्रामीण भागातील मागास-वर्गीय लाभार्थ्यांना १०० टक्के अनुदानावर झेरॉक्स मशिन पुरविणे. | गट विकास अधिकारी (उ श्रे) पंचायत समिती नाशिक यांचेकडील पंसना/ समाजकल्याण/योजना/ ०१/२०१५ दिनांक ३१ डिसेंबर, २०१५ | सोबत सत्यप्रत जोडली आहे. |
| ३. | पंचायतराज समिती सन २०१५-१६ चे सुधारित व सन २०१६-१७ चे मुळ अर्थसंकल्पास मंजुरी देणे. | नाशिक पंचायत समितीची सर्वसाधारण सभा दि २५.०१.२०१६ विषय क्र ३० ठराव क्र २८४ | सोबत सत्यप्रत जोडली आहे. |
| ४. | तांत्रिक मान्यता आदेश झेरॉक्स मशिन पुरविणे (मागासवर्ग) | मा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. नाशिक यांचेकडील आदेश क्र जिपना/ सक/२० टक्के/ तांत्रिक मान्यता/१६५/२०१६ दि.११.२.२०१६ | सोबत सत्यप्रत जोडली आहे. |
| ५. | पुरवठा आदेश क्र व दिनांक | गट विकास अधिकारी (उ श्रे) पंचायत समिती नाशिक यांचेकडील आदेश क्र. पंसना/सक/योजना/ १११/२०१६ दि. १५ फेब्रुवारी २०१६ | सोबत सत्यप्रत जोडली आहे. |
| ६. | पुरवठादाराकडील बिल | टॅक्स इनव्हाईस नं. ९३११६८७३ दि.१५.०३.२०१६ रु.२७,७१,६६४/- | सोबत सत्यप्रत जोडली आहे. |
| ७. | प्रदान प्रमाणक | पंचायत समिती सेस प्रमाणक क्र.६ दि.३१.३.२०१६ रु.२७,५०,०००/- | सोबत सत्यप्रत जोडली आहे. |
| ८. | साहित्य वाटप | साठा नोंदवही पृष्ठ क्र १८ वर ७३ झेरॉक्स मशिन जमा बाबत नोंद आहे व | दि.५.१.२०१७ रोजी समक्ष चौकशी वेळी साठा नोंदवही तपासुन खात्री केली आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | पृष्ठ क्र २० ते २५ पर्यंत सर्व झेरॉक्स मशिन वाटप केलेबाबत नोंद आहे आजअखेर वाटप करणे बाकी नाही | |
| ९. | रेट कॉन्ट्रक्ट | डि.जी.एस.डी दिल्ली यांचेकडील रिको इंडिया लिमीटेड चे नांव रेट कॉन्ट्रक्ट दि.२२.०१.२०१६ | सोबत सत्यप्रत जोडली आहे. |
| १०. | जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांनी त्यांच्या उत्पन्नाच्या किमान २० टक्के रक्कमेतुन मागासवर्गीयाच्या कल्याण-साठीच्या घ्यावयाच्या योजना | ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र मागास/१०१८/प्रक्र ७३/ ३४ दि २०.१०.१९९९ | सोबत सत्यप्रत जोडली आहे. |
| ११. | शासकीय विभागांनी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठीच्या कार्यपध्दतीची नियमपुस्तीका | उदयोग उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्र.भांखस/२०१४/प्र.क्र.८२/ भाग iii/उदयोग ४ दि.३०.१०.२०१५ | सोबत सत्यप्रत जोडली आहे. |

नाशिक पंचायत समितीची सर्वसाधारण सभा दि.२९.१२.२०१५ विषय क्र. ३०-१ समाजकल्याण विभागाच्या योजना मंजुर करणे या विषयात सचिव यांनी शासन निर्णय ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय मुंबई क्र मागास/१०९८/पक्र ७३/ ३४ दि.२०.१०.१९९९ व संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे आदेश क्र संकवि८तांमा/२० टक्के/९९/२००० का १२/११०५ दि २४.११.२००० नुसार समाजकल्याण विभागाच्या योजना घेता येतील अशी माहिती पंचायत समिती सभेस दिलेली आहे. तसेच अतिरिक्त मुख्य अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील तांत्रिक मान्यता आदेश क्र. जिपना/सक/२० टक्के/ तांत्रिक मान्यता/१६५/२०१६ नाशिक दि.११.२.२०१६ मधील अट क्र ६- लाभार्थ्यास झेरॉक्स मशिन चालविण्याकरीता स्वतःच्या घराचा उतारा नमुना नं.८ आवश्यक आहे किंवा जागा भाडयाची असल्यास त्या घरमालकाचा करारनामा जोडणे/दुकानाचा उतारा आवश्यक आहे. तसेच अट क्र-९ जेथे झेरॉक्स मशिन चालवावयाचे आहे तेथे विदयुत पुरवठा उपलब्ध असलेबाबत लाईट बिलाची सत्यप्रत आवश्यक इ.अटीनुसार आवश्यक कागदपत्र प्रस्तावासमवेत अहवाल सादर करीत आहेत.

श्री व्ही आर विसपुते, सहाय्यक लेखा अधिकारी, समाजकल्याण विभाग, जि.प.नाशिक

श्री सी जे सरोदे, कनिष्ठ लेखा अधिकारी, वित्त विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

श्री महेंद्र सुर्यवंशी, वरिष्ठ सहाय्यक (लेखा) एबाविसे प्रकल्प सिन्नर

**सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवाल व सन २०१२.१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या संदर्भात पंचायत समितीचे नाशिकचे प्रश्नावली क्र.२ प्रश्न क्रमांक ५ बाबत मा. पंचायती राज समिती यांचेकडील कार्यवृतातील पृष्ठ क्र १५३ व १५४ बाबत समिती नाशिक येथे दिनांक ०५/०१/ २०१७ रोजी समक्ष भेट देवून केलेल्या चौकशीचा अहवाल :-**

सन २००८-०९ व सन २०११-१२ च्या लेखा परिक्षण पुर्नविलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नाशिक जिल्हा कामकाजाचा आढावा घेतला व त्यातील प्रश्नावली क्र २ प्रश्न क्रमांक ५ बाबत मा पंचायती राज

समिती यांचेकडील कार्यवृत्तातील पृष्ठ क्र. १५३ व १५४ बाबत कार्यालयीन आदेश क्र. जिपना/अर्थ/तपासणी/९/२०१७ नाशिक दिनांक ०४-०१-२०१७ अन्वये दिनांक ०५-०१-२०१७ रोजी पंचायत समिती नाशिकला समक्ष जावून चौकशी करण्यात आली चौकशी अहवाल खालील प्रमाणे आहे.

**चौकशीची बाब**

पंचायत समिती नाशिक यांचे वार्षिक अंदाजपत्रकाच्या संदर्भात समितीस असे आढळून आले की, पंचायत समिती स्तरावर शासन निर्णय लक्षात न घेता परस्पर निर्णय घेतले असतील तर त्यांना स्थगिती देण्यात यावी शासन निर्णय काही ठिकाणी डावलण्यात आला आहे तर ते थांबवावे पुर्ण चौकशी करुन या संदर्भातील अहवाल समितीकडे सादर करावा.

पंचायत समिती नाशिक येथिल सन २०१५-१६ चा सुधारित अर्थसंकल्पास शासन निर्णयानुसार पंचायत समिती, नाशिकची सर्वसाधारण सभा दि.२५.०१.२०१६ रोजीचा पारित ठराव क्र.२८४ नुसार सन २०१५-१६ चे सुधारीत व सन २०१६-१७ चा मुळ अर्थसंकल्पातील बाबवार तरतुदी छाननी करण्यात येऊन महाराष्ट्र जि.प. व पं.स. अधिनियम, १९६१ चे अधिनियम १३८ अन्वये पुरवणी अर्थसंकल्प तयार करुन पंचायत समितीची मान्यता घेण्यात आलेली आहे.

सन २०१५-१६ चा सुधारित अर्थसंकल्प खालीलप्रमाणे

| विभागाचे नाव | योजनेचे नाव | २०१५-१६ सुधारित तरतुद | २०१५-१६ मध्ये झालेला खर्च | शेरा |
|---|---|---|---|---|
| २०१० सार्व. आरोग्य | आरोग्य शिबीराचे आयोजन | १००००० | १००००० | १००% खर्च |
| २२१०-सार्व. आरोग्य, पाणी पुरवठा व स्वच्छता. | भुमिगत गटार योजना राबविणे | १६३९५५४१ | १६३९५४१ | १००% खर्च |
| २२३५- समाजकल्याण २०% सेस | झेरॉक्स मशीन योजना राबविणे | २७५०००० | २७५०००० | १००% खर्च |
| २२३५- अपंग कल्याण (३%) | झेरॉक्स मशीन योजना राबविणे | ४५०००० | ४५०००० | १००% खर्च |
| २२३७- महिला व बालकल्याण (१०%) | कुपोषित मुलांसाठी आहार वाटप करणे | १८७५०० | १८७५०० | १००% खर्च |
| २७०३ पशुसंवर्धन | दुधाळ गाई म्हशींना क्षार मिश्रणे जीवनसत्वे वाटप करणे. | १००००० | १००००० | १००% खर्च |
| २५११- पंचायत राज कार्यक्रम | यशवंत पंचायत अभियान व ग्राम अभियान बक्षिस अनुदान योजना राबविणे. | ५८०००० | ० | ५८०००० शिल्लक |
| ३०५४ - परिवहन (इवद) | १०१ १०२ (२७) रस्त्यांची मो-यांची देखभाल व दुरूस्ती. | ७११७४४७ | २०५४९४२ | ५०६२५०५ शिल्लक |
| | पं.स.सेस मध्ये जि.प.सेसची रक्कम जमा झाल्याने सदर रक्कम जि.प.सेसकडे वर्ग करण्यात आली आहे. | ० | २६६३८३ | (-) २६६३८३ |
| एकुण : | १४१११९८८ | ८७३५८२८ | ५३७६१६० | |

नाशिक पंचायत समिती सर्वसाधारण सभा दिनांक २५.०१.२०१६ रोजीचा पारित ठराव क्र.२८४ नुसार, एकूण प्राप्त निधी नुसार, समाज कल्याण विभागासाठी २०%, अपंग कल्याणसाठी ३% महिला व बालकल्याण विभागासाठी १०% तसेच आरोग्य विभाग पशुसंवर्धन विभाग यांच्या योजनेनुसार आवश्यक ती तरतुद करण्यात आलेली असून विभागाच्या शासन निर्णयानुसार योजना राबविण्यात आलेल्या आहेत व उर्वरित रक्कमेमधुन इमारत व दळणवळण विभागांतर्गत रस्त्यांची व मो-यांची देखभाल व दुरुस्तीकरिता तरतुद करण्यात आली असून त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे.

तसेच नाशिक पंचायत समितीला सन २०१३-१४ या वर्षाकरिता यश्वंत पंचायत राज अभियानामध्ये नाशिक महसूल विभागात तृतीय क्रमांक प्राप्त झाला असून बक्षीसाची रक्कम प्राप्त झालेली सन २०१६-१७ मध्ये खर्च करण्याबाबत नियोजन आहे.

तरी महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम, १९६१ व सर्व संबंधित विभागांच्या शासन निर्णयानुसार योजना राबविण्याबाबत अर्थसंकल्पात तरतुद करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या लेखासंहिता, १९६८ व संबंधित विभागांच्या शासन निर्णयानुसार अर्थ संकल्पातील योजना राबविणेबाबत कार्यवाही करण्यात आलेली आहे.

याप्रमाणे चौकशी अहवाल माहितीस्तव सविनय सादर.

## अभिप्राय व शिफारशी

नाशिक पंचायत समिती अंतर्गत शासन निर्णयानुसार समाज कल्याण विभागासाठी २०%, दिव्यांग कल्याणासाठी ३%, महिला व बालकल्याण विभागासाठी १०% तसेच आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग या विभागासाठी एकुण प्राप्त निधीनुसार वरीलप्रमाणे तरतुद करुन त्यानुसार कार्यवाही करण्यात आली आहे काय, याकरीता सन २०१२-१३ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालावर समितीने चर्चा केली. या चर्चेदरम्यान असे निदर्शनास आले की, समाजकल्याण विभागाने झेरॉक्स मशिनकरीता रुपये ४२,०००/- प्रति मशिन प्रमाणे २७ लाख ५० हजार रुपयांची तरतुद केली त्यानुसार लाभार्थी हा अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती प्रवर्गातील असावा, कोणत्याही नोकरीला नसावा या निकषानुसार मशिनचे वाटप करीत असताना लाभार्थ्यांकडे नाशिक शहरात दुकान असणे आवश्यक आहे, त्यामुळे गोरगरीब वर्गातील अनुसूचित जाती/जमातीच्या गरजू व्यक्तीना या योजनेचा लाभ मिळू शकत नाही, त्यामुळे झेरॉक्स मशिनऐवजी शासन निर्णयामधील इतर योजना राबविल्या असत्या तर ख-या अर्थाने समाजकल्याणचा हेतू साध्य झाला असता असे समितीचे मत आहे.

तसेच महिला व बालकल्याणासाठी एकूण अर्थसंकल्पाच्या १०% प्रमाणे तरतुद करण्यात आली आहे. त्याकरीता दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजीच्या शासन निर्णयानुसार ५०% रक्कम प्रशिक्षणासाठी व ५०% रक्कम साहित्य खरेदीसाठी खर्च करणे आवश्यक आहे. त्यानुसार महिला प्रशिक्षणासाठी एमएस-सीआयटी संगणक प्रशिक्षण योजना, ब्युटी पार्लर प्रशिक्षण, शिलाई मशिन योजना राबविण्यात येतात. सदर योजना शासन निर्णयानुसार राबविल्या जातात. **शासनाने १०% निधीची तरतुद करुन महिलांच्या कल्याणार्थ योजना राबविल्याचे त्यात अभिप्रेत आहे. या प्रकरणी नाशिक पंचायत समितीने केवळ झेरॉक्स मशिन ही एकच योजना राबविली आहे. इतर योजना राबविल्या असत्या तर अन्य महिलांना देखील त्याचा लाभ झाला असता. तथापि, तसे केले नाही. यापुढे शासन निर्णयात नमुद असलेल्या १५ बाबींवरील अन्य बाबींचा देखील विचार करुन त्यातून जास्तीत जास्त महिलांना लाभ मिळण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषदेने कारवाई करावी तसेच पंचायत समितीचा अर्थसंकल्प नियमबाह्य असल्यास त्यास मंजुरी देऊ नये असे स्पष्ट परिपत्रक शासनाने निर्गमित करावे अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण नऊ

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

## इंदिरा आवास घरकुल योजनांबाबत (पंचायत समिती, दिंडोरी)

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे इंदिरा आवास घरकुल योजनेंतर्गत सन २०१२-१३ या वर्षात एकूण ८५५ घरकुले मंजूर करण्यात आली होती, त्यापैकी ८०४ घरकुलांचे बांधकाम करण्यात आले, या योजनेंतर्गत ८०४ घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आला आहे, उर्वरित ३२ लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम हे प्रगती पथावर आहे, १९ घरकुले रद्द करण्यात आली आहेत. ३२ लाभार्थ्यांचे घरकुल बांधकाम प्रगतीपथावर आहेत असे म्हटले आहे. यासंदर्भात समितीस माहिती अवगत करावी अशी समितीने विचारणा केली असता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, दिंडोरी यांनी समितीस अशी माहिती दिली की, जागा नसल्यामुळे व जागेचा वाद असल्यामुळे १९ घरकुले प्रलंबित होती. ३२ पैकी २३ घरकुले हस्तांतरित करण्याचे राहिले होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, पंडित दीनदयाल उपाध्याय योजना आहे, त्या योजनेमध्ये जागेसाठी शासन ५० हजार रूपये देते. पंचायत समितीने या १९ लाभार्थ्यांचे प्रस्ताव पाठविले आहेत का, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ४९ प्रस्ताव पाठविले आहेत, त्यामध्ये या १९ प्रस्तावांचा देखील अंतर्भाव आहे. जानेवारीमध्ये पुन्हा पडताळणी करून लाभार्थी निवड झाली आहे आणि यादी बनविली आहे. सन २०१२-१३ ची यादी आहे व त्यामध्ये ७७०९ लाभार्थ्यांची निवड केलेली आहे. सन २०१५-१६ मध्ये पुन्हा पडताळणी करून अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती लाभार्थ्यांची यादी बनविली आहे. त्यामध्ये ५७०९ लाभार्थ्यांची निवड झालेली आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, लाभार्थी निवडीबाबतची यादी कशी तयार केली जाते. यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस माहिती दिली की, यादी बनविण्यासाठी तीन निकष आहेत, त्यामध्ये संबंधित व्यक्ती दारिद्र्यरेषेखाली असावी. तसेच ज्याच्याकडे पक्के घर नाही आणि ज्याने घरकुल योजनेचा कधीही लाभ घेतलेला नाही अशा व्यक्तीचा लाभार्थी यादीमध्ये समावेश केला जातो. पंचायत समिती अशा प्रकारची यादी ग्रामसेवकाकडून पंचायत समितीस प्राप्त झाल्यानंतर तालुका स्तरावर विस्तार अधिका-यामार्फत त्याची १०० टक्के पडताळणी होते. यावर समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीकडे किती मागणी अर्ज आले आहेत. घरकुल योजनेसंदर्भातील ५७०९ मागणी अर्ज प्राप्त झालेले आहेत अशी गटविकास अधिकारी यांनी समितीस माहिती दिली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, जागा नसल्यामुळे घरकुल देऊ शकत नाही असे उक्त यादीमध्ये किती लाभार्थी आहेत. तसेच लाभार्थ्यांना जागा देण्यासंदर्भात काय उपाययोजना करण्यात आल्या आहेत. ४९ जणांकडे जागा नाही. पंडित दीनदयाल योजनेमध्ये अशांचे प्रस्ताव तयार केले आहेत. सदर योजनेत जागा घेण्यासाठी ५० हजार रूपये अनुदान देण्यात येते, त्यातून लाभार्थी जागा खरेदी करून घेऊ शकतात असे गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले. यावर समितीने अशी विचारणा केली की, पंचायत समितीकडे ६०० जणांची यादी आहे. मात्र निकषात फक्त ५०० बसतात मग आपण कसे करणार, यावर गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, लोकसंख्या हा निकष समजला जातो. तालुक्यासाठी ५०० चे उद्दिष्ट असेल तर लोकसंख्येच्या प्रमाणात प्रत्येक गावामध्ये उद्दिष्ट दिले जाते. गुणांकनानुसार नावे ठरविली जातात. यावर समितीने असे निदेश दिले की, घरकुले वाटप करताना लॉटरी पध्दतीचा अवलंब करण्याची गरज आहे. लाभार्थ्यांना त्यांच्या गुणानुक्रमानेच मात्र टप्प्याटप्प्याने लॉटरी काढून घरकुलांचे वाटप करण्याबाबत विभागीय सचिवांचे मत जाणून घेण्यासाठी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस अशी माहिती दिली की, इंदिरा आवास घरकुल योजना ही केंद्र शासनाची योजना आहे केंद्र शासन राज्याला आदेश देते. लोकसंख्येच्या प्रमाणात उद्दिष्ट दिले जाते. महाराष्ट्र राज्याला सन २०१५-१६ ला १ लाख ५९ हजारांचे उद्दिष्ट आहे. नाशिकमध्ये लोकसंख्येच्या प्रमाणात १० हजारांचे उद्दिष्ट आले आहे. नाशिकच्या लोकसंख्येप्रमाणे १० हजारांच्या प्रमाणात तालुक्यांना वाटप करतात. गट विकास अधिकारी लोकसंख्येच्या प्रमाणात वाटप करतात आणि त्या संदर्भातील निकषांनुसार गुण दिले जातात. आता शासनाने नव्याने धोरण यासाठी आणले आहे की, सर्वांना घरे मिळतील. यावर समितीने पुढे अशी विचारणा केली की, आपण म्हटल्याप्रमाणे पंडित दीनदयाल उपाध्याय योजनेंतर्गत ४९ प्रस्ताव पाठविले आहेत. आपण हे प्रस्ताव शासनाकडे कधी पाठविले आणि त्या प्रस्तावांची सद्यःस्थिती काय आहे. यावर

गटविकास अधिकारी यांनी समितीस विदित केले की, सदरहू प्रस्ताव डिसेंबर, २०१५ मध्ये डीआरडीए अंतर्गत पाठविले आहेत. मात्र अद्याप मंजूर झालेले नाहीत. यावर समितीने असे निदेश दिले की, सदर विषय विभागीय सचिवांच्या साक्षीसाठी घेण्यात यावा.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

इंदिरा आवास घरकुल योजना (अहवालवर्षातील) म्हणजेच सध्याची प्रधानमंत्री आवास योजनेची अंमलबजावणी करताना घरकुलांचे वाटप गुणवत्तेवर करण्याकरिता तसेच योजनेतील गैरप्रकार दुर करण्याकरिता लॉटरी पध्दत वापरणे सोयीस्कर राहील असे समितीचे मत असून त्याबाबत शासनाची भूमिका काय आहे?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

जिल्हा परिषदेची माहिती निरंक आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**ग्रामविकास विभागाचे अभिप्रायः-**

इंदिरा आवास योजना व सध्याची प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) ह्या केंद्र पुरस्कृत योजना असून त्याची अंमलबजावणी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार केली जाते.

केंद्र शासनाने सन २०१६-१७ पासून इंदिरा आवास योजनेचे स्वरूप बदलून प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) राबविण्याचा निर्णय घेतला. सदर योजनेच्या लाभार्थ्यांची निवड सामाजिक, आर्थिक व जात सर्वेक्षण-२०११ च्या माहितीच्या आधारे करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यासाठी केंद्र शासनाने गाव व प्रवर्गनिहाय प्राथम्यता यादी (Generated Priority List) उपलब्ध करून दिली असून त्यानुसार ग्रामसभेमध्ये लाभार्थ्यांची निवड करण्यात आली असून अशा घरकुल पात्र कुटूंबांची यादी प्रपत्र-ब मध्ये करण्यात आली आहे.

प्राथम्यता यादी (Generated Priority List) मध्ये समाविष्ट नसलेले परंतु प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) चा लाभ घेण्यास पात्र असणा-या कुटूंबाचा समावेश प्रपत्र-ड मध्ये करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांची नोंदणी (Registration) केंद्र शासनाच्या आवास सॉफ्ट संगणक प्रणालीमध्ये करण्यात येते. ग्रामसभेने ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार सदर घरकुल लाभार्थ्यांना लाभ देण्यात येत आहे. त्यामुळे गैरव्यवहार होण्याची शक्यता नाही.

### अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेला भेट दिली. सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान समितीच्या असे निदर्शनास आले की, पंचायत समिती, दिंडोरी येथील इंदिरा आवास घरकुल योजनेंतर्गत सन २०१२-१३ या वर्षात एकूण ८५५ घरकुले मंजूर करून ८०४ घरकुलांचा ताबा लाभार्थ्यांना देण्यात आला आहे. परंतु उर्वरित ५१ पैकी १९ घरकुले रद्द करण्यात आली आणि उर्वरित ३२ घरकुलांची बांधकामे प्रगतीपथावर असल्याचे म्हटले आहे, काही ठिकाणी जागा उपलब्ध नसणे, जागेचा वाद असल्याने १९ घरकुले प्रलंबित होती, त्यात ३२ पैकी २३ घरकुले हस्तांतरित करण्याचे राहिले होते.

पंडित दीनदयाल उपाध्याय योजनेतून १९ लाभार्थ्यांच्या प्रस्तावांचा अंतर्भाव असल्याची मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला माहिती दिली. सन २०१२-१३ च्या यादीत ७७०९ लाभार्थी आणि सन २०१५-१६ च्या पडताळणीतील अनुसूचित जाती अनुसूचित जमाती प्रवर्गातील ५७०९ लाभार्थ्यांची निवड झाली आहे, तसेच योजनेत पुढील तीन निकष आहेत. (१) संबंधित व्यक्ती दारिद्र्य रेषे खालील असावी, (२) पक्के घर नसलेले आणि, (३) घरकुल योजनेचा कधीही लाभ घेतलेला नाही.

सन २०१५-१६ मध्ये राज्याला १ लाख ५९ हजाराचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. सर्वांना घरे मिळतील असे नवे धोरण

शासनाने आणले आहे. तथापि, समितीकडे घरकुल योजनेबाबत लोकांच्या तक्रारी आल्या आहेत. केंद्र शासनाने सन २०१६-१७ पासून इंदिरा आवास योजनेचे स्वरूप बदलून प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) राबविण्याचा निर्णय घेतला. सदर योजनेच्या लाभार्थ्यांची निवड प्रपत्र-ब मध्ये करण्यात आली आहे. ग्रामसभेने ठरविलेल्या प्राथम्यक्रमानुसार सदर घरकुल लाभार्थ्यांना देण्यात यावे असे ग्रामविकास विभागाचे अभिप्राय आहेत.

आर्थिकदृष्ट्या कमकुवत असणा-या कुटुंबास निवारा उपलब्ध करून देणे कल्याणकारी राज्याचे कर्तव्य आहे. घरकुलांचे निकष पूर्ण करणा-या लाभार्थ्यांस राहण्याकरीता घर बांधणे सोयीस्कर व्हावे असे समितीचे आग्रही मत आहे. घरकुल लाभार्थ्यांची यादी ग्रामसेवकाकडून पंचायत समितीस प्राप्त झाल्यानंतर तालुका स्तरावर विस्तार अधिका-यामार्फत पडताळणी करण्यात येते. दिंडोरी पंचायत समितीकडे घरकुल योजनेसंदर्भातील ५७०९ अर्ज प्राप्त झाले आहेत. **या अर्जातील सर्वच लाभार्थ्यांना टप्प्याटप्प्याने घरे देण्यासंदर्भात कार्यवाही करावी. त्यात शासनाच्या निर्णयाप्रमाणे प्राथम्यक्रमाने घरे मंजूर करावीत व एकही बेघर कुटुंब घराविना राहणार नाही याची दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

## प्रकरण दहा

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

## अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा अखर्चित निधी खर्च न करणेबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने अशी विचारणा केली की,दलित वस्ती सुधार योजनेतील कामे करण्यासाठी शासनाकडे केव्हा परवानगी मागितली अशी विचारणा समितीने केली असता सन २०१० ते २०१३ मध्ये ८३.०५ कोटी रुपये शिल्लक होते. त्यापैकी ४१.५५ कोटी रुपयांची खर्चाची परवानगी मिळण्याबाबत सन २०१२ ते २०१४ मध्ये शासनाकडे प्रस्ताव पाठविला होता. दिनांक ६ जून, २००८ रोजीचा वित्त विभागाचा शासन निर्णय आहे. त्यानंतर वेळेत पैशांचा वापर झाला नसेल तर ते पैसे परत करावेत अशी माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीला दिली.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, लहान लहान कामे आहेत. सदर वर्षी निधी प्राप्त झाला असताना सुध्दा निधी खर्च न होण्याची कारणे काय आहेत, ही अतिशय गंभीर बाब आहे, तसेच शासनाकडून सदर प्रस्तावांना परवानगी मिळाली नाही, असे त्यांचे म्हणणे आहे. याबाबत दलित वस्त्यांमधील रस्ते, गटारी अशी विविध कामे आहेत. यासंदर्भात दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे अशी माहिती जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी समितीस विशद केली. या संदर्भात समितीला सविस्तर माहिती मिळाली नसल्याने समितीचे समाधान झालेले नाही. सदरहू विषय साक्षीला घेण्यात येईल असे समितीने निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या संदर्भात जिल्हा परिषद, नाशिक यांनी अखर्चित निधी खर्च करण्याबाबत दिनांक २३/३/२०१६ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला आहे. सदर प्रस्तावावर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे. अशा प्रकारे निधी अखर्चित राहण्यासंबंधी जबाबदारी निश्चित करुन निधी अखर्चित राहू नये या करिता शासनाने कोणती उपाययोजना हाती घेतलेली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सन २०११-१२ व २०१२-१३ मध्ये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे (पुर्वीचे नांव दलित वस्ती सुधार योजना) या योजनेतंर्गत शासनाकडून मंजूर रक्कम रु.४१,५४,९८०/- इतकी अखर्चित आहे. सदर निधी खर्च करणेसाठी शासनाच्या परवानगीसाठी या कार्यालयाचे पत्र क्र.५५६ दि.७.५.२०१४ व क्र.६४९ दि.१६.६.२०१४ अन्वये रु.३१,८५,७००/-, पत्र क्र.१०३९ दि.९.९.२०१४ रु.५,९९,२८०/- व पत्र क्र.४३२ दि.२३.२.२०१६ अन्वये एकूण एकत्र रु.३१,८५,७००/+५,९९,२८०/- + ३,७०,०००/- =४१,५४,९८०/- रक्कमेस परवानगी मिळणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

### मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे अभिप्राय :-**

या प्रश्नासंबंधी शासन पत्र क्रमांक दवसु-२०१७/प्र.क्र.१३४/अजाक, दिनांक ७ ऑक्टोबर, २०१७ अन्वये शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ नुसार अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास योजनेंतर्गत वितरीत केलेल्या अनुदानापैकी अखर्चित निधी खर्च करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी असे आयुक्त, समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात आलेले आहे.

## विभागीय सचिवांची साक्ष

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारलेल्या प्रश्नास सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांनी समितीस असे विदित केले की, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे या योजनेमध्ये सन २०११-१२ आणि सन २०१२-१३ या वर्षी अखर्चित राहिलेल्या ४१,५४,९८०/- रुपये निधीची परवानगी देण्यासंदर्भात हा मुद्दा आहे. यासंदर्भात पंचायती राज समितीने दिलेल्या निदेशाप्रमाणे वित्त विभागाने दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ पूर्वी जो निधी मुक्त केला आणि अखर्चित असलेल्या निधीच्या संदर्भात निदेश दिलेले असून त्यात भौतिकदृष्ट्या कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच खर्चाच्या परवानगी अभावी देयकाचे प्रदान होऊ शकत नाही. अशा सर्व प्रकरणात दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत देयकाचे प्रदान होण्याची कार्यवाही अखर्चित निधीतून पूर्ण करावी असे निदेश दिलेले आहेत. वित्त विभागाने दिलेल्या निदेशानुसार सर्व ठिकाणी सूचना निर्गमित केलेल्या आहेत.

यावर समितीने अशी विचारणा केली की, दिनांक ३१ मार्च, २०१६ नंतर ज्या सूचना दिलेल्या आहेत, त्या कधी पूर्ण होणार, शासनाने निदेश देऊनही निधी खर्च होत नाही. मागासवर्गीयांच्या वस्तींच्या विकासासाठी मिळणारा निधी शासनाकडे वर्ग करुन विहित कालावधीत पूर्ण करण्यासाठी काही उपाययोजना करणे गरजेचे आहे. यावर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांनी समितीस विदित केले की, त्यासाठी वित्त विभागाने परिपत्रक काढलेले आहे. त्या परिपत्रकात सन २०११-१२ आणि सन २०१२-१३ हे सुध्दा एकत्रित केले आहे. निधी अभावी ज्यांच्या देयकाचे प्रदान होऊ शकत नाही, त्यांना दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ ही मुदत दिलेली होती, त्या मुदतीत त्यांनी सदरहू निधी खर्च करावा असे अपेक्षित होते.

समितीने मागचा जो अखर्चित निधी होता तो खर्च झालेला आहे काय, तसेच सन २०११ पासून निधी प्रलंबित असतांना सन २०१७ पर्यंत एवढ्या कालावधीची मुदत दिल्यानंतरही खर्च झालेला नाही. मागासवर्गीय वस्त्यांमध्ये अनास्था दाखविण्याचे कारण काय आहे अशी विचारणा केली असता त्याबाबत सदरहू निधी जिल्हा परिषद, नाशिक यांनी खर्च केलेला नाही. दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ रोजीच्या शासन निर्णयाप्रमाणे वित्त विभागाच्या मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांचेशी चर्चा केल्यानंतर सन २०१५-१६ चा निधी सन २०१६-१७ पर्यंत खर्च करणे आवश्यक आहे. याशिवाय सन २०१५-१६ च्या निधीपुरते ते आहे असे मत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विशद केले. तसेच पंचायती राज समितीच्या निदेशानुसार वित्त विभागाने हा निर्णय काढलेला आहे. यामध्ये असे स्पष्ट केले आहे की, दिनांक ३१ मार्च, २०१६ पर्यंत मुक्त केलेला परंतु तो अखर्चित निधी आहे असे गट विकास अधिकारी यांच्याकडून समितीस माहिती देण्यात आली.

समितीने पुढे असा उपप्रश्न केला की, पैसे खर्च करण्यासाठी नेमकी काय अडचण आहे. यावर सचिव, ग्रामविकास विभाग यांनी सांगितले की, तो पैसा अजुनही उपयोगात आणलेला नाही, याबाबत दिनांक २१ सप्टेंबर, २०१७ चा शासन निर्णय असा आहे की, सन २०१५ ते १७ मध्ये जी कामे पूर्ण झालेली असतील आणि जो निधी शिल्लक असेल तो खर्च करण्यासंदर्भातील शासन निर्णय आहे. सदरहू कामे सन २०११-१२ आणि सन २०१२-१३ च्या संदर्भातील आहेत ती सन २०१६-१७ मध्ये खर्च करण्यात यावी अशी माहिती मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला विशद केली.

याबाबत सचिव, ग्राम विकास विभाग यांनी सांगितले की, माहे सप्टेंबर, २०१७ च्या शासन निर्णयात लिहिले आहे की, सन २०१६ च्या पूर्वी मुक्त केलेली जी रक्कम आहे त्यामध्ये भौतिक काम पूर्ण केले असेल आणि परवानगी नसल्यामुळे देयक अदा केले नसेल तर तुम्हाला देयक अदा करण्याची मुभा आहे. दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत त्यांना मुभा होती, यामध्ये त्यांची काही चूक झाली असेल तर त्याची निश्चित आकडेवारी जिल्हा परिषदेने द्यावी अशी माहिती समितीस विशद करण्यात आली.

## अभिप्राय व शिफारशी

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी सन २०१२-१३ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीच्या निदर्शनास आले की, अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे व दलित वस्ती सुधार

योजनेतील कामे करण्यासाठी शासनाकडे परवानगी मागितली असता सन २०१० ते २०१३ मध्ये ८३.०५ कोटी रुपये शिल्लक होते, त्यापैकी ४१.५५ कोटी रुपये खर्चाची परवानगी मिळण्याबाबत सन २०१२ ते २०१४ मध्ये आणि दिनांक १३ जानेवारी, २०१६ रोजी शासनाकडे प्रस्ताव पाठविलेला होता, शासनाकडून सदर प्रस्तावांना परवानगी मिळाली नसल्याने निधी खर्च झालेला नाही, दलित वस्त्यांमधील रस्ते, गटारे अशी विविध कामे आहेत.

पंचायती राज समितीने दिलेल्या निदेशाप्रमाणे वित्त विभागाने दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ पूर्वी जो निधी मुक्त केला आणि त्यातील भौतिकदृष्ट्या कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच खर्चाच्या परवानगी अभावी देयकाचे प्रदान होऊ शकले नाही अशा सर्व प्रकरणात दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत देयकाचे प्रदान त्वरेने करण्यात यावे. तसेच सन २०१६ पूर्वी मुक्त केलेली जी रक्कम आहे त्या रक्कमेवर भौतिक कामे पूर्ण केलेली असल्याचे आणि परवानगी नसल्यामुळे देयके अदा केलेली नसल्यास दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत देयके अदा करण्याची मुभा होती, यामध्ये काही प्रलंबित असलेल्या म्हणजेच हे काम झालेले आहे परंतु देयके अदा केलेले नाही अशी माहिती नियमित आकडेवारी घेऊन त्यावर यथोचित कार्यवाही करावी. **तसेच ४१.५५ कोटी रुपये खर्चास परवानगी मागितलेल्या व शासनाकडे प्रलंबित असलेल्या प्रस्तावावर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा व आवश्यकतेप्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे. याबाबत शासनाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यात पाठविण्यात यावी.**

प्रकरण अकरा

## जिल्हा परिषद, नाशिक (प्रशासन)

## समितीच्या नाशिक जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांशी झालेल्या अनौपचारीक चर्चेदरम्यान उपस्थित झालेल्या मुद्यांबाबत

पंचायती राज समितीने दिनांक ५ ते ७ मे, २०१६ या कालावधीत नाशिक जिल्हा परिषदेस भेट दिली. भेटीच्या वेळी जिल्ह्यातील पदाधिका-यांसोबत अनौपचारिक चर्चा करीत असताना सभापती, कृषी व पशुसंवर्धन यांनी कृषि विभागाच्या ब-याच योजना राज्य सरकार मार्फत राबविण्यात येणा-या योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित केल्यास जिल्हा परिषदा अधिक सक्षम होईल यासंदर्भात तातडीने कार्यवाही व्हावी.

सभापती, पंचायत समिती, नाशिक यांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत प्रत्येक जिल्हा परिषदेला कचराकुंडी, घंटागाडी घेण्यासाठी निधीची तरतूद केली पाहिजे. प्रत्येक तालुक्यात समाजकल्याण अधिकारी नेमणे आवश्यक आहे. विस्तार अधिकारी बैठकीला उपस्थित राहत नाहीत, तसेच नाशिक पंचायत समितीच्या इमारतीचे बांधकाम अद्याप अपूर्ण आहे, सदरहू बांधकाम पूर्ण झाले पाहिजे, कारण काम अपूर्ण राहिल्यानंतर लेखा आक्षेप येत असतात. सदरहू लेखा परिक्षण आक्षेपाबाबत आम्ही जिल्हा परिषदेची साक्ष घेणार असून आपल्या काही सूचना असतील तर त्या समिती समोर मांडाव्यात. समिती आपल्या सूचनांची निश्चितपणे नोंद घेईल असे समितीने आश्वासित केले.

अध्यक्षा, जिल्हा परिषद यांनी समितीस खालील प्रमाणे माहिती विशद केली. राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत ग्रामीण भागातील ब-याच ग्रामपंचायती मध्ये गैरव्यवहार झालेला आहे. ग्रामसेवक तसेच पाणी पुरवठा समितीवर कोणाचेही नियंत्रण नाही. चौदाव्या वित्त आयोगाचा निधी थेट ग्रामपंचायतीकडे जाणार आहे. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत ही त्रिस्तरीय रचना आहे. या त्रिस्तरीय समित्या सक्षम राहिल्या तर त्यांच्यामार्फत चांगली कामे होतील. जिल्हा परिषदांच्या स्थानिक शाळांमध्ये ई-लर्निंगद्वारे शिक्षण कसे देता येईल यासाठी जिल्हाधिका-यांनी नाविन्यपूर्ण मदत केली. त्याकरिता त्यांनी १.६० कोटी रुपयांचा निधी सुध्दा उपलब्ध करुन दिला, परंतु टीएस मिळविण्याकरिता अडचणी येत आहेत. “डिजिटल इंडिया” करीत असताना या अडचणी सोडविणे तसेच प्रत्येक शाळेत ई-लर्निंग कसे देता येईल यासाठी प्रयत्न करणे अत्यावश्यक आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात डॉक्टर उपस्थित राहत नसल्याबाबत अनेक तक्रारी असतात. यासंबंधी शासनाने शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात बायोमेट्रिकचा अवलंब करण्यासंबंधी मी यापूर्वी संकल्पना मांडली होती. जिल्हाधिका-यांनी बायोमेट्रिक सिस्टिम सुरु करण्याकरिता २५ लाख रुपयांचा निधी दिला. टीएस मिळविण्याकरिता शासन स्तरावर सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. परंतु टीएस मिळाला नाही. ग्रामपंचायती, शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र अशा ठिकाणी बायोमेट्रिक पध्दतीचा अवलंब कशा प्रकारे करता येईल यासाठी समितीने आम्हाला सहकार्य करावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

याबाबत बायोमेट्रिक सिस्टिमसंबंधी यापूर्वी सदनात चर्चा झाली होती. राज्याच्या वित्त मंत्र्यांनी या संदर्भात निर्णय घेतला आहे. स्थानिक विकास निधीतून याकरिता निधी देता येऊ शकेल. नाशिक जिल्ह्यात १५ तालुक्यांमधील १५ आमदारांच्या माध्यमातून बायोमेट्रिक किंवा ई-लर्निंग असो अशी कामे स्थानिक विकास निधीतून घेता येऊ शकतील असे समितीने सूचित केले.

आमदार विकास निधी प्रमाणे जिल्हा परिषद सेसमध्ये १० लाख रुपयांपर्यंत वाढविणे अत्यावश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने कामे घेतल्यानंतर ठेकेदार कामे करीत नाहीत. बांधकाम विभागाची ५-५ लाख रुपयांची अनेक कामे प्रलंबित आहेत. २० टक्के बिलो कामे घेऊनही एक वर्षापासून ती कामे पूर्ण झालेली नाहीत. या सर्व बाबी विचारात घेता जिल्हा परिषद सेसमध्ये वाढ करणे अत्यावश्यक आहे अशी माहिती समितीस दिली.

इगतपुरी तालुक्यात सन २००७ पासून ४१ पाणी पुरवठा योजना कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दाखविण्यात आले, परंतु प्रत्यक्षात ४१ पैकी ३९ पाणीपुरवठा योजना बंद आहेत. या संदर्भात तांत्रिक सल्लागार समिती, एजन्सी अध्यक्ष तसेच सचिव यांच्या समवेत पंचायत समिती स्तरावर अनेक बैठका झालेल्या आहेत असे सभापती, पंचायत समिती, इगतपुरी यांनी समितीला माहिती विशद केली. यासंबंधी समितीकडे सविस्तर माहिती द्यावी असे समितीने पदाधिका-यांना निदेशित केले.

इगतपुरी पंचायत समिती मध्ये गट विकास अधिकारी यांनी विशेष कार्योत्तर मंजुरी न घेता नियमबाह्य पध्दतीने ग्रामविकास अधिकारी तसेच ग्रामसेवकांच्या बदल्या केलेल्या आहेत, यासंबंधी आर्थिक देवाणघेवाण सुध्दा झाली आहे. श्री. किरण कोवे नावाचे गट विकास अधिकारी, इगतपुरी पंचायत समितीमध्ये कार्यरत आहेत. या प्रकरणी जिल्हा परिषद स्तरावर तक्रार करुनही त्याबाबतीत कोणतीही दखल घेण्यात आलेली नाही. माहितीच्या अधिकारान्वये माहिती घेतली असता नियमानुसार मे महिन्यात बदल्या न करता नियमबाह्य पध्दतीने संपूर्ण जिल्ह्यात १०० ते १५० बदल्या केल्या आहेत. सदर विषयाच्या बाबतीत मा. उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका सुध्दा दाखल केली आहे. मी विभागीय आयुक्त, मुख्य कार्यकारी अधिकारी स्तरावर पत्र व्यवहार केला आहे. मात्र माझ्या कोणत्याही पत्राची दखल घेतली गेली नाही. आरोग्य विभागामध्ये कंत्राटी आरोग्य सेविका जवळपास ८२ आहेत असे सभापती, पंचायत समिती, इगतपुरी यांनी समितीला माहिती विशद केली.

उच्च न्यायालयाच्या प्रकरणाची परिस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता मा. उच्च न्यायालयामध्ये आताच ८ दिवसांपूर्वी जनहित याचिका दाखल केली आहे असे सभापती, पंचायत समिती, इगतपुरी यांनी समितीला माहिती दिली.

गट विकास अधिका-यांचे नाव काय आहे अशी विचारणा समितीने केली असता सदरहू गट विकास अधिका-यांचे नाव श्री. किरण कोवे आहे. आरोग्य विभागामध्ये देखील अशाच पध्दतीने नियमबाह्य बदल्या करण्यात आल्या आहेत. कंत्राटी सीट्स आहेत, २० हजार रूपयांची मागणी करून हे सर्व करण्यात आले आहे. वरिष्ठांची पूर्वपरवानगी न घेता तालुका स्तरावर परस्पर नेमणुका करून घेतल्या आहेत. ज्या महिलांकडे देण्यासाठी पैसे नव्हते, त्यांच्याकडे शरीरसुखाची मागणी करण्यात आली आहे. सदर विषयाच्या बाबतीत माझ्याकडे लेखी पुरावे आले आहेत असे सभापती, पंचायत समिती, इगतपुरी यांनी समितीला माहिती उपलब्ध करुन दिली.

संबंधित अधिका-यांचे नाव काय आहे अशी समितीने विचारणा केली असता सदरहू अधिका-यांचे नाव डॉ. संजय पवार असून ते तालुका वैद्यकीय अधिकारी आहेत असे सभापती, पंचायत समिती, इगतपुरी यांनी समितीला माहिती दिली. यावर या संदर्भातील लेखी सबळ पुरावे द्यावेत असे समितीने संबंधितांना निदेश दिले.

आयसीडीएस विभागामध्ये देखील तीच परिस्थिती आहे. सन २०१४ मध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाणघेवाण करून नियमबाह्य व चुकीच्या पध्दतीने भरती प्रक्रिया राबविली होती. विद्यमान आमदार, माजी आमदार, जिल्हा परिषद सदस्य सर्वांनी मिळून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे तक्रार करुन ती भरती प्रक्रिया रद्द केली होती. यावर्षी पुन्हा भरती प्रक्रिया घेतली आहे, यामध्ये सुध्दा नियमबाह्य पध्दतीने काम करण्यात आले आहे, आर्थिक देवाणघेवाण झाली आहे. पंचायत समितीच्या सेसमध्ये खोट्या पध्दतीने ठराविक प्रशिक्षणे दाखवून एजन्सीच्या नावाने देयके काढण्यात आली आहेत. माझ्याकडे त्याचे सुध्दा लेखी पुरावे आहेत असे सभापती, पंचायत समिती, इगतपुरी यांनी समितीला माहिती दिली. यावर बैठक संपल्यानंतर या संदर्भात आपल्याकडे असलेल्या सर्व कागदपत्रांच्या छायांकित प्रती समितीला सादर करण्यात याव्यात असे समितीने संबंधितांना निदेश दिले.

तालुका दुष्काळी व अवर्षणप्रवण असल्यामुळे तालुक्यात पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. तालुक्यात पुणे गावचे धरण आहे. सदर धरणाचा कॅनॉल आमच्या गावात आलेला आहे. सदर कॅनॉलचे काम अपूर्णावस्थेत असल्यामुळे अद्यापपर्यंत शेवटच्या टोकापर्यंत पाणी पोहचलेले नाही. सदर कॅनॉलला मोठ्या प्रमाणात गळत्या तयार झाल्या आहेत. सदर विषयाच्या बाबतीत चौकशी करावी आणि कॅनॉलच्या पूर्णतेचा प्रश्न मार्गी लावावा. आमच्या तालुक्यातील डॉक्टर मुख्यालयी राहत नाहीत. डॉक्टरांना साध्या आजारावर औषधे देता येत नाही. एखाद्या आजाराच्या संदर्भात प्राथमिक आरोग्य केंद्रात गेले असता तत्संदर्भातील उपचार न करता रुग्णांना तालुक्याच्या ठिकाणी पाठविले जाते. प्रसृतीसाठी गेले असता तेथे काही महिलांचे बाळ दगावले आहे अशी माहिती सभापती, पंचायत समिती, चांदवड यांनी समितीला दिली.

सदर डॉक्टरांचे नाव काय आहे असा प्रश्न समितीने उपस्थित केला असता त्यास सदर प्राथमिक आरोग्य केंद्र वडाळी असून तेथे डॉ. भोये मॅडम आहेत. मला कार्यालयीन कामासाठी वरचेवर तालुक्यामध्ये फिरावे लागते. मात्र मला अजुनही पंचायत समितीची सभापती म्हणून गाडी दिलेली नाही. मी कार्यालयीन कामासाठी माझी स्वतःची गाडी वापरत आहे अशी माहिती सभापती, पंचायत समिती, चांदवड यांनी समितीला दिली.

डॉक्टरांना थंडी, ताप यासारख्या किरकोळ आजारांवर देखील औषध देता येत नाही. आमच्या पंचायत समितीला नवीन इमारत मंजूर झाली असून सदर इमारतीचे काम सुरू  होणार आहे. स्थानिक लोकप्रतिनिधी त्याबाबत पाठपुरावा करीत आहेत. आमचा तालुका अवर्षणग्रस्त असुनही पेय जल योजना अपूर्ण असल्यामुळे टँकरने पाणी पुरवठा होत आहे अशी माहिती सभापती, पंचायत समिती, चांदवड यांनी समितीला दिली.

विभागांतर्गत सीडीपीओ संवर्गाची एकूण २६ पदे असून त्यातील फक्त ८ पदे भरली आहेत, १८ पदे रिक्त आहेत. मी महिला व बाल कल्याण समितीची सभापती असुनही मला गाडी देण्यात आलेली नाही. कार्यालयीन कामासाठी माझी स्वतःची गाडी वापरते. मला आपल्यासमोर असे सांगायचे आहे की, मी सदर पदावर आल्यापासून मला गाडी देण्यात आलेली नाही. आपण या संदर्भात लक्ष घालून संबंधितांना कार्यवाही करण्याचे आदेश द्यावेत अशी माहिती सभापती, महिला व बाल कल्याण समिती, जिल्हा परिषद यांनी समितीला दिली.

जुनी एक गाडी तयार आहे. सदर विषयाच्या बाबतीत सेस मध्ये तरतूद करावी लागेल असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला माहिती विशद केली.

आपण एचओडींची गाडी निर्लेखित झाली असेल तर त्यांच्या नावाने गाडी घेऊन सभापतींना द्यावी आणि नंतर सभापतींची गाडी एचओडींना द्यावी. आपल्याला गाडी घसारा निधीतून घ्यावयाची आहे. यासंदर्भात आदेश द्यायचे आहेत. एचओडींच्या गाड्या निर्लेखित करुन नवीन गाड्या खरेदी करण्याबाबत फक्त आदेश द्यायचे आहेत. जिल्हा परिषदेच्या निधीचे मालक जिल्हा परिषदेचे अध्यक्ष असतात. त्यामुळे आपण या संदर्भात फक्त आदेश द्यावयाचे आहेत अशी माहिती समितीने बैठकीत विशद केली असता आम्ही आमच्या आदिवासी जिल्ह्यात पंचायत समितीच्या सभापतींना घसारा निधीतून गाड्या घेऊन दिल्या आहेत. सभापती यांना गाडया दिल्याच पाहिजेत अशी समितीने विचारणा केली असता त्याबाबत मी यापूर्वीच या संदर्भात आदेश दिले आहेत अशी माहिती अध्यक्ष, जिल्हा परिषद, नाशिक यांनी समितीला माहिती देण्यात आली.

पंचायत समितीचे कामकाज करीत असताना खंत वाटते.  त्या संदर्भात समितीने मार्गदर्शन करावे. याबाबत शासनाकडे समितीने पाठपुरावा केला तर बरे होईल. उच्च पातळीवर जो पत्र व्यवहार होतो तो टपालाद्वारे पाठविण्यात येतो. टपालाद्वारे आलेली पत्रे, परिपत्रके, शासन निर्णय गटविकास अधिका-यांकडे पाठविली जातात. या संदर्भात सभापतींना विश्वासात घेतले जात नाही किंवा आलेली पत्रे त्यांच्या निदर्शनास आणून दिली जात नाहीत. मालेगाव असो किंवा नाशिक मधील इतर कोणताही तालुका असो, प्रशासन जे कामकाज करते, जे प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठविले जातात त्याबाबत पंचायत समितीच्या सभापतींना माहिती दिली जात नाही किंवा त्यांची सही घेतली जात नाही. त्यांच्या टेबलवर प्रस्ताव येत नाहीत. मी गेले ७ महिने सभापती म्हणून कामकाज करीत आहे.  अधिका-यांशी या संदर्भात वाद घालावा लागतो. गटविकास अधिकारी श्री. पिंगळे हे चांगले काम करीत आहेत. जिल्हयाची प्रशासन यंत्रणा सभापतींना अंधारात ठेवून काम करीत आहे. सभापती जर कामकाजाबाबत अनभिज्ञ असतील तर विकास कसा होऊ शकतो. योजनांबाबत काय माहिती मांडू शकतात, दरमहा पंचायत समितीची मासिक सभा घेतली जाते. सभेपुढील विषयाबाबत सात दिवस अगोदर सभापती व सदस्यांना माहिती दिली पाहिजे.  आम्ही बैठकीला आल्यानंतर आम्हाला कामकाजाची माहिती दिली जाते. बैठकीमध्ये चहापान होते आणि बैठक संपते. सभापती व उप सभापतींना, सदस्यांना अधिकार नसेल तर केरळ सारख्या राज्याने जे धोरण स्वीकारले ते लागू करावे. अन्यथा आम्हाला आमचे अधिकार मिळाले पाहिजेत. पदाधिका-यांच्या अधिकाराबद्दल पंचायत समितीच्या अधिनियमामध्ये दोन पाने लिहिलेली आहेत. कार्यालयात गेल्यानंतर पदाधिका-यांना हारतुरे देतात, त्यामुळे पदाधिकारी सांगतात दप्तर राहू द्या. माझी समितीला विनंती आहे की, आमचे मत वरिष्ठांपुढे मांडावे. जो पत्र व्यवहार होतो तो आम्हाला दाखविण्यात यावा. धनादेशावर सही करण्याचा आम्हाला अधिकार नाही. मालेगाव तालुक्यामध्ये एक रुपयाच्या धनादेशावर सही करण्याचा सभापतींना अधिकार नाही. सरपंचांना अधिकार दिले आहेत. पंचायती राज व्यवस्थेचे बळकटीकरण करावयाचे आहे असे म्हटले जाते असे सभापती, पंचायत समिती, मालेगाव यांनी समितीला माहिती देण्यात आली.

समिती प्रमुखांच्या नावे लेखी निवेदन द्यावे, जेणेकरुन या विषयाबाबत पाठपुरावा करता येईल.  धोरणात्मक निर्णयाबाबत समिती शासनाला शिफारस करेल असे समितीने निदेशित केले.

राज्य शासनाचे ग्रामीण भागात जे दवाखाने आहेत तेथे डॉक्टर राहत नाहीत, त्यांचे सहकार्य मिळत नाही. दुष्काळी दौ-यात सुध्दा ते हजर राहिलेले नाहीत. जिल्हा परिषदेचे पशुवैद्यकीय दवाखाने आहेत त्यांच्याकडून सेवा दिली जात नाही असे सभापती, पंचायत समिती, मालेगाव यांनी समितीला दिली.

पंचायत समितीच्या सभापतींना कागदपत्रे दाखविली पाहिजेत, तशी तरतूद आहे. प्रस्तावाच्या नस्तीवर सभापतींची सही बंधनकारक आहे. आपण जी बाब निदर्शनास आणली आहे त्याबाबत सूचना करता येईल. शासनाला धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी सूचना करण्यात येईल असे समितीने निदेशित केले.

लघुपाटबंधारे विभागाकडून जलयुक्त शिवार योजनेची कामे केली जातात. नॉर्म्समध्ये स्पष्टपणे उल्लेख केलेला आहे. गावात जाऊन सरपंचांना विश्वासात घ्या, साईट निश्चित करा. परंतु अधिकारी जलयुक्त शिवार योजनेची कामे परस्पर त्यांच्या पध्दतीने निश्चित करतात. सभापती किंवा सरपंच यांना विश्वासात घेतले जात नाही असे सभापती, पंचायत समिती, मालेगाव यांनी समितीला अवगत केले.

जलयुक्त शिवार योजना खूप चांगली आहे, त्याबद्दल सरकारचे अभिनंदन करते. २७०२ हेड अंतर्गत डीपीडीसीच्या फंडातील ६० टक्के निधी या कामासाठी वापरला जातो. नाशिक जिल्हयामध्ये १६०० पेक्षा अधिक ग्रामपंचायती आहेत. २२९ गावे जलयुक्त शिवार योजनेसाठी निवडली गेली आहेत. डीपीडीसीचा ६० टक्के निधी त्या गावांमध्ये खर्च होतो. उर्वरित गावांसाठी ४० टक्के निधी उपलब्ध होतो. दुष्काळी परिस्थितीला सामोरे जात असताना आमची खूप अडचण होते. जलयुक्त शिवार योजनेच्या कामासाठी वेगळा फंड निर्माण करावा व त्यासाठी आर्थिक तरतूद करण्यात यावी. २७०२ हेड अंतर्गत उपलब्ध होणारा फंड १०० टक्के तसाच ठेवावा असे अध्यक्ष, जिल्हा परिषद यांनी समितीला अवगत केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्दयांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

समितीने नाशिक जिल्हा परिषदेला भेट दिली असता समितीने नाशिक जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या खालील बाबी निदर्शनास आल्या.

१) राज्य शासनाकडील कृषी विभागाच्या जास्तीत जास्त योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात याव्यात.

२) दलित वस्ती सुधार योजनेतंर्गत कचराकुंड्या, घंटा गाड्या घेण्यासाठी संबंधीत शासन निर्णयात सुधारणा करण्यात यावी.

३) १४ व्या वित्त आयोगाच्या निधीतील वाटा पंचायत समित्यांना देखील देण्यात यावा.

४) नाशिक पंचायत समितीच्या इमारतीचे अपुर्ण असलेले बांधकाम लवकरात लवकर पुर्ण करावे व पंचायत समिती, चांदवड येथे मंजूर इमारतीचे काम लवकरात लवकर सुरु करावे.

५) नाशिक जिल्ह्यातील प्राथमिक आरोग्य केद्रांतील वैद्यकीय अधिकारी मुख्यालयी राहत नसल्यामुळे आरोग्य सेवेवर विपरित परिणाम होत असून चांदवड तालुक्यातील वैद्यकीय अधिकारी, श्रीमती भोई यांच्या अनुपस्थितीमुळे प्रसुती दरम्यान बालक दगावल्याच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर प्रस्तुत प्रकरणी चौकशी करुन कार्यवाही करण्यात यावी.

६) जिल्ह्यातील बहुतांश पंचायत सभापतींची वाहनांची मागणी असून पंचायत समितीत सभातींना नियमाप्रमाणे अधिकाराचा वापर करता येत नाही. त्यास शासनाचा पत्र व्यवहार देखील दाखविला जात नाही, तसेच मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केला जात नाही.

मासिक सभेचा कार्यक्रम सात दिवस अगोदर न देता ऐनवेळी दिला जातो. जलयुक्त शिवार या कामांमध्ये सरपंच-सभापती या लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले जात नाही. या व इतर तक्रारी संदर्भात ग्रामविकास विभागाने सूचना द्याव्यात, तसेच केरळ राज्यात ज्याप्रमाणे पंचायती राज व्यवस्था सक्षम करण्यात आली आहे, त्याच धर्तीवर राज्यातही पंचायत राज व्यवस्था सक्षम करणेकरिता कार्यवाही करणेत यावी.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हापरिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ चे कलम १२३ नुसार खालील योजना अभिकरण तत्वावर जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत.

(अ) सद्यःस्थितीत जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत राबविण्यात येत असलेल्या शासकीय निधीतील योजना खालील प्रमाणे :-

१) राज्य फलोत्पादन पुरस्कृत पीक संरक्षण योजना.

२) आदिवासी शेतक-यांना दारिद्रय रेषेच्या वर आणणेसाठी सुधारित आदिवासी उपाययोजना क्षेत्रांतर्गत (टिएसपी) व क्षेत्राबाहेर (ओटीएसपी)

३) मागासवर्गीय व नवबौध्दांना दारिद्रय रेषेच्यावर आणणेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजना.

४) निविष्ठा गुणवत्ता नियंत्रण कार्यक्रम परवाना कामकाज बियाणे खते.

५) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर राष्ट्रीय बायोगॅस व सौर विकास कार्यक्रम.

(ब) खालील प्रमाणे योजना शासकीय निधीतून यापूर्वी जिल्हा परिषदेमार्फत वेळोवेळी राबविण्यात आलेल्या आहेत.

१) राज्य पुरस्कृत फलोत्पादन पीक संरक्षण योजना.

२) आदिवासी शेतक-यांना दारिद्रय रेषेच्यावर आणणेसाठी विशेष सहाय्यक योजना (टिएसपी).

३) आदिवासी क्षेत्राबाहेरील आदिवासी शेतक-यांना दारिद्रय रेषेच्यावर आणण्यासाठी विशेष सहाय्यक योजना (ओटीएसपी)

४) मागासवर्गीय व नवबौध्दांना दारिद्रय रेषेच्यावर आणणेसाठी विशेष सहाय्यक योजना (एससीपी)

५) एकात्मिक तृणधान्य विकास योजना राज्य

६) तृणधान्य विकास योजना केंद्र

७) एकात्मिक मका उत्पादन कार्यक्रम राज्य

८) केंद्र पुरस्कृत गतिमान मका विकास कार्यक्रम केंद्र

९) एकात्मिक तेलबिया उत्पादन कार्यक्रम राज्य

१०) राष्ट्रीय तेलबिया विकास कार्यक्रम केंद्र.

११) ऊस विकास कार्यक्रम केंद्र

१२) ऊस विकास कार्यक्रम राज्य

१३) राज्य पुरस्कृत तुषार व ठिंबक सिंचन योजना

१४) राष्ट्रीय कडधान्य विकास कार्यक्रम

१५) सधन कापूस विकास कार्यक्रम

१६) ऊसावर आधारित पिक पध्दतीच्या शाश्वत विकासाच्या योजना.

१७) कृषि यांत्रिकीकरणाचा विस्तार टॅक्टरचे वितरण व अवजाराचे वाटप

१८) मिनीकीटचे वाटप

१९) निविष्ठा गुणवत्ता नियंत्रण कार्यक्रम

२०) अपारंपारिक ऊर्जा स्त्रोताचा वापर राष्ट्रीय बायोगॅस व सौर ऊर्जा विकास कार्यक्रम.

२१) कृषि मेळावे व प्रात्यक्षिके

२२) पीक कापणी प्रयोग

२३) पीक स्पर्धा (खरीप उन्हाळी, रब्बी)

२४) शेतीनिष्ठ जिजामाता कृषी भूषण पुरस्कारासाठी शेतकरी निवड

(क) खालील योजना जिल्हा परिषदेकडे अभिकरण तत्वावर हस्तांतरित करण्यात याव्यात.

उपरोक्त ब मधील २४ योजनांपैकी जिल्हा परिषदेकडे 'अ' प्रमाणे पाच योजना आहेत. 'ब' मधील उर्वरित १९ योजना अधिकारी व कर्मचा-यांसह जिल्हा परिषदेकडे वर्ग व्हाव्यात.

२) सन्मानीय पंचायत राज समितीस मा.सभापती, समाज कल्याण समिती, जिल्हा परिषद, नाशिक यांनी त्यांचे दिनांक ५/५/२०१६ रोजीच्या पत्रान्वये अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे (पुर्वीचे नांव दलित वस्ती सुधार योजना) योजनेंतर्गत दलित वस्ती मध्ये प्री-फॅब्रिकेटेड कचराकुंडी बांधणे तसेच घंटागाडी (कचरागाडी) योजना राबविणेस परवानगी मिळणेबाबत महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे शिफारस होणेसाठी विनंती केलेली आहे. त्यानुसार या कार्यालयाचे पत्र क्र.१७७९/ २०१६ दिनांक १३/१२/२०१६ अन्वये सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांना शिफारस होणेसाठी मुळपत्र व प्रस्ताव सादर केलेला आहे.

३) केंद्र शासनाचे क्र.एफ.१३ (१) एफएफसी/एफसीडी/२०१५/१६/दि.३०/०६/२०१५ चे पत्र व महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक चौदाआ २०१५/प्र.क्र.२६/वित्त-४ मुंबई दि.१६ जुलै, २०१५ अन्वये १४ वा केंद्रीय वित्त आयोगांतर्गत राज्यातील ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थाना जनरल बेसिक ग्रँटच्या वितरणाबाबतचे मार्गदर्शक सूचना प्राप्त असून १४ वा केंद्रीय वित्त आयोग अंतर्गत प्राप्त होणारा निधी हा केवळ ग्राम पंचायत स्तरासाठीच उपलब्ध करावयाचा आहे.

४) नाशिक पंचायत समितीच्या इमारतीचे काम दि.२१/०६/२०१६ रोजी पुर्ण करणेत आले आहे. सद्यःस्थितीत पंचायत समिती अंतर्गत कार्यालये नवीन इमारतीमध्ये कार्यरत आहे.

५) प्रा.आ.केंद्र वडाळीभोई येथील वैद्यकीय अधिकारी डॉ.सौ.सुलोचना भोई यांचे अनुपस्थितीमध्ये बालक प्रसुती दरम्यान दगावलेल्याच्या घटनेच्या संदर्भात तालुका आरोग्य अधिकारी, पंचायत समिती, चांदवड यांचेमार्फत चौकशी करण्यात आली. डॉ.सौ. सुलोचना भोई, वैद्यकीय अधिकारी प्रा.आ. केंद्र वडाळीभोई यांची बदली आदिवासी भागात जिल्हाधिकारी, नाशिक यांनी आदेश क्रमांक मवैअ/सर्वसाधारण बदल्या/जिनिसना/आरोग्य विभाग/ जि.प.ना./आस्था-१/५७१/२०१७, दिनांक १५/०५/२०१७ अन्वये प्रा.आ.केंद्र ननाशी ता.दिंडोरी येथे करण्यात आलेली आहे. तरी सदरचा खुलासा मान्य होऊन परिच्छेद कायम स्वरूपी वगळण्यास विनंती आहे.

६) महाराष्ट्र शासन ग्रामविकास विभाग, शासन निर्णय क्र.जेईपी १०/प्र.क्र.१९/२०००/०५ मुंबई दिनांक २० डिसेंबर २००० अन्वये ज्या पंचायत समित्यांकडे एक वाहन उपलब्ध आहे तेथे पंचायत समिती सभापती व उपसभापती यांना अनुक्रमे १० व ५ दिवस असे प्रत्येक महिन्याच्या १५ दिवसापर्यंत वाहन उपलब्ध करून देण्यात येते. तसेच जिल्हा परिषद, नाशिक अंतर्गत एकूण १५ पंचायत समिती असून त्यापैकी पाच पंचायत समिती सभापतींना स्वतंत्र वाहन पुरविणेत आलेले आहे. तसेच महाराष्ट्र शासन ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मुंबई पत्र क्र. झेडपीए २०१०/प्र.क्र.१५८/पं.रा-१/बांधकाम भवन, दिनांक १५ जून २०१५ अन्वये जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत पंचायत समित्यांना जिल्हा परिषदेच्या उपलब्ध घसारा निधीतून टप्प्याटप्प्याने वाहने खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली असून सद्यःस्थितीत सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक करीता सन २०१७-१८ या वर्षात घसारा निधी रक्कम रू. २४ लक्ष इतकी तरतुद करणेत आली आहे. सदर तरतुदी मधून पंचायत समिती नाशिक व कळवण या दोन पंचायत समिती सभापतींसाठी वाहन खरेदीची कार्यवाही सुरू आहे. तद्नंतर दरवर्षी उपलब्ध घसारा निधीतून पंचायत समिती सभापतींकरिता टप्प्याटप्प्याने वाहन खरेदींची कार्यवाही करणेत येईल. महाराष्ट्र जिल्हा परिषद पंचायत समिती अधिनियम १९६१ मधील तरतुदीनुसार नमुद केलेप्रमाणे मासिक सभेचा कार्यक्रम (अजेंडा) सर्व सन्माननीय सदस्यांना सात दिवस अगोदर पाठविणेची कार्यवाही केली जाते, तसेच सदर सभेच्या कार्यक्रम पत्रिकेत शासनाकडून प्राप्त झालेले महत्वाचे परिपत्रक तसेच शासन निर्णय याबाबत स्वतंत्र विषय ठेवण्यात येतो व सदर शासन परिपत्रकांचे विभागवार वाचन करणेत येते.

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत कामांचे बाबतीत जलसंधारण विभागाच्या दिनांक ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करणेत येते. तसेच शासनाकडून वेळोवेळी शासन निर्णय व परिपत्रकानुसार ज्या ज्या शासकीय यंत्रणांना लोकप्रतिनिधींना बैठकीस बोलाविण्याची आवश्यकता असते त्यावेळेस त्यांना बोलविणेत येवून त्यांचे मत विचारात घेतले जाते. तसेच सदरील योजनेचे आर्थिक वर्षाचे कृती आराखडा तयार करून त्यास ग्रामसभेत तालुका स्तरीय समिती

जलयुक्त शिवार अभियान जिल्हा स्तरीय समिती जलयुक्त शिवार अभियान यांची मान्यता घेतली जाते व सदरील योजनेची कामे पूर्ण झाल्यानंतर ग्रामसभेची मान्यता घेऊनच कामाची अंतिम देयके पारीत केले जातात.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**१) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** ७३ व्या घटना दुरुस्तीनुसार २९ कार्ये (विषय) पंचायती राज संस्थांकडे हस्तांतरित करावयाचे आहेत. सद्यःस्थितीत २९विषयांपैकी १४ विषय जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित झाले आहेत. २९ विषयांपैकी कृषि विभागाकडील खालील विषय जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करावयाचे होते :-

कृषि व पदुम विभाग (खुद्द) कडील पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कूटपालन, कृषि विस्तारासह कृषि, जमिन सुधारणा, जमिन सुधारणांचे कार्यान्वय, जमिनीची एकत्रिकरण व मृदसंधारण, मत्स्यव्यवसाय.

त्यापैकी कृषि व पदुम विभाग (खुद्द) कडील पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कुक्कूटपालन हे विषय जि.प.कडे हस्तांतरित करण्यात आले आहेत.

कृषि विस्तारासह कृषि, जमिन सुधारणा, जमिन सुधारणांचे कार्यान्वय, जमिनीची एकत्रीकरण व मृदसंधारण, मत्स्यव्यवसाय हे विषय जि.प.हस्तांतरीत करण्यासंदर्भात कार्यवाही प्रलंबित आहे. याबाबत कृषि विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.

**कृषि विभागाचे अभिप्राय :-** भारतीय संविधानाच्या ७३ व्या घटना दुरुस्तीनंतर पंचायत राज संरचना सक्षम व लोकाभिमुख करण्याकरिता राज्य शासनाच्या अधिनस्त असलेल्या विविध योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविण्याचा निर्णय ग्रामविकास विभागाच्या दि.०१.०२.२००० च्या शासन निर्णयान्वये पुढील आदेश होईपर्यंत जैसे थे स्थिती ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे. सदर दि.०१.०३.२००१ च्या शासन निर्णयाविरुध्द श्री.बाळासाहेब हराळ यांनी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे रिट याचिका क्र.५५३५/२००३ दाखल केली होती. मा. उच्च न्यायालयाने प्रस्तुत प्रकरणी दि.३०.०९.२०१६ रोजीच्या आदेशान्वये शासनाच्या बाजूने न्यायनिर्णय देऊन याचिका निकाली काढली आहे. सद्यःस्थितीत राज्य शासनाच्या योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

**२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग :-** सदर बाब शासन विचाराधीन आहे.

**३) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीवरुन केंद्र शासनाकडून स्थानिक स्वराज्य संस्था करिता राज्यांना सहाय्यक अनुदान प्राप्त होते. प्राप्त अनुदानाबाबत केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशींच्या आधारे केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या मार्गदर्शक सूचनांनुसार निधी वितरणाचे निकष व वितरीत निधी खर्च करण्यासंदर्भातील धोरणात्मक निर्णय शासनाकडून घेण्यात येतो.

या संदर्भात चौदाव्या वित्त आयोगाअंतर्गत केंद्र शासनाकडून ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांकरिता राज्याला अनुदान उपलब्ध करुन देतांना त्याच्या विनियोगाबाबत केंद्र शासनाकडून देण्यात येणा-या मार्गदर्शक सूचनानुसार संपूर्ण निधी केवळ ग्राम पंचायत स्तरावर आवश्यक असून केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन चौदाव्या वित्त आयोगाअंतर्गत स्तरावर वितरीत करणेबाबत धोरणात्मक निर्णय शासनाच्या ग्रामविकास विभागाने दि.१६/०७/२०१५, दि.२१/१२/२०१५ व दि.२८/०४/२०१६ च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला आहे.

१४ व्या वित्त आयोगाचा निधी जिल्हा परिषद व पंचायत समितीना केंद्र शासनाच्या सुचनाप्रमाणे देता येणार नाही. जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्यांना निधी देण्याबाबत शासनाचे कोणतेही प्रयोजन नाही व देता येणार नाही.

**४) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** (बांधकाम-३) जिल्हा परिषद अभिप्रायाशी सहमत.

**५) सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, नाशिक यांच्या अभिप्रायाशी सहमती दर्शविण्यात आली आहे.

**६) ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** प्रस्तुत बाब जिल्हा परिषद नाशिक यांचेशी संबंधित असून राज्यातील सर्व पंचायत स्तरावरील वाहन खरेदी करण्याच्या संदर्भात या विभागाच्या दिनांक १५.६.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील ज्या पंचायत समित्यांकडे सध्या एकच वाहन उपलब्ध आहे त्या पंचायत समित्यांना जिल्हा परिषदेच्या उपलब्ध घसारा निधीतून एक अतिरिक्त वाहन खरेदी करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

पंचायत समितीकडे असणा-या दोन वाहनांपैकी एक वाहन संपूर्णतः सभापती यांच्यासाठी राखीव राहील. सभापती यांच्यासाठी राखीव असणारे वाहन उपसभापतींना महिन्यातून ७ दिवस कार्यालयीन कामासाठी सभापतींच्या पूर्वपरवानगीने उपलब्ध करून देण्यात येईल.

तसेच त्यापैकी दुसरे वाहन हे संपूर्णतः गट विकास अधिकारी यांच्यासाठी राखीव राहील, अश्या गट विकास अधिकारी यांच्यासाठी राखीव असणारे वाहन महिन्यातून ७ दिवस सहाय्यक गट विकास अधिकारी यांना कार्यालयीन कामासाठी गट विकास अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने उपलब्ध करून देण्यात येईल. अशा सूचनांचा अंतर्भाव या शासन निर्णयात करण्यात आलेला आहे.

**मृद व जलसंधारण विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद नाशिक यांनी दिलेल्या स्पष्टीकरणाशी शासन सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने नाशिक जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर माहिती घेण्यासाठी समितीने दिनांक १४ व १५ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, समितीने नाशिक जिल्हा परिषदेचे पदाधिकारी तसेच पंचायती राज समितीसमोर केलेल्या चर्चेदरम्यान आलेल्या मागण्यांसदर्भात शासनाची भूमिका काय आहे, शासनाकडील कृषी विभागाच्या जास्तीत जास्त योजना जिल्हा परिषदांकडे हस्तांतरित करण्यात याव्यात, आपण याबाबतची सद्यःस्थिती समितीला अवगत करावी असे समितीने निदेशित केले.

विभागीय सचिवांच्या म्हणण्यानुसार भारतीय संविधानाच्या ७३ व्या घटना दुरुस्ती नंतर पंचायत राज संरचना/लोकाभिमुख करण्याकरिता राज्य शासनाच्या अधिनस्त असलेल्या विविध योजना जिल्हा परिषदांमार्फत राबविण्याचा निर्णय ग्राम विकास विभागाच्या दिनांक १.२.२००० च्या शासन निर्णयान्वये घेण्यात आला होता, त्या अनुषंगाने कृषी विभागाच्या दिनांक १.२.२००१ च्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या कृषी विभागाच्या ३७ योजना जिल्हा परिषदेकडे हस्तांतरित करण्याबाबत निर्णय घेण्यात आला. मात्र अंमलबजावणी संदर्भात प्रशासकीय अडचणी विचारात घेऊन सदर आदेशास कृषी विभागाच्या दिनांक १.३.२००१ रोजीच्या आदेशान्वये पुढील आदेश होईपर्यंत जैसे थे स्थिती ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले आहे.

आजच्या तारखेला अशी परिस्थिती आहे की, या आदेशाला उच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले होते. दिनांक १.३.२००१ च्या शासन निर्णयाविरुध्द श्री. बाळासाहेब हराळ यांनी माननीय उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल केली होती, त्याबाबत न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, राज्य शासनाने जो निर्णय घेतला आहे, त्याबाबत न्यायालय राज्य शासनाला कुठलाही आदेश देणार नाही. कारण कोणती योजना हस्तांतरित करायची व कोणती योजना हस्तांतरित करायची नाही हे राज्य शासनाच्या अखत्यारित आहे. कायद्यातील तरतुदी प्रमाणे हस्तांतरण करणे बंधनकारक नाही. आता पर्यंत राज्य शासनाकडे असा कोणताही प्रस्ताव विचाराधीन नाही अशी अपर मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी समितीला माहिती विशद केली.

कायद्याप्रमाणे कोणतीही योजना हस्तांतरण करणे बंधनकारक नाही, आपण या निर्णयावर ठाम आहेत काय असे समितीने विचारले असता हा न्यायालयाचा निर्णय आहे असे अपर मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी समितीला सांगितले. समितीने पुढे विचारणा केली की, श्री. हराळ यांच्या प्रकरणामधील न्यायालयाचा निर्णय माझ्याकडेही आहे. आपण या निर्णयावर ठाम आहात ना, मग घटना दुरुस्ती मोठी की हायकोर्ट मोठे असा प्रश्न उपस्थित केला असता, त्यासंदर्भात अपर मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी, महोदय, घटना दुरुस्ती सुविधा निर्माण करते, परंतु ती केव्हा करायची, किती प्रमाणात करायची हे राज्य शासनाने ठरवायचे आहे, सुविधा आहे परंतु त्यावेळेस राज्य शासनाने असे ठरविले की, योजना हस्तांतरित करायची परिस्थिती नाही, याबाबत पुनर्विचाराचा कोणताही प्रस्ताव विभागाकडे नाही अशी समितीला माहिती विशद केली.

यासंदर्भात समितीने पुढे अशी विचारणा केली की, याबाबत वेळोवेळी शासन निर्णय निर्गमित करण्यात आले आहेत. ७३ व्या घटना दुरुस्ती नुसार जिल्हा परिषदांकडे विषय व योजना यांचे हस्तांतरण, आर्थिक व्यवस्थापन, लेखांकन कार्यपध्दती याबाबत दिनांक २८ सप्टेंबर, २००० चा शासन निर्णय आहे. दिनांक १ फेब्रुवारी, २००१ पासून कृषी विभागाच्या राज्य शासन राबवित असलेल्या काही योजना जिल्हा परिषदेमध्ये कलम १२३ खाली राबविणे याबाबतचा एक शासन निर्णय आहे. २४३ (एफ)

व २४३ (जी) पॉवर्स ऑथॉरिटीज अँड रिस्पॉन्सिबिलिटीज ऑफ पंचायत याबाबत भारताच्या राज्य घटनेमध्ये स्पष्ट नमूद केलेले आहे. त्यानंतरही राज्य सरकार जर आपल्या योजना हस्तांरित करण्यास तयारच नसेल. कारण एकीकडे सत्तेचे विकेंद्रीकरण करण्याकरिता आपण ७३ वी घटना दुरुस्ती आणली, तर दुसरीकडे शासन आपला अधिकार सोडायला तयार नाही असे का, त्यामध्ये कोणत्या अडचणी आहेत अशी विचारणा समितीने केली असता, त्याबाबत अपर मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी, सध्या याच्यावर पुनर्विचार झालेला नसल्यामुळे आजच्या परिस्थितीत शासन स्तरावर काय विचारधारा आहे हे मी सांगू शकत नाही अशी त्यांनी समितीला माहिती विशद केली.

शासन घटनेचा अवमान करु शकते काय, ११ शेड्यूल मध्ये आर्टिकल २४३ (जी) ॲग्रिकल्चर इन्क्लुडिंग ॲग्रिकल्चरल एक्सटेशन याबाबत नमूद केले असतांना तुम्ही हे का करत नाही असा उपप्रश्न समितीने विचारला असता त्यासंदर्भात अपर मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी, महोदय, माझे एवढेच निवेदन आहे की, हा निर्णय शासन स्तरावरावरील आहे.

कारण एक वर्षापूर्वीची परिस्थिती पाहिली तर योजना दिल्यानंतर प्रशासकीय नियंत्रणाखाली चालणार का याबाबत स्पष्टता नाही. एखादी योजना ए.डी.ओं.कडे चालविण्यासाठी दिल्यानंतर विधानसभा/विधान परिषद सभागृहात प्रश्न विचारल्यानंतर ग्राम विकास विभागाची अशी भूमिका असते की, कृषी विभागाने यावर उत्तर द्यावे. उदाहरणार्थ जिल्हा परिषदेने सेंद्रिय शेतीची योजना स्वनिधीतून घेतली. सदरहू योजना राबवितांना काही प्रशासकीय मुद्दे उपस्थित होतात. मात्र ग्राम विकास विभागाची याबाबत अशी भूमिका आहे की, सेंद्रिय शेती हा शब्द लिहिल्यामुळे ती कशा पध्दतीने राबविण्यात आली, त्यामध्ये प्रशासकीय चूक काय झाली याचे उत्तर कृषी विभागाने द्यावे. माहे जुलैच्या अधिवेशनातील या प्रश्नावर आम्हाला खूप दिवस उत्तर देता आले नाही. शेवटी आम्हाला ते प्रकरण सामान्य प्रशासन विभागाकडे पाठवावे लागते. एखादी योजना अस्तित्वात आल्यास, त्याचा ठराव कसा झाला, खरेदी कशी झाली याची काहीही कल्पना नसतांना त्याचे उत्तर आम्ही द्यायचे का असे विचारले होते. त्याबाबत सामान्य प्रशासन विभागाने शेवटी असा निर्णय दिला की, ग्राम विकास विभागाची भूमिका चुकीची आहे. यासंदर्भातील कागदपत्रे मी आपल्या माहितीसाठी देण्यास तयार आहे अशी माहिती त्यांनी समितीला विशद केली.

अपर मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी पाईप लाईन, खोरे टिकाव, पाटी इत्यादी प्रकरणातही असेच झालेले आहे. याबाबत ग्राम विकास विभागाचे असे म्हणणे आहे की, डीपीसी, इनोव्हेटिव्ह स्कीम, सेस फंड इत्यादी बाबत निविदा उशिरा का काढली गेली असे प्रश्न असतील तर सचिव, कृषी यांनी उत्तर दिले पाहिजे अशी समितीला माहिती देण्यात आली.

आमचा संबंध सत्तेच्या विकेंद्रीकरणाच्या घटनात्मक दुरुस्तीशी आहे. कृषीचा विषय आला की, सर्व तुमच्याकडे सुपूर्द केले जाते असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता, त्याबाबतच्या रेकॉर्डची झेरॉक्सही आणलेली आहे. जनतेला जवळपासच्या यंत्रणेमार्फत उत्तम सेवा मिळू शकते. सन २००१ मध्ये जेव्हा याबाबतची विचारधारा सुरु होती, त्यावेळेस मी कृषी आयुक्तालयामध्ये होतो व त्यावेळेसही माझे मत हेच होते की, कृषी विभागाकडे जास्तीत जास्त योजना दिल्या पाहिजेत असे अपर मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी समितीला माहिती उपलब्ध करुन दिली.

महोदय, तिसरा अनुभव मला यवतमाळ मध्ये पेस्टिसाईड डेथे बाबत आला. ते सर्व लायसन्सिंग जिल्हा परिषदेकडे होते. या पूर्ण कालावधीत ही आमची योजना आहे व आम्ही अशा पध्दतीने सांभाळण्यास तयार आहोत असे ग्राम विकास किंवा जिल्हा परिषदेने जबाबदारी घेतली नसल्यामुळे आम्हाला लायसन्सिंगची पॉवर काढावी लागली. पॉवरच्या अंमलबजावणी मध्ये चूक होत असेल तर आपण सुधारणा करु शकतो, मात्र शेवट पर्यंत जिल्हा परिषदेकडून त्यांच्या यंत्रणेमध्ये कोण चुकले याचा रिपोर्ट आला नाही. जनतेच्या सार्वजनिक दबावामुळे आम्हाला असा निर्णय घ्यावा लागली की, फक्त ए.डी.ओ. एकटेच जबाबदार आहेत व पूर्ण राज्यामध्ये आम्हाला एक ए.डी.ओ. निलंबित करावे लागले. यवतमाळ मध्ये लायसन्सिंगची पॉवर आमच्याकडे असतांना माझ्या एडीओ आणि त्याच्या अधिनस्त असलेली यंत्रणा व कृषी समिती कशा पध्दतीने ही पॉवर राबविते व ती इफेक्टिव्ह होते की नाही या करिता कोणालाही वेळ नाही किंवा त्यावर जनतेसमोर जाण्याची तयारी नाही. आमच्या पॉवर नसतांना आम्हाला त्यांच्या समोर जाऊन एक निर्णय मागे घ्यावा लागला आहे, याबाबतची पार्श्वभूमी मी आपल्याकडे विशद केली आहे.

अपर मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी समितीला उपलब्ध करुन दिलेली माहितीची जबाबदारी त्यांनी घ्यायची व अधिकार दुसरीकडे आहेत, ही गंभीर स्वरुपाची बाब असल्याने याबाबतचा खुलासा करावा असे समितीने मुद्दा उपस्थित केला असता, त्याबाबत सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला खालील प्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली.

जिल्हा परिषदेला २९ विषय द्यायला हवे होते, मात्र केवळ १४ विषय दिलेले असून उर्वरित १५ विषय त्यांच्याकडे दिलेले नाहीत. अकाऊंटेबिलिटी व ॲथॉरिटी या दोन्ही बाबी सोबत असणे आवश्यक आहे. डीपीसी मधील योजना विभागाकडून तयार करुन निधी किती वाटप करावयाचा हे डीपीसी ठरविते. या नियोजनामध्ये जिल्हा परिषदेचा काहीही रोल नाही.

सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला अशी माहिती विशद केली की, जिल्हा परिषदेला प्लॅनिंगचा अधिकार नाही, केवळ योजना राबविण्याचा अधिकार आहे. याकरिता शासनाने एक डिसिजन मेकिंग ॲथॉरिटी तयार केली पाहिजे. कृषी विभागात जो निधी खर्च होणार आहे, त्याच्या नियोजनाचे अधिकार देखील जिल्हा परिषदेला असले पाहिजेत, अन्यथा त्याला काही अर्थ राहत नाही. कोणत्या योजनेला किती निधी द्यावा याबाबतचे अधिकार जिल्हा परिषदेच्या सभापतींना अधिकार असले पाहिजेत. विभागाने सर्व योजना तयार करुन त्यांना तांत्रिक मान्यता संबंधित विभागाने दिली पाहिजे, उर्वरित अधिकार जिल्हा परिषदेला असले पाहिजेत.

महोदय, एखादी नस्ती त्यांच्याकडे चुकून पाठविली गेली असेल तर मी माफी मागतो, यामध्ये कोणताही हेतू नाही. अनेक बाबींसंबंधी उत्तर कोण देणार आहे याबाबत बराच संभ्रम आहे. प्रोसेस मध्ये चूक असल्यास ती बाब जिल्हा परिषदेची आहे, त्याबाबत मी दिलगिरी व्यक्त करतो. २९ विषयांचे नियोजन व योजना राबविण्याचा अधिकार स्थानिक प्राधिकारी संस्थांना दिले पाहिजेत. राज्यात डीपीसीच्या माध्यमांतून १३ हजार कोटी रुपये मिळतात, त्यांपैकी ३३४ कोटी रुपये आहेत. प्राप्त होणा-या निधीची बेरीज करावी, तेवढा निधी जिल्हा परिषदेला देण्याबाबत योजनांचे नियोजन करण्यास सांगावे असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला माहिती उपलब्ध करुन दिली.

जिल्हा परिषद अध्यक्षांना विचारलेच जात नाही. गेल्या ४-५ महिन्यापूर्वी महामहिम राज्यपाल यांची परिषद घेण्यात आली होती, त्यात त्यांनी सांगितले की, २९ विषय जिल्हा परिषदांना दिले पाहिजेत. यानंतर त्यांनी आमच्याकडे याबाबत विचारणा केली असता आम्ही हा प्रस्ताव सादर केलेला नाही, ही आमची चूक झाली आहे. पुनर्विचाराकरिता आम्ही पुन्हा प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे अशी माहिती सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला दिली.

१४ व्या वित्त आयोगात १०० टक्के निधी ग्राम पंचायतीला दिला, त्यावेळी अटी व शर्ती घातल्या होत्या. आपल्या गावात कोणती कामे आवश्यक आहेत ते त्यांना ठरवू देणे, कृती आराखडा बदलायचा असेल तर ते काम सीईओ यांच्याकडे जाते. नविन विहिरी मंजूर करण्याचे काम देखील सीईओ यांच्याकडे पाठविले जाते, मात्र त्यांना अधिकार काहीच दिले नाहीत असा उपप्रश्न समितीने विचारला असता ६-७ महिन्यांपूर्वीच्या जीआर मधून ही सर्व कामे काढून टाकली आहेत असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला माहिती उपलब्ध करुन दिली.

वरील प्रकरणात ज्या अनियमितता दिसून येत आहेत, त्याकरिता त्या विभागात डिझाईन व एक्झिक्युशनचे अधिकार असावेत व त्यात काही सुधारणा झाली पाहिजे असे समितीने विचारणा केली असता आम्ही याबाबतचा प्रस्ताव तयार करुन समितीला सादर करतो असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला सांगितले.

सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला माहिती विशद करुन दिली की, १५ व्या वित्त आयोगाची चर्चा सुरु झालेली आहे. यामध्ये ग्राम विकास विभागाच्या मंत्री महोदयांनी अशी भुमिका घेतली आहे की, याबाबत आपण केंद्र शासनाला जाऊन भेटावे. ३ टक्के पंचायत समिती व २ टक्के जिल्हा परिषदेला थेट निधी द्यावा. पंचायत समितीला काही अधिकार नाहीत. १५ व्या वित्त आयोगाची अंमलबजावणी करतांना राज्य शासन प्रयत्न करणारच आहे. ग्राम पंचायतीला जसा निधी मिळाला तशाच प्रकारे इतर दोन स्तराला देखील निधी मिळाला पाहिजे.

सध्या पंचायत समितीच्या सदस्यांचा हिरमोड झाला आहे. जिल्हा परिषद सदस्य देखील त्या दृष्टीने विचार करु लागले आहेत. येत्या अधिवेशनामध्ये समितीचा अहवाल सादर केला जाईल त्यावेळी या विषयाच्या संबंधी शिफारस करावी असे निदेश समितीने सचिव, ग्राम विकास विभाग यांना दिले.

ग्राम पंचायत व पंचायत समिती हे द्विस्तर आहेत. यासंबंधी सध्या काही माहिती उपलब्ध आहे अशी समितीने विचारणा केली असता त्याबाबत संविधानामध्ये लिहिले आहे की, हे त्रिस्तरीय राहणार आहे. यामध्ये कोणी काहीच करु शकत नाही. काहींनी सांगितले की, चेन्नई मध्ये अशी पध्दती नाही. मात्र संविधानानुसार त्रिस्तरीय पध्दती सगळीकडे असली पाहिजे. ज्या

जिल्हयामध्ये २० लाखापेक्षा कमी लोकसंख्या असेल तेथे तीन ऐवजी दोन स्तरीय स्तर निर्माण करता येतो. निती आयोगानुसार जिल्हा परिषदेला अधिकार देण्याबाबत महाराष्ट्र राज्य संपूर्ण देशामध्ये दुस-या क्रमांकावर आहे. पहिले राज्य केरळ आहे. घटनेमध्ये असे नमूद केले आहे की, २० लाखांपेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या राज्यात पंचायत समितीची आवश्यकता नाही. व्हिलेज लेव्हल, डिस्ट्रीक्ट लेव्हल व इंटरमिजिएट लेव्हल निश्चित करण्यात आलेली आहे अशी माहिती सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला विशद केली.

जिल्हा परिषदेच्या स्वःनिधी बाबत जबाबदारी स्वीकारली पाहिजे. योजनेचे स्वरुप काय असावे याचा निर्णय कोणी घ्यावा या बाबतचे विचार वित्त आयोगापासून सुरु होते. केंद्र शासनाने वित्त आयोगाचा निधी ग्राम पंचायतीला दिला, स्थानिक स्वराज्य संस्थेला दिला. केंद्र शासनाने ठरविलेल्या योजना आम्ही राबवितो. अन्न सुरक्षा अभियानामध्ये कोणते बियाणे घ्यावे, पीक रचना कशी असावी याबाबत कृषी समितीत निर्णय घेण्यात येतो. राज्याने कोणती योजना घ्यावी हे त्यांच्याकडून केवळ सांगितले जाते. केंद्र शासनाकडून योजना तयार होते, त्यावेळी त्याची माहिती आपल्याकडे येते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषी समृध्दी ही राज्य स्तरीय योजना शासनाने आपल्या अंदाजपत्रकातून सुरु केल्यानंतर त्याचे नियोजन झाल्यानंतर त्या योजनेचे प्रारुप सर्व विभागांना पाठविले जाते. विभागाने अंतर्गत सल्ला मसलत करुन आपल्या सूचना द्यावयाच्या असतात. कोणतीही राज्य स्तरीय योजना जिल्हा परिषद किंवा ग्राम विकास विभागामार्फत राबविली जाणार आहे, त्याबाबत त्यांच्याकडून मत घेतल्याशिवाय सुरु केली जात नाही. राज्य शासनाला डीपीसी मध्ये किती निधी द्यावयाचा आहे, त्याबाबत राज्य स्तरीय निर्णय होतो, यामध्ये आम्हाला फारसा वाव नसतो. जिल्हा परिषदेला थेट निधी दिला जात नाही. राज्य वित्त आयोग निर्माण होणार आहे अशी माहिती अपर मुख्य सचिव, कृषी विभाग यांनी सद्यःस्थिती याठिकाणी मी समितीला विशद केली आहे.

मुद्दा क्रमांक २ :

पंचायती राज समितीने अशी शिफारस केली आहे की, दलित वस्ती सुधार योजनेंतर्गत कचराकुंडी घंटयागाडया घेण्यासाठी ग्राम पंचायतीला निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, हे पॉलिसी डिसीजन आहे, यामुळे मा. मंत्री महोदयांशी विचार विनिमय करुन आम्ही आवश्यक त्या सुधारणा करण्यात येतील असे कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (पश्चिम) यांनी समितीला माहिती करून दिली.

मुद्दा क्रमांक ३ : अभिप्राय नाही.

मुद्दा क्रमांक ४ : या विषयातील काम पूर्ण झालेले आहे असे सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी सांगितले.

मुद्दा क्रमांक ५ : प्राथमिक आरोग्य केंद्र वडाळी भोई येथे एका महिलेच्या प्रसुतीच्या वेळी बाळ दगावल्याची घटना घडली होती. डॉक्टर्स मुख्यालयी राहत नसल्यामुळे हा प्रकार झाला असा त्यामध्ये आक्षेप होता. सदर घटनेच्या वेळी डॉक्टर उपस्थित नव्हते. सदरहू महिलेच्या निवेदनानुसार तेथे डॉक्टर उपस्थित होते. या प्राथमिक आरोग्य केंद्रात प्रसुती होऊ शकत नाही असे डॉक्टरांनी त्या महिला रुग्णास चांदवड येथे घेऊन जावे असे सांगितले. त्या बाळाने त्या महिलेच्या पोटात शी केली असा संशय त्यांना आला होता. त्या महिला रुग्णास चांदवडला नेत असतांना बाळ दगावले. परिणामी याप्रकारामुळे डॉ. श्रीमती सुलोचना भोई यांची तेथून बदली करण्यात आली आहे. ज्यावेळी महिला रुग्णाला चांदवड येथे जाण्याचा सल्ला देण्यात आला, त्यावेळी त्या महिलेच्या पोटामध्ये बाळाच्या हालचाली होत होत्या, परंतु चांदवडला जात असतांना त्या बाळाची हालचाल कमी-कमी होत गेली व त्यामध्ये बाळाचा मृत्यू झाला असे सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी समितीला माहिती दिली.

सदरहू विषय अत्यंत गंभीर स्वरुपाचा आहे. त्या महिलेच्या जीवाला धोका होता. प्रसूतीच्या वेळी वारंवार तपासणीसाठी आल्यानंतर प्रिव्हेनटीव्ह दाखविले असेल. या विषयावरुन तेथील अधिका-याची बदली करणे हे योग्य वाटत नाही असे समितीने विचारणा केली असता त्याबाबत सदरहू महिला वाचल्या आहेत असे सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी समितीला माहिती विशद केली.

सदरहू विषय हा खूप संवेदनशील असल्यामुळे याबाबत आपले मत व्यक्त करावे असे समितीने विचारणा केली असता, यामध्ये असलेल्या उपलब्ध कागदपत्रांच्या आधारे जिल्हा परिषद नाशिक यांनी प्राथमिक चौकशी केलेली आहे. शासनाने दिलेले अभिप्राय जिल्हा परिषद, नाशिक यांनी दिलेल्या अभिप्रायावरच अवलंबून असून त्यावेळी डॉ. सुलोचना भोई हया कामावर रुजू

होत्या, त्यांनी सल्ला दिल्यामुळे त्या महिलेला चांदवड येथून नाशिक येथे पाठविण्यात आले अणि प्रवासात अडचणी निर्माण झाल्या असे सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी समितीला माहिती देण्यात आली.

त्या महिलेला अनावश्यकपणे तिथे ठेवणे, तिच्या जीवावर बेतण्यासारखी परिस्थिती निर्माण होणे आणि तिचे बाळ सुध्दा दगावणे पर्यायाने तिला दगावण्यासाठी प्रवृत्त करणे असा प्रकार दिसत आहे अशी विचारणा समितीने केली असता त्याबाबत सदरहू प्रकार घडला त्यावेळेस ती महिला माहेरी आलेली होती. चांदवड तालुक्यातील उसपाड येथे त्यांचे एएनसी चेकअप झाले होते. प्राथमिक चौकशीत असे आढळून आले की, त्या महिला दोन दिवसापूर्वी माहेरी आल्या असतांना त्या प्रसूतीसाठी रुग्णालयात दाखल झाल्या. तीन ते चार तास त्या पीएसी मध्ये असतांना तपासणी केली असता बाळाचे ठोके वाढायला लागले त्यावेळेस कॉम्प्लीकेशन वाटले की, फेट डिसटन्स होऊ शकतो, तर त्यांना १०२ क्रमांकाच्या पीएसीच्या गाडीने चांदवड उपजिल्हा रुग्णालय येथे पाठविण्यात आले असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीला माहिती विशद केली असता त्याबाबत अनावश्यकपणे डॉक्टरांची दिरंगाई झालेली आहे. त्या महिलेचे स्टेटस् बघून तिला त्याच वेळेस जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले असते तर हा प्रसंग उद्‌भवला नसता. सदरहू प्रकरण दडपून ठेवण्यासाठी त्या डॉक्टरची तात्पुरती बदली करण्याचा प्रयत्न केलेला आहे. या सर्व प्रकरणात त्या डॉक्टर जिम्मेदार आहेत. सचिव महोदय, शासन या नात्याने या प्रकरणात काय करता येईल याबाबत आपले मत व्यक्त करावे असे समितीने निदेश दिले असता, या प्रकरणाची पुन्हा एकदा चौकशी करण्यात येईल. जिल्हा परिषद, नाशिक यांनी जो अहवाल दिलेला आहे त्याबद्दल आपण माहिती घेतलेली आहे असे सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी समितीला माहिती अवगत केली.

या प्रकरणात जबाबदारी निश्चित करुन सखोल चौकशी करुन कारवाई करण्यात यावी असे समितीने आपले मत व्यक्त केले असतांना त्याबाबत एक महिन्याच्या आत त्यांनी पुन्हा चौकशी करुन समितीला माहिती देण्यात येईल असे सचिव, ग्राम विकास विभाग यांनी समितीला सांगितले.

यापुढे सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग यांनी, एक महिन्याच्या आत उपसंचालक, नाशिक आणि नाशिकच्या सुपरस्पेशालिस्टच्या डायग्नॉलॉजिस्ट यांची समिती स्थापन करुन समितीला अहवाल सादर करतो असे आश्वासित केले असता या विषयामध्ये जबाबदारी निश्चित करुन समितीला तात्काळ अहवाल सादर करावे असे निदेश समितीने दिले.

मुद्दा क्रमांक ६ : लोकप्रतिनिधींना विश्वासात घेतले जात नाही असा मुद्दा होता. सन २०१६ मध्ये माननीय आमदार यांना तालुका समितीचे अध्यक्ष केले आहे. त्यांच्या अध्यक्षतेखाली आराखडा तयार होतो, याबाबत माहे मे महिन्यात शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे. आता सुधारणा झालेली आहे अशी माहिती सचिव, जलसंधारण विभाग यांनी समितीला माहिती उपलब्ध करुन दिली.

मुद्दा क्रमांक १० : सदरहू मुद्याबाबत मी सांगू इच्छितो की, विहिरी पूर्ण झाल्या आहेत. ६९८ विहिरींपैकी ५९७ विहिरी पूर्ण झाल्या आहेत. नरेगामध्ये हे काम वर्ग केले होते अशी माहिती सचिव, जलसंधारण विभाग यांनी समितीला माहिती उपलब्ध करुन दिली.

## अभिप्राय व शिफारशी

समितीने नाशिक जिल्हा परिषदेला भेट दिली असता समितीने नाशिक जिल्हयातील जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आले की, कृषी विभागाच्या राज्य शासनामार्फत राबविण्यात येणा-या योजना महाराष्ट्र जिल्हा परिषदेकडे अधिनियम १९६१ च्या कलम १२३ नुसार योजना हस्तांतरित करण्यात आलेल्या आहेत. जिल्हा परिषद कृषी विभागामार्फत शेतक-यांशी निगडीत २४ योजना राबविण्यात येतात.

सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, नाशिक **यांनी अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांच्या वस्तीचा विकास करणे, दलित वस्तीमध्ये पूर्वनिर्मित कचराकुंडी बांधणे तसेच घंटागाडी योजना राबविण्याबाबत सामाजिक न्याय विभागाकडे प्रस्ताव सादर केलेला असून त्याबाबत सर्व आवश्यक ती कार्यवाही तातडीने पूर्ण करुन त्याबाबतचा अहवाल समितीस तीन महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

राष्ट्रीय ग्रामीण पेयजल योजनेंतर्गत ग्रामीण भागातील ब-याच ग्रामपंचायतीमध्ये गैरव्यवहार झालेला आहे. ग्रामसेवक तसेच पाणीपुरवठा समितीवर कोणाचेही नियंत्रण नाही. १४ व्या वित्त आयोगाचा निधी थेट ग्रामपंचायतीकडे जाणार आहे. जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायत ही त्रिस्तरीय रचना आहे या त्रिस्तरीय समित्या सक्षम राहिल्या तर त्यांच्यामार्फत लोक कल्याणकारी कामे होतील. **सबब, उपरोक्त त्रिस्तरीय रचना सक्षम रहावी व लोकहिताची कामे व्हावीत यादृष्टीने ग्रामविकास विभागाने ई-तंत्रज्ञान सारख्या संगणक प्रणालीद्वारे ईलेक्ट्रॉनिक माध्यमाच्या सहाय्याने समन्वय ठेवावा, जेणेकरुन तेथील प्रशासन यंत्रणेवर नियंत्रण राहील अशीही समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

डिजिटल इंडिया संकल्पनेतून जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये ई-लर्निंग देता यावे, जिल्हा परिषद शिक्षकांना प्रशिक्षण देऊन विद्यार्थ्यांमध्ये जागरुकता निर्माण करावी व जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्यात यावे, तसेच बहुतांश अशा स्वरुपाच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये डॉक्टर मुख्यालयी उपस्थित राहत नसल्याबाबत तसेच अनेक डॉक्टरांना आजाराचे अचूक निदान न करता औषधे देता येत नाही अशा अनेक तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे प्राथमिक आरोग्य केंद्रात उपस्थिती दर्शविण्यासाठी संगणक संचलित उपस्थिती दर्शक (बायोमेट्रीक मशिन) चा वापर अनिवार्य करण्यात यावा यासाठी राज्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रांमध्ये उपस्थितीसाठी संगणक संचलित उपस्थिती दर्शक (बायोमेट्रीक मशिन) बसविण्यात याव्यात. डॉक्टरांकडून योग्य उपचार रुग्णांवर होण्याच्या दृष्टीने दक्षता घेण्याच्या सुचना डॉक्टरांना देण्यात याव्यात. **चांदवड पंचायत समितीच्या आरोग्य केंद्रातील प्रसुतीगृहामध्ये अनेक गरोदर महिलांचे बाळ दगावल्याच्या घटना घडलेल्या आहेत. याप्रकरणी जिल्हा शल्य चिकित्सकांनी सखोल चौकशी करुन चौकशीनुसार संबंधित दोषींवर जबाबदारी निश्चित करावी अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

आमदार विकास निधीप्रमाणे जिल्हा परिषद सेसमध्ये १० लाख रुपयांपर्यंत वाढ करणे अत्यावश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने कामे घेतल्यानंतर ठेकेदार कामे करीत नाहीत. बांधकाम विभागाची ५-५ लाख रुपयांची अनेक कामे प्रलंबित आहेत. **मूळ रक्कमेच्या २० टक्के कमी दराने कामे घेऊनही कामे अपूर्ण आहेत या सर्व बाबी विचारात घेता जिल्हा परिषद सेसमध्ये वाढ करण्यात यावी अशीही समितीची शिफारस आहे.त्याप्रमाणे ग्रामविकास विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

**इगतपुरी तालुक्यात सन २००७ पासून ४१ पाणीपुरवठा योजना कागदोपत्री पूर्ण झाल्याचे दर्शविण्यात आले असले तरी प्रत्यक्षात ४१ पाणीपुरवठा योजनांपैकी ३९ पाणी पुरवठा योजना बंद आहेत. यासंदर्भात तांत्रिक सल्लागार समिती, एजन्सी, अध्यक्ष तसेच सचिव यांच्यासमवेत पंचायत समिती स्तरावर अनेक बैठका होऊन देखील बंद असलेल्या योजना कार्यान्वित झालेल्या नाहीत, त्यामुळे उपरोक्त प्रकरणी संबंधितांची चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार योजना बंद होण्यासाठी कारणीभूत असणा-या संबंधित अधिकारी/कर्मचारी व संबंधित ठेकेदारांविरुध्द कारवाई करण्यात येऊन उपरोक्त ३९ पाणी-पुरवठा योजना सुव्यवस्थितरित्या सुरु करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.उपरोक्त प्रकरणी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

इगतपुरी पंचायत समितीमध्ये गटविकास अधिकारी यांनी विशेष कार्योत्तर मंजुरी न घेता नियमबाह्य पध्दतीने ग्रामविकास अधिकारी तसेच ग्रामसेवकांच्या बदल्या केलेल्या आहेत. या प्रकरणी श्री.किरण कोवे, गटविकास अधिकारी, इगतपुरी पंचायत समिती यांचेविरुध्द तक्रार करुन देखील कोणतीही दखल घेतलेली नाही. **नियमबाह्य पध्दतीने संपूर्ण नाशिक जिल्ह्यामध्ये १०० ते १५० बदल्या करण्यात आलेल्या असून यासंदर्भात मा.उच्च न्यायालयामध्ये जनहित याचिका दाखल करण्यात आलेली आहे. विभागीय आयुक्तांकडे सदर बदल्यासंदर्भात पत्रव्यवहार करुन देखील पत्राची दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याप्रकरणी चौकशीनुसार केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीस पाठविण्यात यावी.**

**तसेच इगतपुरी पंचायत समितीच्या आरोग्य विभागामध्ये कंत्राटी सेविका जवळपास ८२ आहेत आरोग्य विभागामध्ये देखील नियमबाह्य पध्दतीने बदल्या करण्यात आलेल्या आहेत. कंत्राटी तत्वावर भरतीकरीता २० हजार रुपयांची मागणी करण्यात येत असल्याच्या तक्रारी प्राप्त झालेल्या असून वरिष्ठांची पूर्वपरवानगी न घेता तालुका स्तरावर परस्पर नेमणुका करुन घेत असताना**

**ज्या महिला नेमणुकाकरीता पैसे देण्यासाठी सक्षम नव्हत्या त्यांच्याकडे शरीरसुखाची मागणी करण्यात आल्याच्या अत्यंत घृणास्पद व गंभीर तक्रारी समितीच्या निदर्शनास आणून दिलेल्या आहेत. त्यामुळे याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

एकात्मिक बाल विकास योजना (ICDS) विभागामध्ये देखील सन २०१४ मध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक देवाण घेवाण करुन नियमबाह्य व चुकीच्या पध्दतीने भरती प्रक्रिया राबविलेली होती, यासंदर्भात विद्यमान आमदार, माजी आमदार, जिल्हा परिषद सदस्य सर्वांनी एकत्रितरित्या मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांच्याकडे तक्रार करुन भरती प्रक्रिया रद्द करण्यात आली होती. त्यानंतर पुन्हा भरती प्रक्रिया राबविली होती त्यामध्ये सुध्दा अनियमितता झाली असून आर्थिक देवाण घेवाण झाली असल्याची तक्रार समितीसमोर करण्यात आली आहे. तसेच **पंचायत समितीच्या सेसमध्ये खोट्या पध्दतीने ठराविक प्रशिक्षणे दाखवून एजन्सीच्या नावाने देयके काढली आहेत. त्याबाबतचे लेखी पुरावे समितीस सादर करण्यात आले आहेत. उपरोक्त प्रकरणी चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार दोषी आढळल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावा.**

**बालविकास प्रकल्प अधिका-यांची एकूण २६ पदांपैकी १८ पदे रिक्त आहेत. सदरहू रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावी याकरीता महिला व बालविकास विभागाने केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

नाशिक जिल्ह्यामध्ये १६०० पेक्षा अधिक ग्रामपंचायती आहेत. २२९ गावे जलयुक्त शिवार योजनेसाठी निवडली गेली आहेत. डिपीडीसीचा ६० टक्के निधी त्या गावांमध्ये खर्च होतो. **उर्वरित गावांसाठी ४० टक्के निधी उपलब्ध होतो, त्यामुळे जलयुक्त शिवार योजनेच्या कामासाठी स्वतंत्र निधी निर्माण करुन त्यासाठी आर्थिक तरतुद करण्यात यावी. याकरीता २७०२ या शिर्षाअंतर्गत उपलब्ध होणारा निधी १०० टक्के ठेवावा याकरिता ग्रामविकास विभागाने कार्यवाही करावी अशी समितीची शिफारस आहे. याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस तीन महिन्यांच्या आत पाठविण्यात यावी.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**गुरुवार, दिनांक ५ मे, २०१६**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नाशिक**

**उपस्थिती :**

१) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स. तथा कार्यकारी समिती प्रमुख
२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३) श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
५) श्री. समीर कुणावार, वि.स.स.
६) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
७) श्री. अनिल बाबर, वि.स.स.
८) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
९) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१०) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
११) श्री. राहूल मोटे, वि.स.स.
१२) ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स.
१३) श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक पदाधिकारी**

१) श्रीमती विजश्री चुंबळे, अध्यक्ष, जि.प. नाशिक
२) श्री. केदार तानाजी आहेर, सभापती, कृषि, पशुसंवर्धन
३) श्रीमती उषा बच्छाव, सभापती, समाजकल्याण, जि.प. नाशिक
४) सौ. मंदाताई निकम, सभापती, पं.स. नाशिक
५) सौ. शोभा डोखळे, सभापती, महिला व बालकल्याण
६) सौ. अनिता जाधव, सभापती, पं.स.चांदवड
७) सौ. अल्का चौधरी, सभापती, पं.स. दिंडोरी
८) श्री. गोपाळ लहांगे, सभापती, पं.स. इगतपुरी
९) श्री. अशोक बोरसे, सभापती, पं.स. देवळा
१०) श्री. भरत पवार, सभापती, पं.स. मालेगाव

**स्थानिक निधी लेखा परीक्षा**

श्री. का. म. विधाते, सह संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री. विजय शिंदे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक**

श्री.नृसिंह मित्रगोत्री, उप आयुक्त (विकास), नाशिक

**जिल्हा परिषद नाशिक**

१) श्री. मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री. अ. बा. लांडगे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
३) श्री. राजाराम दिघे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.यं. नाशिक
४) श्री. संदिप माळोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
५) श्री. रणधीर सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
६) श्री.उध्दव खंदारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
७) श्रीमती प्रतिभा संगमनेरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.)
८) श्री. बोधिकिरण सोनकांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
९) श्री. नवनाथ औताडे, शिक्षणाधिकारी (माध्य.)
१०) श्री. प्रविण अहिरे, शिक्षणाधिकारी (प्राथ.)
११) श्रीमती भावना राजनोर, शिक्षणाधिकारी (निरंतर)
१२) श्री. सिध्दार्थ तांबे, कार्यकारी अभियंता, इवद-१
१३) श्री. मिलन कांबळे, कार्यकारी अभियंता, इवद-२
१४) श्री. अनिल पाटील, कार्यकारी अभियंता, इवद-३
१५) श्री. चंद्रशेखर वाघमारे, कार्यकारी अभियंता, ल.पा.(पश्चिम)
१६) श्री. प्रकाश नंदनवरे, कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु. व देख. दुरुस्ती
१७) श्री. हेमंत काळे, कृषि विकास अधिकारी
१८) डॉ. प्रशांत फालक, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,
१९) डॉ. सुनिल वाकचौरे, जिल्हा आरोग्य अधिकारी
२०) श्रीमती वंदना कोचुरे, समाजकल्याण अधिकारी
२१) श्री. रत्नागर पगार, गट विकास अधिकारी (मनरेगा)
२२) श्री. रविंद्र परदेशी, गटविकास अधिकारी, पं.स. नाशिक
२३) श्री. राहूल रोकडे, गटविकास अधिकारी, पं.स.दिंडोरी
२४) श्री. भालचंद्र बहिरम, गट विकास अधिकारी, पं.स.पेठ
२५) श्री. दत्तात्रय दराडे, गट विकास अधिकारी, पं.स. सुरगणा
२६) श्री. टी. टी. सोनवणे, गट विकास अधिकारी, पं.स. कळवण

२७) श्री. डी. एम. बहिरम, गट विकास अधिकारी, पं.स. बागलाण

२८) श्री. आनंदराव पिंगळे, गट विकास अधिकारी, पं.स.मालेगाव

२९) सौ. चित्रलेखा कोठावळे, गट विकास अधिकारी, पं.सं. नांदगाव

३०) श्री. बी. के. बेडसे, गट विकास अधिकारी, पं.स. चांदवड

३१) श्री. किरण कोवे, गट विकास अधिकारी, पं.स. ईगतपुरी

३२) श्री. सुनिल अहिरे, गट विकास अधिकारी, पं.स. येवला,

३३) श्री. सी. एल. पवार, गट विकास अधिकारी, पं.स. देवळा

३४) श्री. धनंजय जगताप, गट विकास अधिकारी, सिन्नर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व २०११-१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील नाशिक जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शुक्रवार, दिनांक ६ मे, २०१६**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नाशिक**

**उपस्थिती**

१. श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स.तथा समिती प्रमुख.
२. श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३. श्री. भिमराव तापकीर, वि.स.स.
४. श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
५. श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
६. श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
७. श्री. अनिल बाबर, वि.स.स.
८. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
९. श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१०. श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
११. ॲड. के.सी.पाडवी, वि.स.स.
१२. श्री. अमित झनक, वि.स.स.
१३. श्री. चंद्रकांत रघुवंशी, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)
श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**जिल्हा परिषद नाशिक**

१) श्री. मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री. अ. बा. लांडगे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
३) श्री. राजाराम दिघे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.सं.नाशिक
४) श्री. रणधीर सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
५) श्री.उध्दव खंदारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
६) श्रीमती प्रतिभा संगमनेरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.)
७) श्री. बोधिकिरण सोनकांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
८) श्री. नवनाथ औताडे, शिक्षणाधिकारी (माध्य.)
९) श्री. प्रविण अहिरे, शिक्षणाधिकारी (प्राथ.)
१०) श्रीमती भावना राजनोर, शिक्षणाधिकारी (निरंतर)
११) श्री. सिध्दार्थ तांबे, कार्य अभियंता, इवद-१
१२) श्री. मिलन कांबळे, कार्यकारी अभियंता, इवद-२
१३) श्री. अनिल पाटील, कार्यकारी अभियंता, इवद-३

१४) श्री. चंद्रशेखर वाघमारे, कार्यकारी अभियंता, ल.पा.(पश्चिम)

१५) श्री. प्रकाश नंदनवरे, कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु. व देख. दुरुस्ती

१६) श्री. हेमंत काळे, कृषि विकास अधिकारी,

१७) डॉ. प्रशांत फालक, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी,

१८) डॉ. सुनिल वाकचौरे, जिल्हा आरोग्य अधिकारी

१९) श्रीमती वंदना कोचुरे, समाजकल्याण अधिकारी

२०) श्री.रत्नागर पगार, गट विकास अधिकारी (मनरेगा)

२१) श्री. रविंद्र परदेशी, गटविकास अधिकारी, पं.स. नाशिक

२२) श्री. राहूल रोकडे, गटविकास अधिकारी, पं.स.दिंडोरी

२३) श्री.भालचंद्र बहिरम, गट विकास अधिकारी, पं.स.पेठ

२४) श्री. दत्तात्रय दराडे, गट विकास अधिकारी, पं.स. सुरगाणा

२५) श्री. टी.टी. सोनवणे, गट विकास अधिकारी, पं.स. कळवण

२६) श्री. डी.एम.बहिरम, गट विकास अधिकारी, पं.स. बागलाण

२७) श्री. आनंदराव पिंगळे, गट विकास अधिकारी, पं.स.मालेगाव

२८) सौ. चित्रलेखा कोठावळे, गट विकास अधिकारी, पं.स. नांदगाव

२९) श्री. बी. के. बेडसे, गट विकास अधिकारी, पं.स. चांदवड

३०) श्री. किरण कोवे, गट विकास अधिकारी, पं.स. ईगतपुरी

३१) श्री. सुनिल अहिरे, गट विकास अधिकारी, पं.स. येवला,

३२) श्री. सी. एल. पवार, गट विकास अधिकारी, पं.स. देवळा

३३) श्री.धनंजय जगताप, गट विकास अधिकारी, सिन्नर

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी तसेच गटविकास अधिकारी यांची सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालावरील प्रश्नावली क्रमांक २ संदर्भात नाशिक जिल्हा परिषदेच्या पंचायत समितीनिहाय संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**शनिवार, दिनांक ७ मे, २०१६**

**स्थळ : जिल्हा परिषद सभागृह, नाशिक**

**उपस्थिती :**

१) श्री. संभाजी निलंगेकर-पाटील, वि.स.स. तथा समिती प्रमुख
२) श्री. विकास कुंभारे, वि.स.स.
३) श्री. उन्मेश पाटील, वि.स.स.
४) श्री. समीर कुणावार, वि.स.स.
५) श्री. राजेंद्र नजरधने, वि.स.स.
६) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.
७) श्री. अनिल बाबर, वि.स.स.
८) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
९) श्री. हेमंत पाटील, वि.स.स.
१०) श्री. राजाभाऊ वाजे, वि.स.स.
११) ॲड. के. सी. पाडवी, वि.स.स.
१२) श्री. अमित झनक, वि.स.स.
१३) ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रदीप मयेकर, अवर सचिव (समिती)

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखा परीक्षा**

श्री. का. म. विधाते, सह संचालक, स्थानिक निधी लेखा

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई**

श्री. विजय शिंदे, उप सचिव, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक**

श्री. नृसिंह मित्रगोत्री, उप आयुक्त (विकास), नाशिक

**जिल्हा परिषद नाशिक**

१) श्री. मिलिंद शंभरकर, मुख्य कार्यकारी अधिकारी
२) श्री. अ. बा. लांडगे, अति. मुख्य कार्यकारी अधिकारी
३) श्री. राजाराम दिघे, प्रकल्प संचालक, जि.ग्रा.वि.सं.नाशिक
४) श्री. संदिप माळोदे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)
५) श्री. रणधीर सोमवंशी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.पं.)
६) श्री. उध्दव खंदारे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बा.क.)
७) श्रीमती प्रतिभा संगमनेरे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पा. व स्व.)
८) श्री. बोधिकिरण सोनकांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
९) श्री. नवनाथ औताडे, शिक्षणाधिकारी (माध्य.)
१०) श्री. प्रविण अहिरे, शिक्षणाधिकारी (प्राथ.)
११) श्रीमती भावना राजनोर, शिक्षणाधिकारी (निरंतर)
१२) श्री. सिध्दार्थ तांबे, कार्य अभियंता, इवद-१
१३) श्री. मिलन कांबळे, कार्यकारी अभियंता, इवद-२
१४) श्री. अनिल पाटील, कार्यकारी अभियंता, इवद-३
१५) श्री. चंद्रशेखर वाघमारे, कार्यकारी अभियंता, ल.पा.(पश्चिम)
१६) श्री. बापू देसले, कार्यकारी अभियंता, ल.पा. (पूर्व)
१७) श्री. प्रकाश नंदनवरे, कार्यकारी अभियंता, ग्रा.पा.पु. व देख. दुरुस्ती
१८) श्री. हेमंत काळे, कृषि विकास अधिकारी
१९) डॉ. सुनिल वाकचौरे, जिल्हा आरोग्य अधिकारी
२०) श्रीमती वंदना कोचुरे, समाजकल्याण अधिकारी
२१) डॉ. प्रशांत फालक, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
२२) श्री. एन. पी. दहिसर, वरिष्ठ भुवैज्ञानिक
२३) श्री. ए. पी. डोमाडे, उप अभियंता (यांत्रिकी)
२४) श्री. एस. सी. निकम, कार्यकारी अभियंता, (म.जी.प्रा.)
२५) श्री. रत्नागर पगार, गट विकास अधिकारी (मनरेगा)
२६) श्री. रविंद्र परदेशी, गटविकास अधिकारी, (पं.स. नाशिक)
२७) श्री. राहूल रोकडे, गटविकास अधिकारी, (पं.स.दिंडोरी)
२८) श्री. भालचंद्र बहिरम, गट विकास अधिकारी, (पं.स.पेठ)
२९) श्री. दत्तात्रय दराडे, गट विकास अधिकारी, (पं.स. सुरगणा)
३०) श्री. टी. टी. सोनवणे, गट विकास अधिकारी, (पं.स. कळवण)
३१) श्री. डी. एम. बहिरम, गट विकास अधिकारी, (पं.स. बागलाण)
३२) श्री. आनंदराव पिंगळे, गट विकास अधिकारी, (पं.स.मालेगाव)
३३) सौ. चित्रलेखा कोठावळे, गट विकास अधिकारी, (पं.सं. नांदगाव)
३४) श्री. बी. के. बेडसे, गट विकास अधिकारी, (पं.स. चांदवड)
३५) श्री. किरण कोवे, गट विकास अधिकारी, (पं.स. ईगतपुरी)
३६) श्री. सुनिल अहिरे, गट विकास अधिकारी, (पं.स. येवला)
३७) श्री. सी. एल. पवार, गट विकास अधिकारी, (पं.स. देवळा)
३८) श्री. धनंजय जगताप, गट विकास अधिकारी, (पं. स. सिन्नर)

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नाशिक जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २००८-२००९ व सन २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील व सन २०१२-२०१३ च्या वार्षिक प्रशासन अहवालातील नाशिक जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक १४ फेब्रुवारी, २०१८**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

३) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

४) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

५) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्रीमती शुभांगी पाटोळे, सह संचालक

**विभागीय सचिव**

श्री. मुकेश खुल्लर, अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन (सेवा) विभाग

श्री. श्यामलाल गोयल, अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,

श्री. वि.रा.नाईक, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग),

श्री. एकनाथ डवले, सचिव, जलसंधारण विभाग,

श्री. किरण कुरुंदकर, सचिव, पशुसंवर्धन विभाग,

श्री. संजय देशमुख, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग,

श्री. संजय देशमुख, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (अतिरिक्त कार्यभार),

श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. दिनेश वाघमारे, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

श्रीमती विनिता वेद सिंघल, सचिव, महिला व बालविकास विभाग,

श्री. डी. एल. सुळ, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,

श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,

श्री. संजीव कुमार, आयुक्त, आरोग्य विभाग,

श्री. शिवाजी दौंड, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

श्री. र.अ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. प्रकाश वळवी, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. र. अ. गुरव, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग,

श्री. अजिंक्य बागडे, अवर सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**जिल्हा परिषद, नाशिक**

श्री. अ. बा. लांडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. बी. जे. सोनकांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री. राजेंद्र पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत)

श्री. सी. डी. वाघमारे, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

श्री. प्रमोद पवार, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए.

श्री. सुशिल वालकोडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री. डी. बी. मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

डॉ. वैशाली झनकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री. बी. पी.साळुंखे, कार्यकारी अभियंता, इवद बांधकाम क्र.१

श्री. एस. एन. नारखेडे, कार्यकारी अभियंता, इवद बांधकाम क्र.३

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी अतिरिक्त मुख्य सचिव, सामान्य प्रशासन (सेवा) विभाग, अतिरिक्त मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सचिव, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना (ग्रामविकास विभाग),सचिव, जलसंधारण विभाग, सचिव, पशुसंवर्धन विभाग, सचिव, वैद्यकीय शिक्षण विभाग, सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (अतिरिक्त कार्यभार), सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सह सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, आयुक्त, आरोग्य विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, पशुसंवर्धन विभाग,व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची साक्ष घेतली.

**गुरुवार, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१८**

**स्थळ : विधान भवन, मुंबई**

**उपस्थिती :**

१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

३) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

४) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

५) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

७) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. सचिन बाभळगांवकर, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय**

श्रीमती शुभांगी पाटोळे, सह संचालक

**विभागीय सचिव**

श्री. विजय कुमार, प्रधान सचिव, कृषी व पणन विभाग,

श्री. नंद कुमार, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग,

श्री. मनुकुमार श्रीवास्तव, प्रधान सचिव, महसुल विभाग,

श्री. असिमकुमार गुप्ता, सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. एकनाथ डवले, सचिव, जलसंधारण विभाग,

श्री. र. प्र. आटे, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,

श्री. राजेश क्षीरसागर, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,

श्री. गिरीश भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग,

श्री. सुग्रिव धपाटे, उप सचिव, कृषी विभाग,

श्री. शिवाजी दौंड, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ

**जिल्हा परिषद, नाशिक**

श्री. अ. बा. लांडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी

श्री. बी. जे. सोनकांबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

श्री. राजेंद्र पाटील, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, (ग्रामपंचायत)

श्री. सी. डी.वाघमारे, कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग

श्री. प्रमोद पवार, प्रकल्प संचालक, डी.आर.डी.ए.

श्री. सुशिल वालकोडकर, जिल्हा आरोग्य अधिकारी

श्री. डी. बी. मुंडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी

डॉ. वैशाली झनकर, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

श्री. बी. पी. साळुंखे, कार्यकारी अभियंता, इवद बांधकाम क्र.१

श्री. एस. एन. नारखेडे, कार्यकारी अभियंता, इवद बांधकाम क्र.३

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २००८-२००९ व २०११-२०१२ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१२-१३ च्या वार्षिक प्रशासन अहवाल यासंदर्भात नाशिक जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, कृषी व पणन विभाग, प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, प्रधान सचिव, महसुल विभाग, सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, जलसंधारण विभाग, सह सचिव, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, कृषी विभाग, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ,मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांची उर्वरित साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक ११ जुलै, २०१८**

**स्थळ : विधान भवन, नागपूर**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

३. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

४. डॉ. देवराव होळी, वि.स.स.

५. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

६. श्री. तुकाराम काते, वि.स.स.

७. श्री. भारत भालके, वि.स.स.

८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

१०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

११. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

---

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत चौदाव्या व पंधराव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन ते किरकोळ सुधारणांसह संमत केले.

शामुना–एचबी-२३४७–मविमंसना–०७-२०१८–४६० प्रती–पीए४*